# मराठी धातुकोश

# मराठी धातुकोश

## अ

अंक [ अंक् १ लक्षणे अंकति] चिन्ह करणें, चिन्हिणें. इतर रूप-अंकि १. (२) [ अक् १ कुटिलायां गतौ ] चिन्ह करणें, चिन्हिणें. इतर रूप-अंकि २.

अकड [ अक् १ वक्रगतौ ] अकडणें.

अकांत [ अव + क्रन्द् १ आह्वाने रोदनेच, क्रंदति {द=त} ] ओरडणें.

अंकि १ [ अंक् १ लक्षणे. अंकयति (सविकरण) ] चिन्ह करणें, चिन्हिणें. (अंक १ पहा) (२) [ अक् १ कुटिलायां गती ] चिन्ह करणें, चिन्हिणें. *(अंक २ पहा)*

अंकुर [ अंकुर नामधातु, अंकुरति, अंकुरयति] अंकुर फुटणें. उदाहरण - तुळशीची फांदी अंकुरली.

अंकुराव [ अंकुर (ना.) अंकुरायते ] - अंकुर फुटणें.

अंकुरैज [ अंकुरायते { अंकुराय = अंकुराइज = अंकुरैज} ] अंकुर फुटणें.

अक्रस [ अव + कृष् १ विलेखने. क्लि क्स क्राक्ष् कृक्ष् क्राक्षीत् कृक्षत् (क्ष=स ] संकोच पावणें.

अक्रुस [ अव + कृष् १ विलेखने कर्षति। क्लि क्स कृक्ष् (ऋ = रु; क्ष=स) ] संकोच पावणें.

अंख [ अंक् १ लक्षणे, अंकति (क=ख) ] चिन्हणें.

अखड १ [ अव + खड् १० गतिवैकल्ये लुङ् अखडीत् अविकरण ] लंगडणें. उ.- तो अखडत चालतो; पाय अखडला म्हणजे विकल झाला. (२) [ अव + खर्व् १ दर्पे खर्वति अविकरण ] गर्विष्ठ होणें. उ.- तो मात्क्यान् अखडला म्ह. गर्विष्ठ होऊन बसला.

अंगल १ [ अंग + रा २ दाने {अंगरा = अंगल }] स्वीकारणें; देणें. (२) [ अंग + र (स्वार्थे) (ना.) ] अंगास लावणें - लागणें.

अंगव १ [ अंघ् (णिच्) १ गत्याक्षेपे । आक्षेपो निन्दा । गतौ गत्यारम्भेचेत्यन्ये { अंघय = अंगव; घ् = ग्; य् = व्} ] मुकणें, फसवणें, नागवणें. इतर रूप- अंगवि. (२) [ अंघ् (णिच्) १० वक्रगतौ (णिच् कर्मणि) ] वाईट मार्गानें जावयास लावणें, मुकणें. (३) [ मंघ् १० गत्याक्षेपे कैतवेच गतौ गत्यारम्भेचेत्यन्ये {मंघ् = अंघ् = अंग्; य् = व् } मुकणें.

अंगवि १ [ अंघ् (णिच्) १० कैतवे {अंघय् = (अंगव, अंगइ) = अंगवि} ] मुकणें, फसणें. (अंगव पहा) (२) [अघ् (णिच्) ६ कैतवे { अंघ् = अंघय = अंगव = अंगवि }] मुकणें. (अंगव पहा) (३) [मघ् १० वक्रगतौ { मंघ् = मंघय् = अंगइ = अंगवि }]

मुकणें, फसणें. (अंगव पहा)

अंगीकार [ अंगी कृ : स्वीकारे { अंगी कृ। वृद्धि । अंगीकार }] पत्करणें, स्वीकारणें.

अच [ अस् ४ क्षेपणे अस्यति {अस्य = अच}] फेकणें. इतर रूप—अचक.

अचक [ अस् ४ उपतापे + अकच् (स्य=च] अचके येणें. *(अच पहा)*

अचकट [ अत्यव + कत्थ् १ श्लाघायाम् { त्य् = च्; त्थ् = ट् }] वाईट अभद्र बोलणें. (विचकट २ पहा)

अचांग [ अति + आ + अंग् १ गतौ { अत्यांग = अचांग }] गळणें, हातापायांतील जोर नाहीसा होणें.

अजमाव १ [ अधि + मी १० गतौ मयते, माययति { अधिमाय = अजमाव; ध्=ज्, य्=व्}] तर्क बांधणें, अनुमान करणें. (२) [ अधि + मा २ माने (णिच्) मापयति { अधिमापय् = अजमावय्; ध्=ज्; प् = व }] विचार करणें. तर्क करणें.

अट [ अट्ट् १ अतिक्रमहिंसनयोः ] अडणें, हट्ट धरून बसणें. उ.- असा अटूं नकोस म्ह. हट्ट करून बसूं नको.

अटक [ अड्ड् १ अभियोगे { ड्ड =ड् = ट्}] अडकणें, अडणें (अ=ह) इतर रूप-हटक ७.

अटकळ १ [ अंतर् +कल् १० संख्याने गतौच { अंतर् = अट; कल् = कळ्}] अटकळ बांधणें. (२) [ अर्ध + कल् १० ज्ञाने { अर्ध = अड = अट, ल् = ळ् }] अर्धवट समजणें. (३) [ अन्तर् + कल्प् १ अनुमाने ] अनुमान बांधणें.

अटाट [ अट् १ गतौ (अट् - द्वित्व - अटाट) ] भटकणें, येरझारा करणें.

अटास [ अति + आ + शंस् १ इच्छायाम् { अत्याशंस्; त्य = त्त = ट; शंस् = शं =स }] इच्छा करणें.

अठव १ [ अस्तम् + इ २ गतौ { अस्तमि = स्त् = ठ्; मि =म = वँ }] आठवणें. *(आठव ५ पहा)* (२) [ अर्थ् १० उपयाञ्चायाम् { अर्थ् = अत्थ् = अट्ठ्; य्=व् }] आठवणें. (आठव ४ पहा)

अठुळ [ अष्ठील (ना.) = आठळी, बी. { अष्ठिल; ष्ट=ठ; ल = ळ } ] घट्ट होणें. *(आठुल २ पहा)*

अड १ [ अल् १ वारणे {ल् = ळ् = ड्}] पुढें न जाणें, थांबणें. इतर रूप-अडव ५. (२) [ अड् १ गतौ ] थांबणें. (३) [ अन्तर् + धा ३ आच्छादने ] दडणें, अडून गोळी मारणें. इतर रूप-आड २. (४) [ अड् (वेद) अड्नोति] व्यापणे. इतर रूप-अडव ६. (५) [ अन्तर् + भू १ सत्तायाम् ] इतर रूप-आड १

अडक १ [ अठ् १ गतौ ] मध्यें सांपडणें. (२) [ अन्तर् + गम् १ गतौ { अन्तर् = अड ग् = क् }] मध्यें जाणें, सांपडणें. (३) [ अर्ध + गम् १ गतौ { अड + क् }] अर्धवट जाणें.

अडकव [ अन्तर् + ख्या २ गोपने (वैदिक)] अडकावणें. *(अडकाव २ पहा)*

अडकाव १ [ अन्तर्घातय् {अंन्तर्घातय् = अडघाव = अडक }] मध्यें घालणें. (२) [ अन्तर् + ख्या २ गोपने (वैदिक) अडकवणें. उ.- त्याने माझे दागिने अडकावून ठेविले. इतर रूप-अडकव.

अडख [ अति + आ + ख्या २ प्रकथने; अत्याख्या = अडाखा (अनुमान) ] पाहणें, निरीक्षण करणें. इतर रूप-अडाख.

अडच १ [ अधि + अञ्च् १ गतौ

{ अध्यञ्च् = अडच् }] यांकडें होणें. उ.- नाना दुःखीं प्राप्ती । जेथ उद्वेगु नाहिं चित्तिं । आणि सुखाचिया आर्ति । अडधिजेना ।। ज्ञा. २.२९४. (२) [ अति + चण् १ दाने गतौच ] अडचणीत सांपडणें. (अडचण १ पहा) (३) [ अति + चि + नु ५ संचये ] संकटांत, अडचणींत सांपडणें. (४) [ अन्तर् + चि ५ संचये ] उ.- पोतें अडचून भरलें. (५) [ अन्तर् + अस् ४ क्षेपे ] आंत दडपणें. *(हडस पहा)*

ई १ अडचण् [ अन्तर् + चिनु । विकृत।] आंत किंवा मध्यें चिणणे.

अडचण १ [ अति + चण् १ गतौ दानेच { अति = अड. अर्ध = अड }] अडचणींत सांपडणें. इतर रूप-अडच २ (२) [ अति + चि + नु ५ संचये (अतिचिनु - सविकरण) ] संकटांत, अडचणीत सांपडणें. (३) [ अंतर् + चि + (नु) ५ संचये ] खच्चून भरणें. पोतें अडचून भरणें. (४) [ अन्तर् + चन् हिंसायाम् ]

अडथळ [ अर्ध + स्थल् १ स्थाने { र्ध् = ड्; स्थ् = थ्; ल्=ळ् }] अर्धवट उभें रहाणें.

अडप् [ अट्ट् १ अभियोगे । हल्ला करणें. णिच् अट्टापय् । कर्मणि अट्टाप्य । अट्टाप्यते = अडपैजे (हल्ला केला जातो)]

अडप १ [ अति + तृप् ४ तृप्तौ { अति + तृप् = अइ + तृप् = अडप. }] समाधान होणें. (२) [ अति + दृप् ४ हर्षमोहनयोः; { अति + दृप् = (एक त् चा लोप ) दृ = ड}] अमर्याद गर्विष्ठ होणे. (३) [ अन्तर् + पत् १ पतने { अन्तर् + पत् = अड + पअ = अडप }] (कर्मणि अन्तः पात्यते) = अणपैजणें (अडचणींत पडणे) ] अडचणींत पडणें.

अडमड १ [ अन्तर् + मठ् १ मदनिवासयोः { अन्तर् = अड; ठ् = ड् }] मध्येंच घोंटाळणें, मध्येंच अडथळा करणें. (२) [ अड्ड् + मृध् १ उन्दने. उन्दनं = क्लेदनम् ] (लहान मुलासारखें ) धुसपुसणें.

अडव १ [ अर्व् १ गतौ { र्व् = र् + व् =ड् + व् = डव }] एकाद्याकडे जाणें. (२) [ अरर्य् १ परिज्ञाने अरर्यते; { रर्य् = रइ (र लोप) = डव}] परीक्षा करणे. त्यानें मला ह्या कामी अडवलें - पारखलें. (३) [ अन्तर् + इ २ गतौ { अन्तर् = अड; अन्तर्य् = अडव }] एकाद्याच्या मार्गात जाणें. *(अडाव १ पहा)* (४) [ अन्तर् + अय् १ गतौ { न्तर् = ड. य् = व् }] मध्यें जाणें. *(अडाव २ पहा)* (५) [ अल् १ वारणे] पुढें न जाणे, थांबणें. (अड १ पहा) (६) [ अड् (वेद) अड्नोति ] व्यापणे. *(अड ४ पहा)*

अडस १ [ अधि + अस् ४ प्रक्षेपे { ध्य = ढ = ड}] पाखडणें. (२) [ अधि + अंच् १ गतिपूजनयोः ( ध्यं = ड) ] पाखडणें. (३) [ अन्तर् + अस् २ भुवि { अन्तरस् = अडस }] आड बसणें. (४) [ अन्तर् + अस् ४ क्षेपे] आंत दडपणें. (हडस पहा).

अडसट [ अर्ध + सट्ट् १० हिंसायाम् { अर्ध = अड; सट्ट् = सट् }] कसे तरी सांच्यांत बसणे.

अडाख [ अति + आ + ख्या २ प्रकथने

{ त्य = ड; ख्या = ख }] अडाखा बांधणें, ठोकताळा सांगणें. (अडख पहा)

अडाव १ [ अन्तर् + इ २ गतौ { अन्तरय् = अडाव् }] मध्यें जाणें, उभें राहणें. इतर रूप-अडव ३. (२) [ अन्तर् + अय् १ गतौ ] मध्यें जाणें. इतर रूप-अडव ४

अडोळ [ आढळ पहा)

अढंचकर [ अध्यञ्चीकृ - अधि + अञ्च् १ गतौ ] वर चढविणे. उ.- ऐसें नाममात्रें जेणें । धात्रेया अढंच करणें ।। तेयाचें रूप आयिक म्हणे । श्रीकांतु तो ।। ज्ञा. १७-३३८

अणवुज [ अणवुजणें.

अंतर १ [ अन्तर् + इ २ गतौ ] मधील एक सोडणें, वगळणें. उ.- एक दिवस अंतरून औषध देत जा. (२) [ अंतरितम् (ना.) (अंतरायते. दैवान्तरितः = दैवानें अंतरलेला ) ] इतर रूप-अंतराव. (३) [ अंतरयनं, अंतर् + इ २ गतौ ] मध्यें येणें, अडथळा करणें. इतर रूप-अंतरव.

अंतरव [ अंतर् + इ २ गतौ (णिच्) अंतरयनं ] मध्यें येणें, अडथळा करणें. *(अंतर ३ पहा)*

अंतराव [ अंतरितम् (ना.) ] अंतरणें. *(अंतर २ पहा)*

ई १ अतिकर् [ अति + कृ ८ करणे ] हून श्रेष्ठ होणें.

अतिकर १ [ अति + कृ ८ करणे] जास्त करणे. (२) [ अति + कृ ८ करणे] उशीर करणें.

ए १ [ अतिक्रम् [ अति + क्रम् १ पादविक्षेपे. अति + क्रम् लङ्घने ] पलीकडे जाणें.

अतिताण [ अतितन् ८ विस्तारे { तन् = ताण }] गर्व करणें.

अत्यन्त [ अति + अंत (ना.) (अत्यन्तन्ते - कर्मणि-अत्यन्त )] शेवट होणें, जाणें, मरणें. उ.- एथ भूतें जियें अत्यंतलीं । तियें मीचि होऊनी ठेलीं ।। आणि वर्तते आथि जालीं । तें हीं मीं चि ।। ज्ञा. ७-१५७

अंथर [ आस्तरणम् (ना.) ] जमिनीवर पसरणें. *(हाथर १ पहा)*

अंथ [ आस्तरणम् (ना.) { आस्तर = आथर = हाथर (सघोष ) }] जमिनीवर पसरणें. (हाथर १ पहा)

ई १ अदल् [ अति + रा २ दाने ] अदलाबदल करणें. अदलाबदल ह्या जोड -शब्दांत अदला हा धातु आढळतो. अतिरा + व्यतिरा = अदलाबदल.

अदळ [ अर्द् १० हिंसायाम् { अर्द् = अदर् = अदल् = अदळ् - वर्णविपर्यय}] नाश होणें. चुकणें.

अदोळ [ आ + दुल् १० उत्क्षेपे ] झोके घेणें, हलणें. इतर रूप-आदोळ.

अधप [ आ + दह् १ भस्मीकरणे (णिच्) (दाहय् किंवा धापय् ) ] जाळणें, पोळणें *(आधप पहा)*

अधपलिप् [ अर्ध + प्र + लिप् ६ दाहे, उपदेहे ] अर्धे पोळणें. अधपलिपिली, म्ह. अर्धी भाजलेलीं, होरपळलेलीं.

अधाध [ अधि + आ + ध्यै १ चिन्तायाम्; निष्ठा- आधाधिला-अध्यायिला-आध्याइला । आधिग्रस्त झालेला. ] इतर रूपें-आधाध, आधाधि, आधाइ.

अंधार [ अंधःकार (ना.) ] काळोख पडणें.

स ई १ अधिकर् [ अधि + कृ १ ऐश्वर्ये आधिक्ये वा ] वरिष्ठ असणें. ज्ञा.

अधिकर [ अधि + कृ ८ करणे (सोपसर्गः] अधिष्टाने ] आश्रयिणें.

अधिष्ठ [ अधि + स्था १ गतिनिवृत्ती ] बसणें, असणें.

अनतोख [ अनु + तुष् ४, ६ तुष्टौ. (णिच्) तोषयति { नु = न; ष् = ख् } (अनु = अन. अनमानणें, अनभयणें, अनसरणें, अनकरणें)] उ.- निम्न भरलेयां उणें । ते पाणी ढलों चि नेणे । तेवि अनतोखौनि जाणे। सामोरे यां ॥ ज्ञा. १६-१५७

अनभव, अन्भव [ अनु + भू १ सत्तायाम् { नु = न }] अनभवणें, अनुभव घेणें.

अनमान [ अनु + मन् ४ ज्ञाने { नु = न} अनुमति देणें.

अनश [ अन् + अश् ९ भोजने ] कांहीं न खाणें.

अनादर [ अन् + आ + दृ ६ आदरे ] अपमान करणें.

अनुकर [ अनु + कृ ८ करणे ] अनुकरण करणें.

ई १ अनुगृह् [ अनु + गृह् ९ ग्रहणे (अविकृत) ] अनुग्रह करणें.

अनुभव [ अनु + भू १ सत्तायाम् ] अनुभव घेणें. इतर रूप= अनुभी.

अनुभी [ अनु + भू १ सत्तायाम् ] अनुभव घेणें. (अनुभव पहा).

अनुमोद [ अनु + मुद् १ हर्षे { मुद् = मोद् (गुण) }] अनुमोदन देणें, रुकार देणें.

अनुलक्ष [ अनु + लक्ष् १० आलोचने ] लक्ष देणें.

अनुवाद [ अनु + वद् १ व्यक्तायां वाचि (णिच्) ] दुसऱ्यासारखे बोलणें.

अनशास [ अनु + शास् २ अनुशिष्टौ ] अनुशासन करणें.

अनुष्ठ [ अनु + स्था १ गतिनिवृत्तौ ] (धर्मकृत्य) करणें, पार पाडणें.

अन्नाव [ अन्न (ना.) ] अन्नासंबंधीं - खाण्यासंबंधीं अडचणीत असणें.

अन्वेष [ अनु + इष् ४ गतौ ] तपास करणें, शोधार्थ असणें.

अपकर्ष [ अप + कृष् १ कर्षणे ] बाजूस ओढणें, सारणें.

अपंग [ अपांग = आ + पंगु (ना.) ] लुळें होणें.

अपधाक [ अप + धक्क् १० नाशने ] भिणें, गर्भगळित होणें.

अपमान [ अप + मन् ४ ज्ञाने { (णिच्) मानय }] अपमान करणें.

अपार [ अप + ऋ ३ गतौ ] बाजूस जाणें, दूर पळणें. (आपार पहा)

अपेक्ष [ अप + ईक्ष् १ दर्शने ] इच्छा करणें - असणें.

अंबव [ अंब (ना.) (अंबु-पाणी) ] आंबवणें. उ.- ऊंस लावल्यावर एक आठवड्यानें त्याला प्रथम अंबवतात - पाणी पाजतात. इतर रूप-आंबव ३

अबोट [ अभि + उत् + वृत् १ वर्तने { अभ्युत् + वृत्; अभ्युत् = अबोट्; वृत् = रित् = ट्; अबोट् + ट् = अबोट }] अंगाला उटणे लावणें. उ.- जाततेन प्रसंगे स्त्रीदेह सिवणें आंगें । तेथौनि देह आवघें। अबोटी कीजे ॥ ज्ञा. १७-२१०. (अभ्युद्वृत्तिः अबोटि = उटणें माखणें.)

अभिनव [ अभिनव (ना.) ] नेहेमीं नवें ताजें असणें. उ.- तो शांतु चि अभिनवैल। ते परियसां मऱ्हाटी बोल । जे समुद्रा हीहूनि खोल । अर्थभरित ॥ ज्ञा. ४-२११.

अभिभव [ अभि + भू १ सत्तायाम् ] (संभव २ पहा)

अरगळ [ अर्गला (ना.) ] घोटाळ्यांत पडणें. इतर रूप- अर्गळ.

अर्गळ [ अर्गला (ना.) { ल = ळ } ] घोटाळ्यांत पडणें. (अरगळ पहा)

अर्घ्य [ अर्घ्य (ना.) ] बळी देणें. उ.- ऐक्य भावाची अंजुळी । सर्वेंद्रिय कुडमळीं ।। भरूनियां पुष्पांजुळी । अर्घ्य देवों ।। माडगांवकर ज्ञा. १५-२.

अर्जि [ अर्ज् १ अर्जने ] मिळविणें, मिळणें.

अर्जी [ अर्द् १ याचने ] मिळणें, मिळविणें.

अर्थि [ अर्थ् १० उपयाञ्चायाम् ] मागणें. इतर रूप-आरुथ.

अर्पि [ ऋ ३ गती (णिच्) अर्पय् ] देणें.

अलंकरे [ अलंकार (ना.) अलंकारायते ] भूषण होणें. उ.- म्हणौनि युक्ति हे पांडवा ।। घडे जेयां सदैवां । तो अपवर्गीचिया राणिवा । अलंकरे जे ।। ज्ञा. ६-३५६.

अलंकार [ अलं + कृ ८ भूषणे ] अलंकार घालणें, भूषविणें.

अवकल [ अव + कल् १० गती संख्यानेच] उतार वय होणें. इतर रूप-अवकळ १.

अवकळ १ [ अव + कल् १० गती संख्यानेच] उताव वय होणें. (अवकल पहा) (२) [ अव + कुल् १ संस्त्याने- संस्त्यानं सङ्घीकरणं. (उ=अ) ] आखडणें. उ.- मान अवकळणें म्ह. आखडणें.

अवग १ [ अव + वष्क् १० दर्शने; { अव + वष्क् = वृलोप; ष्क् = क् =ग् } ] दिसणें, इतर रूप=आवग ८ (२) [ आ + वष्क् १० दर्शने ] दिसणें. इतर रूप = आवग ७.

अवगड [ अव + गड् (इ) बंधने ] अवघडणें, बंदीत टाकणें. *(अवघड १ पहा)*

अवगण [ अव + गण् १० संख्याने ] अपमान करणें, कमी लेखणें.

अवगम [ अव + गम् १ गती ] वाईट मार्गानें जाणें. अवगला.

अवगल १ [ अव + ग्लै १ हर्षक्षये ] मोडकळणें. उ.- आंगे कर्मा ढीला । जो मने विकल्पें भरला । अडवीचा अवगलिला । कुहा जैसा ।। ज्ञा. १३-६७६. इतर रूप-अवगळ २ (२) [ अव + गल् १ हर्षक्षये ] अवगळणें.

अवगळ १ [ अव + गल् १ स्रवणे ] १ मेंगळणें. २ शेष राहणें. (२) [ अव + ग्लै १ हर्षक्षये - हर्षक्षयः = धातुक्षयः] मोडकळणें. *(अवगल १ पहा)*

अवघट [ अव + घट् १ चेष्टायाम् { ट् =ड् } ] करक भरणें, मान अवघडणें. *(अवघड २ पहा)*

अवघड १ [ अव + गड् (इ) १ बंधने {ग् = घ्} ] बंदींत टाकणें. कर्मणि = अवगडणें - बंदीत पडणें. इतर रूप- अवगड. (२) [ अव + घट् १ चेष्टायाम् { ट् = ड्} औघड; अव = औ ) ] पेटके येणें, दुःख होणें. इतर रूपें-अवघट, औघड.

अवटर [ अव + ट्वल् १ वैक्लव्ये; { ट्वल् = टर् = (व् लोप आणि ल = र ) } ] गुंतागुंत होणें. गुंतणें. *(अवटळ पहा)*

अवटळ [ अव + ट्वल् १ वैक्लव्ये; ट्वल्, टल् = संभ्रम पावणें, गुंतणें - अवटलनं, अवट्वलनं = अवटळणें ] गुंतणें. उ.- १ मान अवटळली म्ह. मानेच्या शिरांत गुंतागुंत झाली. २ पोटांत अवटळा आला म्ह. पोटांतील आंतडीं गुंतलीं. इतर रूपें- अवटर, अवठर, औटळ, औटर.

अवटर [ अव + टल् १ वैक्लव्ये ] गुंतणें. *(अवटळ पहा)*

अवढ [ अव + धे १ पाने { धे = धृ = ढ् }] किळस येणें, वीट येणें.

ए १ अवतर् [ अव तृ १ प्लवनतरणयोः] खालीं जाणें.

अवतर [ अव + तृ १ प्लवनतरणयोः { ऋ = अर् }] अवतार घेणें (जन्म पावणे), खालीं उतरणें.

अवतार [ अव तृ १ प्लवनतरणयोः ] रागावणें, चवताळणें.

अवथण १ [ अवस्तनायते (ना.) { स्तन = थन}] आई गर्भार झाल्यामुळे थानचे दूध प्यावयास न मिळणें व त्यामुळे मूल आजारी पडणें (२) [ अव + स्तन (ना.); { अप + स्तन = अवस्तन. प् = व्, स्त् = थ्; न् = ण् }] थान तोडणें. स्तनापासून दूर ठेवणें इतर रूप-अवथन.

अवथन [ अव + स्तन (ना.) { स्तन = थन}] थान तोडणें (अवथण २ पहा)

अवधार १ [ अव + धृ १ धारणे अवधारणं] ध्यानी घेणें. अवधारा शब्द मराठी ओंवींत येतो. (२) [ अव + धृ (णिच्) १ धारणे ] जाणणें.

अवरोध [ अव + रुध् ७ आवरणे ] अटकाव करणें, अडथळा करणें.

अवर्ज १ [ अ + वर्ज् १० वर्जने ] न सोडणें, न गाळणें. (२) [ आ + वृज् १० वशीकरणे ] न सोडणें, न गाळणें. उ.- मी अवर्जून त्याला मुद्दाम बोलाविला.

अवलोक [ अव + लोक् अथवा लोच् १ दर्शने { च् = क् }] पहाणें.

अवलंब [ अव + लंब् १ अवसंस्रने { अवलम्बनम् = आश्रयणम् }] आधार घेणें.

अवांक [ अव + अंक् १० पदे लक्षणेच ] अदमास करणें.

अविष्कर [ आविस् + कृ ८ प्रकाशने ] बाहेर येणें, दिसणें, दाखविणें, उघड करणें.

अवीट [ अव + इष् १ इच्छायाम् { ष् = ठ् = ट् }] किळस येणें.

अव्हांट [ अववाट (ना.) { ववा = व्हां}] आडमार्गानें जाणें.

अव्हेर १ [ अव + धीर १० अवज्ञायाम् {अव + धीर = अव + हीर = अव्हेर}] अपमान करणें. (२) [ अव + हिल् ६ अवज्ञायाम् भावकरणेच { अव + हेल् = व + हें = व्हे; ल् =र् किंवा अव + हेड् १ अनादरे (ड = ल)] अवमानणें.

अस [ अस् २ सत्तायाम् ] असणें.

असकर [ असत्कृ ८ अवमाने ] धिक्कारणें, अवमानणें. इतर रूप-अस्कर १.

असंघड [ अ + सम् + घट् १० संघाते ] विघडणें.

असल [ अछ + ल (स्वार्थे) (ना.) ] स्वच्छ असणें.

असंवर [ अ + सम् + वृ ९ वरणे ] सांवरण्यास कठीण होणे, न सांवरणें.

असवि [ अस् ४ क्षेपे; { अस्य = असय् = असइ = असवि ( संप्रसारण; सविकरण)}] फेकणें. उ.- भोंवरा असविणें - गलीत फेकणें.

असुज [ अव + श्वि श्वयति श्वि १ गतौ फुगणें । अवश्वि = फूग उतरणें । सविकरण । व =उ; य =ज। ]

अस्कर १ [ असत्कृ अवमाने; { त् लोप आणि अ लोप = अस्कर }] धिक्कारणें, अवमानणें. (असकर पहा) (२) [ असत् + कृ ८ अधिक्षेपे ]

अपमान करणें, तुच्छ लेखणें (अस्कार ३ पहा)

अस्कार १ [ असत् + कृ ८ अवमाने ] दुर्लौकिक असणें, अपकीर्ति मिळविणें. (२) [ आ + सत् + कृ ८ संमाने ] प्रसिद्ध होणें - असणें. इतर रूप- आस्कार. (३) [ असत् + कृ ८ अधिक्षेपे ] अपमान करणें, तुच्छ लेखणें, इतर रूप-अस्कर २.

अस्तइ [ अस्तम् + इ २ गतौ. अस्तमिति मान्तमव्ययं नाशे अदर्शनेच । { अस्तइ (म् लोप) } ] मावळणें. (अस्तव पहा)

अस्तव [ अस्त (ना.) { अस्तय् = अस्तव्} ] मावळणें. इतर रूपें - अस्ताव, अस्ताइ, अस्तइ.

अस्ताइ [ अस्तम् + इ २ गतौ ] मावळणें. *(अस्तव पहा)*

अस्ताव [ अस्त (ना.) ] *(अस्तव पहा)*

अहल १ [ आ + हृ १ मेलने ] जमवणें. *(आहल १ पहा)* (२) [ आ + हृ हरति । हृ १ हरणे { आहर्-सविकरण र् = ल् } ] (आहल १ पहा)

अहार [ अव + हृ हरति । हृ १ हरणे । अवहृ अपनयने सविकरण. ] काढून घेणें.

अळप [ आ + लिप् ६ उपदेहे ] बांधणें, गुंडाळणें. *(आळप १ पहा)*

## आ

आइक १ [ अभि + कर्णय् (ना.) = अहिकण्णअ = आइक ] कान देणें, ऐकणें. (२) [ अभि + कर्ण् अहिकण्ण] ऐकणें. (३) [ आ + चिख्या २ प्रकथने (लिट्) = आइक्खा ] ऐकणें. उ.- तो मोठा दानशूर आइकतो = दानशूरः इति आचिख्यातवन्तः (४) [ आ + ख्या यङ् लुगन्त चिख्या (णिच्) चिख्यापय् ] जाहीर करणें. उ.- आइकतों कीं तो विद्वान् आहे = आचिख्यापितवन्तः यत् स विद्वान् इति. (५) [ आ + ईक्ष् १ दर्शने ] ऐकणें. उ.-खाऊं नको, बोलू नको, आइक. इतर रूपें-ऐक ४, आईक १

आइकै [ अयि किंवा अयकि (अकच्) ] ऐकणें. *(ऐक १ पहा)*

आईक १ [ आ + ईक्ष् १ दर्शने ] विचार करणें. उ.- खाऊं नको, बोलूं नको, आईक. (आइक ५ पहा) (२) [ अयि किंवा अयकि ( अकच्) ] उ.- जाऊं नको, आईक *(ऐक १ पहा)*

आउळ [ आकुलनम् (ना.) ] मान आकुळणे, अवघडणें. (आकुळ पहा)

आंक [ अंक् १ लक्षणे ] ठसा उटवणें, मुद्रा ठोकणें. उ.- जे आंकूनि नाणे विस्तारी। पाठिं तेयाची चि आटणी करी ॥ माझि कर्माकर्मांचा व्यवहारी । प्रवर्तु दावी ॥ ज्ञा. ७-२६

आकर्ण [ आ + कर्ण् १ श्रवणे ] कान देणें.

आकल [ आ + कल् १० गतौ संख्यानेच ( ळ = ल)] बांधणें. *(कल १ पहा)*

आकळ १ [ आ + कल् १० कामधेनौ (कामधेनुवत् सर्वार्थप्रदः ) ( ल=ळ) ] बांधणे. (२) [ आ + कल् १० गतौ, संख्यानेच ( आकलय् = आकळ ) ] (३) [ आ + कल् १० संख्याने गतौच ( ल = ळ) ] समजणें, (कल १ पहा) (४) [ आकुलनम् (ना.) ] (आकुळ पहा)

आकार १ [ आकार (ना.) ] आकार

प्राप्त होणें. (२) [ आ + कृ ८ करणे, कृ शब्दे ] १ बोलवणें. २ हिशेब तयार करणें. (३) [ आ + कृ ८ करणें (णिच्) ] मागणें, लादणें. उ.- त्याने माझ्यावर खर्च आकारला. (४) [ आ +कार (कर) (ना.) ] कर लादणे. (कारनाम्निच प्राचां हलादौ ६-३-१० पाणिनि अष्टा.) (५) [ आकारणम् (ना.) ] आकार = रक्कम, हिशेब.

आकुळ [ आकुलनम् (ना.) १ संस्त्याने (संस्त्यानं = संधीकरणम् ) ] मान आकुळणें = अवघडणें. इतर रूपे- आकळ ४, आउळ, औळ, आवळ ६, आवुळ.

आक्रंद [ आ + क्रद् क्रंद् १ आह्वाने रोदने] रडणें, वाईट वाटणें.

आक्रम [ आ + क्रम १ पादविक्षेपे ] ओलांडणें, जाणें.

आक्रस १ [ आ + क्रस् वांकडें असणें ] वांकडे होणें. (२) [ आ + कृश् ४ तनूकरणे ] आंखूड होणें, लहान होणें. आकसणें.

आक्रांत [ आक्रांत (ना.) ] दुःख होणें, बेजार होणें.

आक्रुच [ आ + क्रुंच् १ कौटिल्याल्पीभावयोः { आक्रुच, आक्रुस }] आखडणें, *(आक्रुस १ पहा)*

आक्रुस १ [ आ + क्रुंच् १ कौटिल्याल्पीभावयोः ] आखडणे. इतर रूप-आक्रुच. (२) [ आ + क्रुंच् १ वक्रणे ] आखडणें. (३) [ आ + क्रुंचनं (ना.) कौटिल्ये अल्पीभावेच ] आखडणें, अल्प होणें.

आक्षाद [ आ + क्षद् १ आच्छादने ] आच्छादन घालणे. उ.- मग देखां तेथ फाल्गुनु । घेतला असे भ्रांती कवलुनु । जैसा घनपटलीं भानु । आक्षादिजे ॥ ज्ञा. २-७५

आक्षेप [ आ + क्षिप् (णिच्) आक्षेपय् ] शंका घेणें.

आख १ [ आ + ख्या २ प्रकथने ] सांगणें. उ.- तो ग्रंथ इतिहास आखतो. (२) [ आ + ख्या २ प्रकथने ] जाहीर करणें.

आंख [ अंक् १ लक्षणे. लक्षणं चिह्नीकरणं]

आंखट [ आ + खंड् १० भेदने { ड् = ट्} ] नखानें फाडणें. इतर रूप-आखंट.

आखंट [ आ + खंड् १० विदारणे ( ड् = ट् ) ] नखानें फाडणें. (आंखट पहा)

आखड [ आ + खड् १० अल्पीभावे ] कमी होणें, संकोच होणें. (निखड पहा)

आंखड [ अंख् १ अल्पीभावे ] कमी होणें.

आखुड [ आ + खुड् १० खण्डने ] तुकडे करणें.

आगव [ आ + गम् १ प्रापणे (णिच्) { म = वँ = व } आगवे = आगम्यते ) ] मिळविणें. *(आंगव १ पहा)*

ए. १ आंगव् [ अंह् १० प्रकाशने ] ज्ञा. उ.- जयांचेनि आटवे । शब्दसृष्टि आंगवे। सारत्वत आघवें । जीभेसि ये । शब्दसृष्टि आंगवे म्हणजे प्रकाशते (ज्ञा. १३-२)

आगंव [ आ + गम् (णिच्) ये गत्यर्थास्तेज्ञानार्थाः (आंगवणें नागंवणें = आगम्यनं नागम्यनं ) ] समजणें, नागंवणें = न समजणें.

आंगव १ [ आ + गम् १ प्रापणे ] मिळविणें. इतर रूप-आगव. (२) [ अंगीभू १ भवने. अंगीहू = आंगव ] ताब्यांत जाणें, अंगभूत होणें. उ.- ती स्त्री महाराजा आंगवली-स्वाधीन झाली-गुलाम

झाली. (३) [ अंगी + कृ ८ स्वीकरणे { अंगीकार - अर - व }] मानणें, स्वाधीन होणें

आगस [ अग्रस्यति ]

आग्रह [ आ + ग्रह ९ उपादाने ] आग्रह करणें, बोलावणें, आग्रहून, आघ्रून बोलणें. { आघ्र (ग्रह् = घ्र). आघर ( ग्रह् = घर } . इतर रूपे-आघ्र १, आघर.

आगाज [ आ + गज् १, १० शब्दे ] मोठा आवाज गर्जना करणें.

आंगे हो [ अंगी भू १ भवने ] स्वाधीन होणें. उ.- एऱ्हवि तऱ्हीं तूप काइसेया गुसलावें। अमृत कां गालुनि आधें करावें । हां गा पाउसी काइ डावे । जेवणें आंगें हो ये ॥ ज्ञा. १०-२९० तियेते जेधवां जें जो मागे । तें ते एकसरे प्रसवो लागे । तेवि विभव तेया आंगे । होउनि आलें ॥ ज्ञा. १०-२८६

आघर [ आ + ग्रह् ९ उपादाने { ग्रह् = घर }] आग्रह करणें, बोलावणें. (आग्रह पहा.)

आघल [ आ + घृ १ सेचने { घृ = घर् = घल् = घळ }] धोत्रावर पाणी आघलणें-शिंपडणें. इतर रूप-आघळ ३.

आघळ १ [ आ + घूर्ण् ६ भ्रमणे { घूर्ण् = घूर् = घूळ् = घळ }] हलवणें, (आघाळ २ पहा) (२) [ आघूर्णनम् (ना.) ] हलवणें. धोत्रें घंगाळांत आघळणें म्हणजे घोळणें. इतर रूप-आघुळ २, आघोळ २. (३) [ आ + घृ १ सेचने { आघर् = आघळ् }] पाण्यांत घालूव हलवणें. (आघल पहा)

आघाळ १ [ आ + घृ १ सेचने आघारयति { आघार् । वृद्धि। आघाळ् }] पाण्यांत घालून हलवणें. (२) [ आ + घूर्ण ६ भ्रमणे ] धोत्रें आघाळणें. इतर रूप-आघल १.

आघुळ १ [ आ + घूर्ण ६ भ्रमणे ] पाण्यांत घालून हलवणें. उ.- धोत्रे आघुळणें (आघळणे) (आघोळ पहा) (२) [ आघूर्णनम् (ना.) ] हलवणें. *(आघळ २ पहा)*

आघोळ १ [ आ + घूर्ण ६ सेचने ] पाण्यांत घालून हलविणें. इतर रूपे-आघुळ, आघळ. (२) [ आघूर्णनम् (ना.) ] हलवणें *(आघळ २ पहा)*

आंघोळ [ आ + घृ १ सेचने ] पाणी अंगावर शिंपडणें-फेंकणें.

आघ्र १ [ आ + ग्रह् ९ उपादाने { आग्रह = आघ्र }] आग्रह करणें. (आग्रह पहा) (२) [ आ + ग्रह् ९ उपादाने आघ्रून ठेवून घेणें.

आंच१ [ अस् ४ क्षेपणे] { अस्य् = अच्य् = आंच }] फेंकणें. (२) [ अंच् १ याचने ] आंचणें.

आचक १ [ आ + चक्क् १० व्यथने, पीडायाम् ] आचके वसणें. (२) [ आ + स्कु ९ आप्रवणे ] एकदम उचलणें, हिसकणे. इतर रूपे-हासक, हसक.

आंचक [ आ + अंच् १ गतौ ] आंत ओढणें.

आचकळ [ आ + स्खल् १ संचलने { आस्खल् = आचूकळ = आचकळ}] अडखळणें, आचखळणें.

आचंव १ [ आ + स्मि १ हसने; { आस्मि = आस्मय् = आचमय् = आचंव } (आस्मयः = आचंया ) ] आचंवणें. (२) [ आ + स्मि १ आश्चर्ये ] आश्चर्य वाटणें. (विचक ३ पहा) (३) [ आ + सम् ४ परिणामे । वैकल्ये { स् = च्; म् = म्य्}] घोटाळ्यांत पडणें,

विस्मयणे, घोटाळणें. (४) [ आश्चर्य (ना.) आश्चर्य ( श्च = च; र्य = व = ब; आश्चर्य =आचय्व = आचंब )]

आचर [ आ + चर् १ गतौ ] वागणें. (१) आचरणें ( आ + चर्) (२) याचरणें (अत्या + चर्) (३) भारणें ( अभ्या + चर्) (४) भादरणें ( अभ्या + चर्) (५) उचलणें ( उत् + चर्) पाचारणें (प्रा + चर्) संचारणें उच्चारणें चाळवणें (चारयति संशययुक्त करणें) विचारणें

आचव १ [ आच्यवनम् (ना.) ] संसाराला आचवणें. (२) [ आ + च्यु १ स्खलने च्यवति { आच्यु गुण । आच्यो = आच्यव् = आचव }] च्युत होणें, मुकणें. उ.- सुखाला आचवली (निरनुस्वार)

आंचव १ [ आ + चम् १ अदने { म् = व् }] हात धुणें (सानुस्वार ) (निचव १ पहा) (२) [ आचमनं ] तोंड धुणें.

आचिव [ आ + शिम् to eat (Whitney) ] चिवडा = शिमटः यांत शिम् धातु आला आहे.

आट १ [ अट्ट १० अनादरे अल्पीभावे {अट्ट = आट्ट = आट } ] कमी होणें. उ.-दूध आटतें. (२) [ अट्ट १० अनादरे, हिंसायाम् ] आटणें. उ.- माझा जीव आटला. इतर रूप-आटेज. (३) [ अड्ड १ अभियोगे । प्रतिघाते { अड्ड = आड्} ] यांवणें. (४) [ आ + तप् १० तपने, तापे, हिंसायाम् ] {त्=ट्} त्रास होणें. (आटव ३ पहा) (५) [ आ + तप् - तपने आतप्यते (कर्मणि) ] उ.- तळें आटणें. (आटव ३ पहा)

आटक १ [ आ + तंक् १ कृच्छ्रजीवने {तं = ट}] (२) [ आ + स्तक् रोधने (अटकाव करणें) { अस्तक् = आटक; हाटक } बोलाविणें. *(हाटक ५ पहा)*

आटकळ १ [ आ + तर्क् + ल (स्वार्थे) १० भाषार्थः { तर्क = टकळ वर्णव्यत्यास ) ] तर्क बांधणें. (२) [ अर्ध + कल = अढ्ढकळ - अटकळ; ईषद् ज्ञाने ]

आटकावि [ आ + स्तक् रोधने ] (हाटक ५ पहा)

आटप १ [ आ + स्तम् ९ प्रतिबंधने (आस्तम विष्टभ - आटप विटप ) { स्तम् = टम् = टप }] (२) [ आ + स्तम् ९ प्रतिबंधने; { आस्तम् = आटप }] निश्चेष्ट होणें, मरणें. (३) [ आ + तुप् १ हिंसायाम् ] (४) [ आतोपनम्-तुप् हिंसायाम् ] आटोपणें. आटोपणें म्ह. संपविणें, शेवट करणें. *(आटोप २ पहा)*

आटर [ आ + थर्व् १ गतौ; { आथर्व् = आठर् = आटर, आटर }] कमी होणें. इतर रूप-आठर.

आटल १ [ आ + टल् (ट्वल्) १ अनादरे { आट्वल् = आटल् }] हलणें, हदरणें. (२) [ आ + ट्वल् १ वैक्लव्ये ] हलणें, हदरणें. (३) [ अटल (ना.) ] स्थिर होणें. (४) [ अष्टिला (ना.) { अष्टिला = अट्टिला = आटळ }] आळणें, घट्ट होणें.

आटव १ [ आ + डप् १० संघाते । संचये ] दूध आटवणें, घट्ट करणें. (२) [ आ + तप् १ संतापे ] { आतप् = आटप् = आटव } उ.- सोने आटवणें, घसा आटवणें. (३) [ आ + तप् तपने, तापे ] पाणी आटवणें. इतर रूप-आट.

आटस [ आ + तञ्च् ७ संकोचने { तञ्च्-टस् } ] कमी होणें.

आटिव [ आ + डिप् १० संचये ] (आडिप = आटिव । प=व ) दूध आटिवणें.

आटुप १ [ आ + स्तुभ् ५,९ रोधने ] थांबविणें, शेवट करणें. (आटोप ४ पहा) (२) [ आ + स्तूप् ४,१० समुच्छ्राये ] { आस्तूप = आटुप } ढीग करणें. *(आटोप ३ पहा)*

आटेज [ अट्ट १ अनादरे हिंसायाम् ] कर्मणि. *( आट २ पहा)*

आटोप १ [ आ + तुप् १ हिंसायाम् ] {तुप्-टुप-टोप} मारणें, संपविणें, शेवट करणें. उ.- त्यानें त्याला आटोपला-मारला. (२) [ आ + तुफ्ः { तुफ्-तुप-टुप-टोप} ] (३) [ आतोपनं - तुप् हिंसायाम् ] आटोपणें म्हणजे संपविणें, शेवट करणें. इतर रूप-आटप ४. (४) [ आ + स्तूप् १० समुच्छ्राये। वर्धने ] { स्तुप्-टोप, गुण (स् लोप) } गर्व होणें. मग आविष्कारला लाकुडे । पावकु जैसा जोडे । तैसी प्राणिदेही सांपडे । आटोपली हे ॥ ज्ञा. १६-२७६. इतर रूप-आटुप २. (५) [ आ + स्तुभ् ५, ९ रोधने { स्तुभ् - टोप }] थांबविणे, शेवट करणे. कर्म आस्तुभ्यत-कर्म आस्तुभ्यत-काम आटोपलें. (६) [ आ + स्तुभ्] सुंद, निश्चल होणें, संपविणें. मरणें. इतर रूप-आटुप १. (७) [ आ + स्तुप् १० समुच्छ्राये ] ढीग करणे (आटुपणें-अशिष्टांत हा उच्चार आहे.) आस्तुभ विस्तुभ् = आटोपणें विटोपणें.

आट [ आ + स्था १ निक्षून सांगणे { स्था = ष्ठ = हृठ = ठ; हृ प्रथम जातो. आस्था = हाठ. } ] उ.- आटून सांगतों कीं, शब्द नित्य आहे-"शब्दं नित्यं" आतिष्ठते. इतर रूप- हाठ.

आठर [ आ + थर्व् १ गतौ थर्व् = ठर् (व् लोप) ] *(आटर पहा)*

ई १ आठव १ ( आ + ध्यै १ चिंतायाम् स्मरणे । आध्यायति = आठवी । आध्यायते = आठवे )

(२) [ अर्थ् १० उपयाञ्चायाम् { अर्थय्-अठव्. सविकरण} ] विनंति करणें. मागणें. उ.- तो संकटांत मला आठवतो. (३) [ अर्थ (ना.) इच्छायाम् ] उ.- वायको नवऱ्यास आठवतें (४) [ अर्थ् १० उपयाञ्चायाम् ] देवाला आठवणें. इतर रूप-अठव २. (५) [ अस्तम् + इ २ गतौ, अस्तमिति मान्तमव्ययम् ] नाहीसें होणें, लोपणें. उ.- संकटावर संकटे कोसळून सारे ब्रह्मांड आठवलें. इतर रूप-अठव १.

आटुर [ आ + स्तृह् ६ हिंसायाम् ( आस्तृह = आस्तृ-ह = आटुर ) ] इजा करणें, आठोरणें. इतर रूप-आठोर

आटुल १ [ आ + स्थूल् १० परिवृंहणे वैपुल्ये ( आ-ष्टूल्-टूल् ) ] स्थूल होणें, घट्ट होणे. (२) [ अष्टील (ना.) { अष्टिल - अटुळ } ] घट्ट होणें. इतर रूपें-आटुळ, अटुळ.

आटुळ [ अष्टील (ना.) ] घट्ट होणें. *(आटुल २ पहा)*

आठोर [ आ + स्तृह् ६ हिंसायाम् { आस्तृह् = आस्तु-हृ = आटुर = आठोर। गुण } ] इजा करणे. (आटुर पहा)

आड् [ अड्ड १ अभियोगे ] हल्ला करणें. (अड्ड्यते = आडे । अड्डयति = आडवी। (सेट्) अड्डित + ल =आडिअल = आडिल

(ला-ली-ले).
(अनिट्) अड्ड + त = अड्ड + ल = आड्ल (ला-ली-ले)

आड १ [ अन्तर्भू १ सत्तायाम् ] आत असणें. उ.-कित्येक फिरंगणांत आडलें. *(अड ५ पहा)* (२) [ अन्तर् + था ३ आच्छादाने ] दडणे, अडून गोळी मारणें. (अड ३ पहा)

आडक १ [ आ + दिह् २ उपचये { दिह् - दिघ् - डिक् - डक् } ] मध्येंच चिकटणें. (२) [ आ + दिह् २ उपचये ] चिकटून गुंतणें. इतर रूप-आडकावि १ (३) [ आ + स्तक् १ रोधने { स्तक् - डक् } ] अडकणे. इतर रूप-आडकावि २ (४) [ आ + टक् बन्धने ] गुंतुन बसणें. (५) [ आ + स्तग् १ आच्छादने ] इतर रूप-आडकावि ३, आडकाय १

आडकव [ आधी + कृ तारण देणें, ठेव ठेवणें ] आडकाविणें. उ.-बँकेत पैसा आडकाविणें. *(आडव २ पहा)*

आडकाव १[ आ + स्तग् १ आच्छादने { स्तग् - टक् - डक } उ.- आंगरखा आडकावणें. (आडक ५ पहा) (२) [ आ + स्तक् १ रोधने ] (आडक ३ पहा)

आडकावि [ आ + दिह् २ उपचये ] चिकटून गुंतणें. (आडक २ पहा) (२) [ आ + स्तक् १ रोधने ] स्तकर्ति, स्तकयति ] आडकणें. (आडक ३ पहा) (३) [ आ + स्तग् १ आच्छादने ] (आडक ५ पहा)

आडखड १ [ अर्धस्कन्द् १ गतौ । अडखड] (उडी मारणें, बोलतांना अडणें. इतर रूप आडखंड १ (२) ] अन्तः स्कन्द् - अडखड ] इतर रूप- आडखंड २.

आडखंड १ [ अर्धस्कन्द् ३ गतौ ] आडखडणें. (२) [ अन्तः स्कन्द् १ गतौ ] आडखडणें *(आडखड २ पहा)*

आडखळ १ [ अन्तः स्खल् १ संचलने ] बोलतांना अथवा चालतांना अडणें. (२) [ अर्धस्खल् ] (३) [ अर्धस्खलनं = अड्डखलण]

आडच् [ आ + दस् ४ उपक्षये ] क्षय होणें. आदस्यते (कर्मणि) = आडचिजे।

आडजा [ अन्तर् + या २ गतौ { य् = ज्} ] मध्यें पडणें.

ई १ आडप् [ आ + दभ् ५ दंभने ] फसवणें । आदभ्यते = आडपे, आडपिजे। फसला जातो। आदभाप्यते = आडपैजे । फसवला जातो ।

आडप [ आ + दृप् ४ हर्षमोहनयोः ] अमर्याद गर्विष्ठ होणें.

आडपड [ अधस् + पत् १ पतने { अधःपत्=अढःपड् = आडपड् } ] खालीं पडणें, नमस्कार घालणें.

आडफट [ अन्तर् + पट् १० भेदने पाटयति { अन्तःपट् = आडफट् } ] आडवें फाटणें, फुटणें. (आडफाट १ पहा)

आडफांक [ अन्तर् + प्र + अक् १ कुटिलगतौ { अन्तः प्र + अक् = अन्तफाक् = आडफाक } ] वेडेवांकडे फांटे फुटणें.

आडफाट १ [ अन्तर् + पट् (णिच्) ] (२) [ अर्ध + पट् (णिच्) ] आडवे फाडणें, फुटणें. इतर रूप- आडफट. (३) [ अन्तर् + स्फट् १ विशरणे ] इतर रूप-आडफाड. (४) [ अन्तर + स्फंट् १ विशरणे ] इतर रूप-आडफांट १, २

आडफांट १ [ अन्तर् + स्फट् १ विशरणे] उ.- तेथ धर्म डाळबहाळी । दिसती

जन्मशाखा सरळी ॥
तिया आडफांटती फळी । स्वर्गादिकी ॥
माडगांवकर ज्ञा. १५-१९३ (आडफाट ४ पहा) (२) [ अन्तर् + स्फट् १ विशरणे ] आडवे फांटे फुटणें. *(आडफाट ४ पहा)*

आडफाड [ अन्तर् + स्फट् १ विशरणे ] आडवें फाडणें. (आडफाट ३ पहा)

आडबुक [ अर्ध + वृध् १ वृद्धौ { अर्ध = आड; वृध् = वुध् = बुध् }]

आडमुठ १ [ अर्धमूढ (ना.) { अर्ध = आड; मूढ = मुठ }] अडाण्यासारखें वागणें. (२) [ अन्तर् मुट् ६ बंधने] मध्येंच आडकावणें.

आडमूठ [ अर्ध + मुह् ४ वैचित्ये ) अर्धमूढ = आड + मुठ् ) ]

आडमोड १ [ अन्तर् + मुट् १० संचूर्णने मोटयति { मुट्-मोट् । गुण । ट् = ड्}] प्रतिवंध करणे. (२) [ अन्तर् + मुट् १ संचूर्णने मोटति ] मध्यें मोडणें. उ.- एकें आडमोडविली । अजंगमाची खाल काढविली । एकें गर्भिणीं उकडविलीं । पुटामाजी ॥ कुंटे ज्ञा. १३-२२८

आडल [ आ + दृ ९, ६ माने { आदर् = आडर् = आडल }] मान देणें, आदर करणें. उ.- मी आत्मा एकु चराचरीं । किं म्हणति एकाचा आडलु करी ॥ आणि कोपीनि एकां मारीं । हें चि रूढवीति ॥ ज्ञा. ९-१६७

आडव १ [ आ + धा ३ धारणे { आधापय = आडवइ = आडवि; आडिव }] बँकेंत पैसा आडवणें, आडिवणें. (२) [ आधी + कृ तारण देणें, ठेव ठेवणें] उ.- दागिने सावकाराकडे आडवून वसलों. इतर रूप-आडकव

आडवर [ अर्वाच् - खाली, अव्यय { अर्वाच् = अर्याच् = अड्वाच् }] खाली पडणें. *(आडवार १ पहा)*

आडवार १ [ अर्वाच् खाली, अव्यय ] खाली पडणें. इतर रूप-आडवर. (२) [ अन्तर् + वृ १० प्रतिबंधे, आवरणें वारयति { अन्तर् = आड; वृ । वृद्धि। वार् }] प्रतिबंध करणें.

आडस १ [ आ + द्रढीयस् (ना.) { आद्रढीयस् = आडस }] घट्ट बसणें. (२) [ अन्तर् + सृ २, ६ उत्पत्ती ] लपविणें. *(आडसु १ पहा)*

आडसु १ [ अन्तर् + सू २, ६ उत्पत्ती (अन्तर् = आड + सु ) लपविणें. इतर रूप-आडस २. (२) [ कर्मणि] लपणें.

आडळ [ अन्तर् + दल् १ भेदे { अन्तर् = आड; दल = डल; आड + डळ = आडळ (वर्णलोप) }] आडखळणें. (आढळ पहा)

आडाव, आडावि [ आ + दु ५ विपत्ती ] दुःखी कष्टी होणें. [ आदु (णिच्) - आदावय् - आडावि. णिच् कर्मणि - आदाव्य - आडाव. निष्ठा - आदावित + ल - आडाइल आडाविल (ला, ली, लें] उ. - तैसे तेया तामसां होये । जें निंदुनि शास्त्रांची सोये । सैघ धांवति मोहे । आडाइले ॥ ज्ञा. १७-१०२

आडुळ, आडोळ - आढळ पहा.

आढ १ [ आढ्य (ना.) आढ्यता याणणें, दाखविणें. (२) [ आ + धि ६ धारणे { धि = ढ }] आंबे आढणें (आढींत पिकण्याकरितां ठेवणें) इतर रूप-आढव (३) [ आ + ध्यै १ स्मरणे { आध्यै = आढ } ताठ होणें,

अडणें.

आढव [ आ + धि ६ धारणे (णिच्) धायय = आढय ] आंवे आढवणें. (आढ २ पहा) आढळ आढळणें. ( या धातूची माहिती लिहिलेली चिठी सांपडली नाहीं.)

आण १ [ आ + नी १ प्रापणे ] जवळ नेणें. (२) [ आह्वानम् - आणाणँ - आणणें ] उ.- राजानें अमात्याला आणून = राज्ञा अमात्यं आहूय. (३) [ आ + अन् अण् २ श्वसने ] श्वासोच्छवास् करणें. (नाम) आणि = श्वास. उ.- तैसी जाणीव जेथ न रिगे । विचारू माघौता वाउलीं निगे । तर्कु आणि ने घे। आंगीं जेयाचां ॥ ज्ञा. ७-५ (४) [ ज्ञा ९ ज्ञाने { ज्ञा - जाना - आण - (सविकरण) } ] मनांत आणतो - मनसि जानाति.

आणव [ आ + नी - (णिच्) आनायय - आणव, आणाव ] इतर रूप-आणाव

आणाव [ आ + नी (णिच्) आनापय = आणाव ] (आणव पहा)

आत [ आ + अत् १ संततगमने अतति ] व्यापिणें.

आतळ [ हस्ततल (ना.) { हस्ततल = हत्तल (वर्णलोप) = पूर्व स्वर दीर्घ = आतळ } ] स्पर्श करणें, चोरी करणें. इतर रूपें-हातळ ४, हाताळ ४.

आताट [ आ + तट् नाशने (णिच्) ताटयति] नाश करणें. उ.- तैसे आज्ञान आताटुनीयां । ज्ञान एत एत उवायां । ज्ञाना ज्ञानें गीळुनियां । ज्ञानचि होय ॥ अमृतानुभव १९१

आतार [ आ + तृ १ प्लवने { णिच् । आ + तारय } आतार्यते ] उद्धरणें. उ- जेव्हलि तुवां देखिले । माझां वदनिं पडिले । तेव्हांचि एयांचें सरलें आतारिती सुखें ॥ ज्ञा. ११-४७१

आतुड १ [ आ + तुड् १ संयोजने सान्निध्ये] जवळ आणणें, प्राप्त होणें, सांपडणें. कर्मणि - आतुड्यते- आतुडे. उ. - गुरुभजनीं आतुडे । ब्रह्मज्ञान विशेष पैं ॥ ज्ञा. (२) [ आ + तुज् १ आदाने लाभे { तुज् = तुद् = तुड् } ] मिळविणें, सांपडणें. (३) [ आतृद् १ हिंसायाम् छेदने { आतृद् = आतुड; ऋ = उ; द् = ड् } ] छेदणें, फोडणें.

आत्राट १ [ आ + तृह् + ट (स्वार्थे) १ हिंसायाम् ] थोपटणें. (२) [ आ + तृह् = { तृढ् = तुट् = त्रट् } ] थोपटणें, थापटणें. उ.-दंड त्राहाटणें म्ह. दंड थापटणें, थोपटणें.

आथ १ [ आ + प्रथ् १० प्रथने (विस्तारे)] प्रसिद्ध असणे. निष्ठा-आप्रथित + ल = आअथिल = आथिला. उ.- कुबेरु आथिला होए । परि तो नेणे चि माझी सोये । संपत्ति मासीं नोहे । श्रीनिवासु ॥ ज्ञा. १६-३५५ (२) [ आ + स्था १ गतिनिवृतौ ( {सुलोप} )] थांबणें, बनणें. उ. - गुणपंचके धरित्री आथिली। (३) [ आ + स्था ] संपन्न होणे.

रंगाथिला- रंगसंपन्न.

चित्ताथिला - चित्तसंपन्न

सत्त्वाथिला - सत्त्वसंपन्न. (आथि २ पहा)

(अस् - अस्ति - अथि ह्या रूपाशीं याचा कांहीं एक संबंध नाहीं.)

(४) [ अर्थ् १० याञ्चायाम् { अर्थ् = अत्थ् = आथ् = आथ ) ] विनंति करणें, मागणी करणें. *(आथि ३ पहा)*

आथर, आंथर, आँथर [ आस्तरणं] हाथर

१ पहा

आंथर १ [ आस्तृ ५ आस्तरणे ] खाली पसरणें. (हाथर २ पहा) (२) [ आ + स्तृ आंथरूण उघडणें. ] (हंतर पहा)

अथि १ [ आ + स्था १ गतिनिवृत्तौ ] थांवणें, बनणें. (२) [ आ + स्था १ राहणें ] संपन्न होणें. इतर रूप-आथ ३ (३) [ अर्थ् १० याञ्चायाम् ] विनंति करणें, इतर रूप-आथ ४ (४) [ आ + भा २ प्रकाशने (आभांति = आहांति=आथि ) ] उ.-कर्णेविण सोपटें। कणिसें लागलीं आथि एक दाटे ।। काइ कराल गोमटें । वोस नगर ।। ज्ञा. ९-४२९. (५) [ अस्ति - अस् २ सत्तायाम् ( अस्ति-अह्ति-आथि)] अस्ति-आथि आणि आभांति - आहांति - आथि हे दोन आथि अगदीं भिन्न आहेत. एक अस् पासुन निघतो व दुसरा आभापासून निघतो.

आथिला [ आस्थित + ल = आथिला ] संपन्न. उ. - पैं राजमुद्रा आथिला। प्रजा भजे भलेतेया । तेवि शास्त्रें स्वीकारिलेयां। मार्गमात्रातें ।। ज्ञा. १८-८४६.

आदव [ आ + दम् १० आज्ञापने { दम् = दब् (घोष लोप}) दावून धरणें. (मान ह्या अर्थी अरवी आदव शब्द निराळा).

आदळ [ आ + दृ ९ विदारणे { आदृ = आदर् = आदल् = आदळ ) ; आ= हा} ] आपटणें. इतर रूप-हादळ ३.

आदोळ [ आ + दुल् १० उत्क्षेपे ] झोके घेणें, हल्णें. *(अदोळ पहा)*

ई १ आधप् [ आ + ध्मापय् । ध्मा। ] होरपळणें । ( आध्माप्यते = आधपे, आधपिजे । आधपितानि आधपिलीं, आधपलीं )

आधप [ आ + दह् १ (णिच्) ज्वलने दहापय् कर्मणि दहाप्यते ] होरपळणें. इतर रूपें - अधप, आधाप.

आधाइ [ अधि + आ + ध्यै १ चिन्तायाम्] आधिग्रस्त झालेला. (अधाध पहा)

आधाध [ अधि + आ + ध्यै १ चिन्तायाम्] अधिग्रस्त झालेला. (अधाध पहा)

आधाधि [ अधि + आ + ध्यै १ चिन्तायाम्] आधिग्रस्त झालेला. (अधाध पहा)

आधाप [ आ + दह् १ (णिच्) ज्वलने { णिच् - दहापय कर्मणि - दहाप्य - आधाप }] होरपळणें. (आधप पहा)

आधें १ [ आ + धे १ पाने (आधाय्यम्) { आधेय = आधे} ] पिण्याजोगे. उ.- एरव्हीं तऱ्हीं तुप काइसेयां गुसलावें । अमृत कां गाळुनु आधें करावें। हां गा पाउसीं काइ डावे । जेवणें आंग होये ।। ज्ञा. १०-२९०. (२) [ आ + धे १ चोषणे आधेय ] चाटण्याजोगें, चोखण्याजोगें. उ. - वरील पहा.

आनंद [ आ + नंद् १० आनंदने ] आनंद, सुख होणें.

आप [ आप् ५ प्राप्ती ] पावणें, प्राप्त होणें.

आपंग १[ आ + पंगु (ना.) ] विकलित होणें. (२) [ आ + प्र + अंग् १ गतौ ] एकाद्याच्या जवळ जाणें.

आपज १ [ आ + पद् ४ गती ] { आपद्यते - आपजे कर्मणि } ] मिळणे, प्राप्त होणें, उत्पन्न होणें, भासणें. (२) [ आ + पद् ४ { आपद् नाम} ] संकट येणें.

आपदाव [ आपदा (ना.) { आपदाय = आपदाव }] संकटांत असणें.

आपट [ आ + पट् १ विदारणे { आ = हा, सघोष स्वर } ] हापटणें, आदळणें.

आपाद [ आ + पद् (णिच्) ४ प्राप्ती { पद् - पाद्य् }] संपादणें.

आपार [ अप + ऋ ३ गती { ऋ = आर् वृद्धि }] ओसरणें, उतार होणें, इतर रूप-अपार.

आपुषि [ आ + पुष् १ हिंसायाम् ] गांजणें. इतर रूपे-हापुट १, हाफुट १, हाफट २, हफुट १, हफट.

आप्लव [ आ + प्लु १ प्लुतौ ] उडी मारणें (ज्ञानेश्वर).

आफट १ [ आ + स्फट् १ विशरणे ] इतर रूपे-हाफट ४, आंफट, हांफट. (२) [ आस्फुटनं ] (हाफट ३ पहा)

आंफट [ आ + स्फट् १ विशरणे ] हाफटणें.

आफड १ [ आ + स्पृश् ४ स्पर्शने { स्पृश् = फट् = फड् }] स्पर्श करणें. (२) [ आ + स्फंड् उपहसने { स्फंड् = फड ( स् लोप) आस्फंडयते = आफडे.}] मानभंग करणें.

आंफळ १ [ आ + प्लु १ प्लवने आप्लवनं { आप्लु-आफळ }] घुणें. (२) [ आ + फल् १ निष्पतौ ( आ = ईषत्) ईषत्फलनं ] थोडे पिकणें, उमलणें. (३) [ आ + फल् १ विशरणे { आ + ईषद् }] अर्धवट पिकणें, शिजवणें. (४) [ आ + स्फल् १० ताडने ] फाडणें, फाळणें, हापटणें. (५) [ आ + स्फल् = आस्फाल् १० ताडने ( आ = आधिक्य) { स् लोप}] जोरांत हाणणें. (६) [ आ + स्फाल् १० ताडने ] जोरांत हाणणें. (७) [ आस्फालनम् (ना.) ] जोरानें आपटणें. (८) [ आप्लवनम् (ना.) ]

आफाव [ आ + स्फाय् (णिच्) १ विताने वृद्धौ स्फावयति { स्फाय् = स्फाव् = फाव }] वाढविणें. उ- आगम आफाविले-वेद वाढविले.

आफुड [ आ + स्फुंड् १० उपहसने (आस्फुंडयते (कर्मणि) आफुडतो ) ] चेष्टा करणें, अपमान करणें.

आंव [ अम् १० रोगे { अम् = आमय = आंव }] आंवट होणें. उ.- अन्न आंवतें.

आंबट [ आम्लिष्ट (ना.) ] आंवट होणें, आंवण.

आंव्व १ [ अंव (ना.) { अंबय = अंबव}] मुद्दाम आंबट करणें. (२) [ अम् १० रोगे { आमय् = आंवय् = आंवव}] (३) [ अंव (ना.) अंबु = पाणी ] अंववणें, पाणी पाजणें. उ.- ऊस लावल्यावर एक आठवड्याने त्याला प्रथम आंबवतात-पाणी पाजतात. (अंबव पहा)

आवळ १ [ आविल (ना.) { बिल = बळ}] संकटांत पडणें. (२) [ आ + बाध् १ लोडने { बाध् = बाढ् - बाळह् - बळ }] संकटांत पडणें, हाल होणें.

आवाळ [ आ + बाध् १ लोडने { बाध् = बाढ् - बाळ् }] हाल होणें.

ए १ आवुख् [ अभि + उख् १ गतौ ] पसरणें. सर्वत्र जाणें.

ई १ आंवुख् [ सम् + अभि + उक्ष् १ सेचने ] शिंपडणें.

आंवुख [ अभि + उख् १ सेचने { भि + उ = ब् + हि + उ = हलोप्, अनुस्वारागम }] शिंपणें.

आवुथ १ [ आ + वि + उत् + स्था १ अभियोगे { आव्युत्था = आवुध }] विपरीत होणें. (२) [ आ + अभि + उत् + स्था १ अभियोगे { आभ्युत्था = आवुथ }] उठणें.

आंवुथ [ अभि + उत् + इन्ध् १ दीप्तौ { अभ्युदिंध् = अभ्युदिह् = आंवुथ}]

प्रदीप्त करणें, पेटवणें.

आंवुस [ आम्लीयस् (ना.) (तरभाव) ] किंचित् आंवूस होणें.

आभर [ आ + भृ ३ धारणे ] आवरण घालणें. (आभरः = आभ्रा. उ.- गाधा, तक्के आभरणें.

आभास [ आ + भास् १ प्रकाशने ] प्रकाशणें, वाटणें.

आम [ अम् १० रोगे ] दुखणे. उ.- हाडे आमलीं.

आयताव [ आ + यत् १ प्रयत्ने ] प्रयत्नाशिवाय मिळणें.

आयास [ आ + यस् ४ प्रयत्ने आयासय् (नाम) { आयासय् = आआस् = आस }] त्रास करून घेणें. उ. - असा आसूं किंवा आयासूं नकोस. इतर रूप- आस१.

आर १ [ आ + ऋ३ गती { आ + ईषत्। आर् वृद्धि }] संकोच होणे, आकुंचित होणें. (२) [ आ + हृ १ भक्षणे । वृद्धि । आहारय् ] पोट भरून जेवणें; इतर रूप-आहार ३ (३) [ सम् + हृ] संकुचित करणें. (हार ३ पहा)

आरड १ [ आ + रट् १ शब्दे (आरट् = आरड् ) ] मोठा शब्द करणें. इतर रूप-ओरड २ (२) [ अव + रट् १ शब्दे ] मोठा शब्द करणें. इतर रूप- ओरड १. (३) [ उत् + रट् १ शब्दे] मोठा शब्द करणें. इतर रूप-ओरड ३

आरत [ आ + वृत् १ वर्तने { आवृत् = आरत् }] परत फिरणें.

आरंवळ १ [ आ +ऋंज् + प्लुष् = ऋंज् १ भर्जने, प्लुष् ४ दाहे ] अत्यंत पोळणें, होरपळणें. (२) [ आ + रंव् १ शब्दे { आरंव् + ल ( स्वार्थे) आरंवळ }] वरळणें, वडवडणें. इतर रूप-आरंभळ

आरंभळ [ आ + रंव् १ शब्दे ] वरळणें, वडवडणें. *(आरंवळ २ पहा)*

आरव [ आ + रु २ शब्दे { आरु । गुण। आरव् }] ओरडणें. (कोंवड्याचे ओरडणें.

आराअ [ आ + राध् ५ ससिद्धौ { आराध् = आराह् = आराअ }] समाधान होणें. निष्ठा-आराधित + ल = आराइल (ला-ली-ले). नाम- आराधनिका - आराणुक. इतर रूप - आराइ ३

आराइ १ [ आ + ऋ ३ गती (णिच्- आरयति; आरापयति. आर्यते-वैदिक, अर्पयति)] अर्पण करणें. इतर रूप- आरायि. (२) [ आ + राध् ५ संसिद्धौ { आराधि = आराहि = आराइ}] अनुकूल असणें. (३) [ आ + राध् ५ संसिद्धौ ] समाधान होणें. *(आराअ पहा)*

आराध [ आ + राध् ५ पूजायाम् ] पूजिणें.

आरायि [ आ + ऋ ३ गती ] अर्पण करणें. *(आराइ १ पहा)*

आरुथ [ अर्थ्य १० उपायाञ्चायाम् ] मागणें. *( अर्थि पहा)*

आरुह [ आ + रुह् १ प्रादुर्भावे ] चढणें. *(आरोह पहा)*

आरूढ [ आ + रुह् १ प्रादुर्भावे ] { निष्ठा-रूढ (नाम) चढणें.

आरेख [ आ + रिख् १ नियंत्रणें { गुण। रिख् = रेख् }] ताब्यांत ठेवणें.

आरोग १ [ आ + रुच् १ रोचने (गुण) (च् = क् = ग् ) ] अन्नाची चव घेणें, जेवणें. (२) [ आ + रुज् ६ पीडायाम्] पीडित होणें.

आरोप [ आ + रूह् (णिच्) रोपय् ] रूजवणें, राहणें.

आरोह [ आ + रुह् १ प्रादुर्भावे { निष्ठा - आरूढ + ल = आरूढल (ला-ली-ले)} ] घढणें, आरूढणें असें क्रियापद नाहीं (माडगांयकर ) इतर रूप-आरुह

आरोळ [ आ + रुद् २ आक्रोशे रोदिति ] ओरडणें.

आर्जव १ [ अर्ज् १ प्रार्थने ] आर्जवणें. (२) [ ऋजु (ना.) ] आर्जवणें.

आर्जू [आजुर् (नाम) ] मोलाशिवाय काम करणें.

आल [ अल् १ पर्याप्तौ {णिच् आल्य } ] आंबा आला (आम्रः फलैः अलितः पर्याप्तः) उ - पै आघवांचि रोममूळीं । आला स्वेदकणीं निर्मळीं ।। लेइला मोतियांची कडियाळी । आवडे तैसा ।। ज्ञा. ९-५२४ इतर रूप-आळ ६

आलंग [ आ + लंघ् १ आक्रमणे ] ओलांडणें, वर चढणें. *(आलंघ पहा)*

आलंघ [ आ + लंघ् १ आक्रमणे ] ओलांडणें, वर चढणें. उ.- हा गा राज्ञत्व नव्हतां आंगिं । रावो आपण काइ भोगी ।। कीं आंधारु हा न आलंगी । दिनकरातें । ज्ञा. १८-११३८ इतर रूप- आलंग.

आलव १ [ आ + लप् भाषणे { आलप् = आलव = आळव }] आलवणें. उ.- स्वरूपतरी देखे । आलविलें आइके ।। शब्दु बोले मुखें । परि ज्ञान नाहीं ।। ज्ञा. ५-५८ (२) [ आ + लप् १ भाषणे ] आलाप घालणें. इतर रूप आळव १

आलाप [ आ + लप् १ शब्दे ] इतर रूपे- आलापि, आलाफि.

आलापि [ आ + लप् १ शब्दे ] तान घेणें, गाणें. (आलाप पहा)

आलाफि [ आ + लप् १ शब्दे ] तान घेणें, गाणें. *(आलाप पहा)*

आलाव [ आ + लाभ् १० प्रेरणे { लाभ् = लाव् । घोष लोप } ] प्रेरणें, प्रेरणा करणें. उ. -तैसा अहंकारु आलावला । दर्पु कामक्रोधीं रूढला ।। एयां दोहींचा मेळा। जेयांचां ठांइं ।। ज्ञा. १६-३९४

आलाव [ आ + अल् १० सामर्थ्ये { आलाय-आलाव } ] समर्थ होणे, बळास येणें.

आलिख [ आ + लिह् २ आस्वादने ( ह् = ध् = ख् ) ] गोठणें, घट्ट होणें, आळणें. उ - आगा हींव आलिखलें । तें हिमवंतु जेवि जालें ।। नाना दूध मुराले । दध्याकारें ।। ज्ञा. १४-३७३

आलिंग [ आ + लिग् १ गतौ लिंगति ] जवळ जाणें, भेटणें.

आलुक [ आ + रूक्ष् १० पारुषे रूक्षयति (कर्मणि - आरूक्ष्यते - आलुक. निष्ठा - आरूक्षित + ल - आलुकैल - ला - ली - लें ) ] कृश होणें. उ.- जिहिं आपणपें नाहिं देखिलें । ते चि ही इंद्रियार्थी रंजले । जैसें कां आलुकैलें । तुषान्न सेवी ।। ज्ञानेश्वरी ५-१०९

आव १ [ आ + वप् १ बीजसंताने ] पेरणें, लावणें, आंवणें. (आंव १ पहा) (२) [ आ + वा २ गतौ ] (जेवणानंतर) हात कोरडे करणें. इतर रूप-आंव २ (३) [ आ + वै १ शोषणे { आवाय् = आव } ] (जेवणानंतर) हात कोरडे करणें. इतर रूप-आंव ३ (४) [ आ + इ २ गतौ { इ = य् = व् } ] येणें. { आवैल-येईल} (५) [ आ + या २ आगमने] जवळ येणें. उ.- आपुला मुकुटीं सर्वथा। चंद्रु बैसो आलां समर्था परी । चंद्रुची चंद्राचीए माथां । आऊँन एकीं ।। अमृतानुभव ३७२ जुनी पोथी (६) [ अव् १ अवाप्तौ ] मिळविणें,

संपादन करणें. उ. - पेरिजे नुसदी हिंसा । तेथ आवैल काय अहिंसा ॥ परि नवलु बा धिवंसा । याज्ञिकांचा । ज्ञा. १३-२२३

आंव १ [ आ + वप् १ बीजसंताने { आवप् = आयव् = आऽव् = आंव} ] पेरणें, लावणें, इतर रूप-आव १ (२) [ आ + वा २ गतौ ] जेवणानंतर हात कोरडे करणें. (आव २ पहा) (३) [ आ + वै १ शोषणे ] जेवणानंतर हात कोरडे करणें. (आव ३ पहा)

आवग १ [ आ + भंज् ७ विभागे ( आभंज् = आभग् = आव्हग् = आवग ) ] स्वीकारणें, भाग घेणें. (२) [ आ + मृग् १० शोधने { आमृग् = आवग् । ऋ = अ } ] स्वीकारणें. (३) [ आ + वक्क् १ गतौ { क्क् = क् = ग् } ] वाईट मार्गाने जाणें. (४) [ अव + वक्क् १ गतौ { अव् + वक्क् - (व लोप) क्क् = ग } ] वाईट मार्गानें जाणें. (५) [ आ + वक्, वग् १ वक्रगतौ ] वांकडे चालणें, वांकड्या रस्त्याने जाणें, पूर्वपरंपरा सोडणें. इतर रूप-आवंग. (६) [ आ + वघ् १ गतौ { णिच् - आवंघयति } ] जोरांत हलविणें, चळवणें. उ.- इंधनाचेनि आकारें । अग्नि जैसा अवतरे ॥ कां आवगे तरुवरें । भूमिरसु॥ ज्ञा. १४-२७९ (७) [ आ + वष्क् १० दर्शने { वष्क् = वक्क् = वग } ] स्वीकारणें. *(अवग १ पहा)* (८) [ अव + वष्क् १० दर्शने { अव + वष्क् = व् लोप ष्क् = क् = ग् } ] दिसणें. *(अवग २ पहा)* (९) [ आ + वृक्ष् १ आवरणे ( वृक्ष् = वक्ष् = वक्क् = वग् ) निवडणें. उ.-वरील- ज्ञा. १४-२७९

आवंग १ [ आ + वंग् १ वक्रगतौ ] वांकडे चालणें. (२) [ आ + वंक् १ वक्रगतौ ] वांकडें चालणें.

आवट १ [ आ + वट् १० विभजने ] बाकी रहाणें, उरणें. इतर रूपे-आंवट १, आवंट १ (२) [ आ + वंट् १० विभजने ] शिल्लक राहाणें, उरणें. (३) [ आ + वट् १० ग्रंथे ] एकत्र जुळणें.

आंवट १ [ आ + वट् १० विभजने ] उरणे, अवशिष्ट राहणें. (आवट १ पहा) (२) [ आ + वंट् १० विभजने] उरणें, अवशिष्ट रहाणें. (आवट २ पहा) (३) [ आ + वंड् १ विभजने { ड् = ट् } ] शिल्लक रहाणें, उरणें. (४) [ आ + वृंत् (ना.) {वृंत = वट} ] शिल्लक रहाणें. उरणें.

आवंट १ [ आ + वट् १० विभजने ] बाकी रहाणें, उरणें. (आवट १ पहा) (२) [ आ + वंट् १० विभजने ] शिल्लक रहाणे, उरणे. *(आवट २ पहा)*

आवटाळ [ आ + वट् १० विभाजने { वट + ल (स्वार्थे) } ] एकत्र जुळणें.

आवड [ आ + पद् ४ स्थितौ प्राप्तौ { आपद् = आवड् = आवड } ] स्थिति प्राप्त होणें. उ. - कां घराआंतुल एक । दीपाचा अवलोक । गवाक्षभेदें अनेक । आवडे जेवि ॥ ज्ञा. १८-३२८ कुंटे.

आवत [ आ + मन्त्र् १० आह्वयने { मन्त्र् = वत } ] बोलावणें. (जेवण्यास) इतर रूप-आवंत

आवंत [ आ + मन्त्र् १० आह्वयने { मन्त्र् = वंत } ] जेवण्यास बोलायणें.

*(आयत पहा)*

आवर १ [ आपारणम् (ना.) { प् = व् }] गोळा करणें. (२) [ आ + वृ ५ वरणे ] एकत्र करणें.

आंवर [ अंवर्यते - (कर्मणि) मीलने { बर्य = यर } ] गोळा करणें, एकत्र करणें. उ.- गुरे, कुत्री आंवरणें. (ना. आंवराआंवर).

आवर्जि [ आ + वर्ज् १ वर्जने ] सोडणें, गाळणें.

आवर्जून [ आ + वर्ज् २ वर्जने { वर्जयित्वा = वज्जूण = आवर्जून }]

आवर्त [ आ + वृत् १ वर्तने ] पुनः पुनः फिरणें-करणें. इतर रूप-आवर्तवि.

आवर्तव [ आ + वृत् १ वर्तने {णिच् - आवर्तय् = आवर्तव }] पुनः पुनः फिरणें-करणें, सभोवती सारखें फिरणें. उ.- तेवि द्विजांसि ब्रह्मसूत्र । येरां स्तोत्र कां नाममंत्र ।। आवर्तवणें पवित्र । पावेया तत्त्व ।। ज्ञा. १६-१०३

आवर्तवि [ आ + वृत् - (णिच्) { आवर्तय् आवर्तव-वि } भोंवतीं फिरणें. *(आवर्त पहा)*

आवळ १ [ आ + कुल् १ संस्त्याने { कुल् = उल् = वळ } ] बांधणें. (२) [ आकुली कृ ] (३) [ आ + मृद् ९ क्षोदे { मृद् = वृद् = वद् = वड् = वळ्} ] घट्ट बांधणें, रस काढणें. (४) [ आ + वल् १ संवरणे ] घट्ट बांधणें. (५) [ आ + मील् १ नीमेषणे ] डोळे आवळणें. इतर रूप-आवीळ (६) [ आ + कुलयति = आउळ ( आकुलं = आउल = आवळ ] घट्ट बांधणें. (७) [ आकुलनम् (ना. ) १ संस्त्याने ]
(आकुळ पहा)

आवांक १ [ आ + वक्ष् १ रोषे । धैर्य करणें, शक्ति वाटणें. { आवांका = शक्ति (नाम) } (२) [ आ + यच् वैदिक - आमन्त्रणे ] बोलविणें. उ०- तरी जीवी ऐसे आवांके । म्हणे दास्य करी न नीके ।। जवं गुरु कवतिकें । माग म्हणति ।। ज्ञा. १३-४०३ (३) [ आ + वच् १० परिभाषणे ] बोलणें. (४) [ आ + वक् १ गतौ ] गोळा बेरीज करणें. उ.- पैं उगेपणा तुझिया । हा अभिप्रावो की धनंजया । जे एकवेळ आवांकुनियां । सांगावे ज्ञान ।। ज्ञा. १८-१३३७ कुंटे. (५) [ आ + वख् १ गतौ ] गोळा बेरीज करणें. (उदा. वरील) (६) [ आ + वग् (इ) १ गतौ ] गोळा बेरीज करणें. (उदा. वरील) (७) [ आ + वक् १ गतौ ] एकत्र करणें.

आवांकि [ आ + वच् १० परिभाषणे, वंच् १० प्रलंबने { आवंच = आवांचय् = आवांकि }] -अमृतानुभव.

आंवांह १ [ आ + वह् (णिच्) प्रापणे, आवाहय ] बोलाविणें. (२) [ आ + ह्वे १ शब्दे ] बोलाविणें.

आविक १ [ आ + मिक्ष् १ सेचने { क्ष् =क् }] उ. - अन्न आविकलें = कुजून पाणी सुटलें. (२) [ आ + मिह् १ सेचने { ह् = घ् = क् }] (३) [ आ + वि + पक्क (ना.) ] (४) [ आ + वि + पक्क (ना.) (आविविक्क-अर्धमागधी) ] जास्त पिकणें, सडणें.

आविष्कर [ आविस् + कृ ८ प्रकाशने ] बाहेर येणें, दिसणें. दाखविणें, उघड करणे.

आविळ १ [ आ -+ पीड् १० पीडायाम् { पीड् = विळ्; प् = व्; ड् = ळ् }] दावणें. (२) [ आ + मिल् ६ श्लेषणे { म् = व्; ल् =ळ्}]

आवीळ [ आ + मील् १ निमेषणे ] डोळे मिटणें, डोळे आवळणें. (आवळ ४ पहा)

आवुळ [ आकुलनम् (ना.) ] मान आवुळणें=अवघडणें. (आकुळ पहा)

आवेश १[ आ + विश् ६ प्रवेशने ] आंत जाणें, प्रवेशणें, व्यापणें. (२) [ आ + विश्स ६ प्रवेशने (तत्सम)] संचार होणें; आनंद, क्रोध वगैरे विकारांचा संचार होणें.

आंवंज [ अव + व्रश्च ६ छेदने { अव + व्रश्च = अवंश्च (वर्णलोप, अनुस्वारागम) - अवंच्; च् = ज् = आवंज }] भाताचीं रोपें उपटून लावणें.

आव्ह [ आ + ह्वे १ शब्दे ] बोलावणें.

आव्हास [ आ + भास् २ प्रकाशने { भ् = व्ह् }] प्रकाशणे.

आशाव १ [ आशाया (ना.) { य=व} ] आशा लावणें. {आसावणे; श=स} (२) [ आशा (ना.) ] आशा लावणें. इतर रूप-आसाव.

आश्र [ आ + श्रि १ सेवायाम् ] आश्रय घेणें. इतर रूपे-आश्रि, आश्रय, आश्रे.

आश्रय [ आ + श्रि १ सेवायाम् ] आश्रय घेणें. *(आश्र पहा)*

आश्रि १ [ आ + श्रि १ सेवायाम् ] आश्रय घेणें. (ज्ञानेश्वरी) (आश्र पहा) (२) [ आ + श्रि १ कडे जाणे ] (३) [ आ + श्रि १ सेवायाम् ] आश्रय करणें.

आश्रे [ आ + श्रि १ सेवायाम् ] आश्रय घेणें. *(आश्र पहा)*

आश्लेष १ [ आ + श्लिष् १ आलिंगने ] चिकटणें. (२) [ आ + श्लिष् ६ आलिङ्गने ] आलिंगन देणें, भेटणें. ज्ञानेश्वरी.

आस १ [ आ + यस् ४ प्रयत्ने { यस् = इस् = स् = आस } ] प्रयत्न करणें. कष्ट करणें. (आयास पहा) (२) [ आशा (ना.) ] आशा करणें, इच्छिणें, इच्छा करणें. (३) [ आस् १ उपवेशने] बसणें उ - खुर्चीवर, बिछान्यावर आस.

आसड १ [ आसाद (नाम) पीडायाम् { द् = ड् }] हल्ला करणें. (हासडणे, अ=ह) इतर रूप-हासड १. (२) [ आ + सट्ट् दुखापत करणें ] *(सडक २ पहा)*

आसल १ [ आ + शल्ल् १ गती { आ + ईषदर्थे }] मंदगतीनें चालणें. (२) [ आ + शल्ल् १ गती ] मंदगतीनें वाहणें.

आसस [ आ + शंस् १ स्तुती ] इच्छिणें. इतर रूप-आसास.

आसास [ आ + शंस् १ स्तुती ] इच्छिणें. *(आस पहा)*

आसंस [ आ + शंस् १ स्तुती ] स्तुति करणें, वर्णन करणें. उ. - आघवेयां येका सेव्य जैसें उदक । तैसे जेयातें लोकां आसंसीती ॥ ज्ञा. १२-२०४

आसळ [ आ + शल् १ गती १ शल्ते { श् =स् ल् =ळ् }] उसळणें.

आसार [ आ + सृ १ गती { सृ = सार् (वृद्धि) }] पसरणें.

आसाव [ आशा (ना.) { आशाय = आसाव}] आशा करणें, इच्छिणें.

आसास १ [ आशा + स्यति { शास्य = सास }] अतिशय इच्छा करणें.

(२) [ आ + श्वस् २ प्राणने {श्वस् = सस् }] श्वास टाकणें. (आसासा-उसासा । नाम) (३) [ आ + शास् २ इच्छायाम्] इच्छिणें.

आसुज [ आ + श्यै ईषत् (थोडेसें) सुजणें] *(सुज पहा)*

आसुड [ आ + घुट् ६ छेदने घुटति { आघुट=आसुट्=आसुड्=आसुड }] झटकणें. इतर रूप- आंसुड.

आंसुड [ आ + घुट् १० छेदने घुंटयति { आघुट = आघुंटय् = आंसुड }] झटकणें. *(आसुड पहा)*

आस्कार [ आ + सत् + कृ ८ करणे { आसत् + कार { त् लोप }] सत्कार करणें. *(अस्कार २ पहा)*

आस्तर [ आ + स्तृ ९ आच्छादने ]

आस्फुर [ आ + स्फुर् ६ स्फुरणे ] स्फुरणें.

आस्वाद [ आ + स्वद् १ आस्वादने ] रुचि घेणें.

आह १ [ आ + भा २ प्रकाशने { आभा = आहा = आह }] प्रकाशणें, चकाकणें. आभाति = आहे, आथि (ज्ञानेश्वरी) आभांति = आहांति (ज्ञानेश्वरी) सुर्यो पाहे । ज्ञानेश्वरी. *(आहा १ पहा)* (२) [ आ + भू १ सत्तायाम् { आभू = आभव् = आहव् = आह } ] असणें. उ. - मी आहें तो तूं ये = यावदहं आभवामि तावत् आगच्छ. (३) [ अर्ह् १ पुजायाम् { अर्ह् = आह् र् लोप; आदि दीर्घ }] उ. - ते पाय खांडणें आहे? तान्? पादान् खंडितुम् अर्हयते किं? हां गा मार्ग दुवाड होये । तरी निस्तरितील पाये । कीं तेचि खांडणे आहे. मार्गापराधें ॥ ज्ञा. १८-१८० कुंटे.

आहट [ आ + घट्ट् १ चलने { घट्ट - णिच् - घट्टय. घ् = ह् }] चमच्यानें घोटणें. इतर रूपे-आहाट, हाट, घाट.

आहण [ आ + हन् २ हिंसायाम् ] मारणें. आहत + ल = आहाल - ला-ली-लें *(आहाण पहा)*

आहल १ [ आ + हृ १ मेलने, हरणे] जमवणें. कर्मणि - आहलणें = जमणें. इतर रूप-अहल १,२ (२) [ आ + हत + ल = आहळल. निष्ठा. ] उ.- म्हणौनि वहिला उठीं । मियां आहाले तूं निवटीं । न रिग शोकसंकटीं । नाथिलिये ॥ ज्ञा. १९-४७२. इतर रूपें-हणल, हाणल, हंटल.

आहळ १ [ आ + भा २ प्रकाशने { आ + भा + ल (स्वार्थे) = आहाळ } ] पोळणें, भाजणें. (आहाळ पहा) (२) [ आ + भाल (ना.) { भाल = हाल = हळ }] भाजणें, पोळणें. (आहाळ पहा) (३) [ आ + ह्वल् १ चलने { ह्वल् = हळ = व् लोप }] हालविणें. *(आहाळ पहा)*

आहा १ [ आ + भा २ प्रकाशने { भ् + ह् }] आहासि-ज्ञानेश्वरी. आभाति = आहे आथि (ज्ञानेश्वरी). इतर रूप-आह १ (२) [ आ + हु ३ दाने, प्रीणने ] पोळणें, भाजणें.

आहाच [ आ+ भास् (नाम) { आभास् = आहाच् - आहाचु }] वरवर दिसणें.

आहाट १ [ आ + घट्ट णिच् १ चलने { आघट्टय (णिच्) आहट्टय = आहाट}] घोटणें, घट्ट करणें. (२) [ आघाटनम् (ना.) { घ् + ह् }] घट्ट करणें, घाटणें (वरण वगैरे) (३) [ आ + घट्ट् (णिच्) घट्टयति ] इतर रूपे-हाट, घाट.

आहाण १ [ आ + हन् २ हिंसायाम् { न्

= ण् }] मारणें. इतर रूप-आहण. (२) [ आघातन (ना.) { घ् + ह् }] मारणें.

आहार १ [ आहारयते ] जेवून जड होणें. (२) [ आहृ १ अदने ] अति खाऊन मंद होणें. (३) [ आहारय् ] पोट भरून जेवणें. *(आर २ पहा)*

आहाल [ आ + हन् २ हिंसायाम् { न् = लँ = ल् }] मारणें.

आहाळ १ [ आ + भा २ प्रकाशने ] पोळणें, जाळणें, भाजणें. (२) [ आ + भाल (ना.) { भ् = ह् }] पोळणें, भाजणे. (३) [ आ + हरस् (ना.) ज्वलतो नामानि, निघंटु (हरस् = आहाळ) ] पोळणें, जाळणें. (४) [ आ + ह्वल् १ गतौ ] हालविणें. इतर रूप-आहळ

आहोट [ अपभृष्टिः (ना.) (अपमृष्ट = अवहट्ट = ओहाट ) कमी होणें. अपमृष्टिः = आहोटी.

आव्हास [ आ + भास् १ प्रकाशने { भ् = व्ह् }] आभासणें, वाटणें.

आळ १ [ आ + लिह् १ आस्वादने (लिह् = लिढ् = लिळह् = ळह् = ळ ) गोठणें, घट्ट होणें. आळिवणें. = घट्ट करणें. (२) [ आ + ली ४ लोपे ] संपणे, नाहीसे होणें. (३) [ आ + ली द्रवीकरणे ] चिकटणें, घट्ट होणें. (४) [ आ + ली ४ श्लेषणे ] एकत्र चिकटणें. (५) [ आ + ली १ द्रवीकरणे ] स्थिरावणें, चिकटा होणें. उ.- पिठलें आळलें. (६) [ अल् १ पर्याप्तौ ] आलणें. *(आल पहा)*

आळप १ [ आ + लिप् ६ उपदेहे ] वांधणें, गुंडाळणें. इतर रूप-अळप. (२) [ आ + लू ९ छेदने ] कापणी करणें (लावणी -आळपणी)

आळव १ [ आ + लप् ६ शब्दे { लप् = ळव् }] स्तुति करणें. (आलव पहा) (२) [ आ + लप् १ भाषणे ] आलाप घालणें. (आलव २ पहा) (३) [ अल् १ भूषणे { (णिच्) (आलय = आळव)} ] स्तुति करणें, भूषविणें. (४) [ अर्ह् १ पूजायाम् अर्हयति (अर्ह् = अरूह् = अळह् = अळअ = अळव)] पूजणें, स्तुति करणें.

आळस [ आ + लस् १ क्रीडने { ल् = ळ} ] आळस येणें, जड होणें. इतर रूप – आळसाय.

आळसाव [ आ + लस्य (ना.) { आलस्यय = आळसाव } ] मंदता, जाड्य येणें. *(आळस पहा)*

आळिव [ आ + लिह् ४ उपदेहे ] घट्ट, चिकटा करणें.

आळुक १ [ आ + लुष् १० हिंसायाम् ] नागवणें. (२) [ आ + लूष् १० हिंसायाम् { लूष् = लुक् } ] नागविणें. उ. - जिहिं आपणपें नाहिं देखिलें । ते चि हीं इंद्रियार्थी रंजले । रंक आळुकेलें। तुषातें सेवी ॥ (नागवलेला भिकारी तूस खातो) ज्ञा. ५-११० मांडगांवकर.

## इ

इघ [ इख् १ गतौ, { घ् = ग् + ह् = क् + ह् }] जवळ जाणें. (न + इघणें = नेघणें. ) उ. - विचार जेथ न रिगे । हेतु जेथ नेघे ॥ जें द्वैत दोषसंगें । सिंपे चि ना ॥ ज्ञा.४-१४९. इतर रूप - नेघ.

इचकट [ हिष्क् १० हिंसायाम्; हिष्कट

(ना.) ] तोंड येडें यांकडे करणें. *(हिवक २ पहा)*

इछ [ आप् - ईप्स् – इच्छायाम्; { ईप्स् = ईछ.) सन्नन्त }जयळ असण्याची, मिळविण्याची इच्छा करणें.

इजळ १ [ ईज् १ गतिकुत्सनयोः ] दोषार्ह येणें, दोष येणें. उ. - दूध इजळणें. (२) [ इज्, इंज् ६ निन्दायाम्; { इंज् + ल स्वार्थे } ] दोष उत्पन्न होणें, नासणें, विघडणें. (३) [ इंजल (ना.) (दोष) ] दोष उत्पन्न होणें, विघडणें.

इवळ १ [ वि + इल् ६ स्वप्ने ; { विवळ = इवळ } ] गाढ झोंप न येणें. (२) [ वि + लप् १ शब्दे ] दुःखामुळें तोंडातून कष्टानें शब्द येणें, कण्हणें. (३) [ विव्हल (ना.); { विव्हल - वियळ, इवळ } ] (विव्हल = बेंवळ असा अपभ्रंश ज्ञानेश्वरींत होतो. (विवळ ४ पहा) (४) [ वि + ळप् १ शब्दे; { विलप् = इळव् = इवळ वर्णव्यत्यास} ] उ. - झोपेंत इवळतो. - स्वप्ने विलपति (विवळ २ पहा) (५) [ विव्हलनम् ] इतर रूप - विवळ

इसक [ वि + स्कु ९ आप्रवणे ] जबरीनें घेणें. *(हिसक २ पहा)*

इसकट [ हिष्क् हिंसायाम् - हिष्कट (ना.)] *(हिचक २ पहा)*

इसकड [ हिष्क् हिंसायाम् - हिष्कट (ना.)] *(हिचक २ पहा)*

इसड [ वि + शद् १ शातने { विशद् = इसड् = हिसड } ] जवरीनें घेणें. *(हिसड पहा)*

इसळ १ [ वि + वल्स् १ गतौ; { इ + वल्स् = विल्स् = इसळ = वर्णविपर्यय} ] जोरांत हलणें. (हिंसळ पहा) (२) [ वि + शल् १ आशुगमने; { विशल् = इसळ } ] जोरांत हलणें, रागाचा झटका येणें. *(हिंसळ पहा)*

## ई

ईर्स [ ऋध् भरारणें ईत्स् = ईर्सणें, ईर्षणें, ईर्षणें, भरारणें.

## उ

उकट १ [ उत् + कट् १ गतौ; { त् लोप. उत् + कट = त् = च् } ] उचकटणें इतर रूप - उच्कट. (२) [ अव + कृत् ६ छेदने; { अव = उ; कृ = क; त् = ट् } ] मोडणें, कापणें, काटणें, इतर रूपें - उकाट, हुकट, हुकाट. (३) [ उत् + कृत् ६ भेदे; { त् लोप; त् = ट् } ] फाडणें, फाटणें.

उकड १ [ उत् + क्वथ् १ निष्पाके; त् लोप; क्वथ् = कढ् = कड् } ] शिजणें. उ. - भात उकडणें. (२) [ उष् १ रुजायाम्; { उष् = उख् = उख } ] उष्णता होणें, घाम सुटणें. इतर रूप - उकाड.

उकर १ [ उत् + कृ ६ विक्षेपे; { उत् + कृ = उत् = कीर् = त् लोप, उकीर = उकर. सविकरण } ] उपसणें. इतर रूपें - उकरव, उकरम. (२) [ उत्क्रयणम् (नाम) ] विकत घेणें. उ. - माल उकरणें; कर्ज उकरणें. (३) [ उप + क्रम् १ पादविक्षेपे; { उप + क्रम् = उव = कर् अ = उकर } ] सुरू करणें. उ. - फिर्याद

उकरणें.

उकरम [ उत् + कृ (णिच्) ] *(उकर १ पहा)*

उकरव [ उत् + कृ (णिच्) { उत्कार्य = उक्कार्य = उकरव } ] उकरणें याचें णिच् रूप. व चा चुकीनें म करून उकरमणें. *(उकर १ पहा)*

उकल १ [ उत् + कल् १० क्षेपे; { उत्कल् = उक्कल = उकल } सोडणें, मोकळें करणें. उ. - गांठ उकलणें, गुंता उकलणें. (२) [ उत्कलनम् (ना.); { उत्कीलनम् = उक्कीलनम् = उकिलणें, उकलणें }] कुलूप - गांठ उकलणें. (उकिल २ पहा)

उकळ १ [ उत् + क्वथ् १ निष्पाके; { उत्क्वथ् + उकड = उकळ; } (ड = ल = ळ) ] (२) [ अव + क्षल् १०, १ शौचकर्मणि; { अव = उ; क्षल् = कळ } ] बडवून धुणें. इतर रूप - उकाळ. (३) [ उत् + क्लंद् १ वैक्लव्ये, आक्रोशे; { त् लोप; क्ल = कल् = स्वरभक्ति} ] रडणें, ओरडणें. उ. - आईला पाहतांच पोर उकळलें.

उकळव [ अव + क्लम् ४ ग्लानौ; { अव = उ; क्लम् = कलम् = स्वरभक्ति = कलव } ] आधणाच्या पाण्यांत घालून शिजविणें.

उकाट [ अव + कृत् ६ णिच् भेदे { उकाडणें = उखाडणें} ] उकडणें. *(उकट २ पहा)*

उकाड [ उष् १ दाहे (णिच्); { उष् = उख् = उखाट = उकाड } ] उकडणें. *(उकड पहा)*

उकाव [ उत्क (ना.) उत्कायते ] इच्छा होणें.

उकाळ [ अव + क्षल् १० शौचकर्मणि ] बडवून धुणें. (उकळ २ पहा)

उकिल १ [ उत् + कील् १ बंधने ] उकीलणें. (२) [ उत्कीलनम् ] कुलूप, गांठ उकलणें. (उकळणें शब्द निराळा.) इतर रूप - उकल २

उखड १ [ अव + खड् १ मंथे; { अव = उ} ] नाश करणें, भेद करणें. इतर रूपें – उखंड, उखांड, उखाड १. (२) [ अव + स्कंद् १ गतिशोषणयोः, अभियोगे; { अव = उ; स्कंद = खंद = खड् } ] हल्ला करणें. इतर रूपें - ओखाड, वखड. (३) [ उत् + खड् - खंड् १ मंथे ] नाश करणें. *(निखड पहा)*

उखंड [ अव + खड् ६ छेदने ] नाश करणें. *(उखड पहा)*

उखण [ उत् + खन् १ अवदारणे ] उकरणें.

उखळ १ [ उत् + स्खल् १ संचलने; { उत्स्खल् = उखळ } ] उखणणें. (२) [ उत्खननम् (ना.) { उत्खननम् = उखळणें} ]

उखाड १ [ अव + खड् (णिच्); अवखड् =,, उखाड ] उखडणें. (उखड पहा) (२) [ अवस्खदनम् (ना.) ] नाहींसा करणें. (३) [ उत् + स्खद १ विद्रावणे; उत्स्खदनं उत्स्खाद् = उखाड] उखडणें.

उखांड [ अव + खड् ६ छेदे; अव + उ; खड् = खंड् = खांड् } ] उखाडणें = उखडणें. (उखड पहा)

उखिंड [ उत् + खिद् ६ परिघाते खिंदति; { उत् + खिद् = उखिंड } ] उखडणें. उ. - मीं खिळा उखिंडला.

उखित [ उषित (वस्), व्युषित = उखित = वस्ती केलेला, विन्हाड दिलेला.]

उग [ उत् + गु १ अव्यक्ते शब्दे गवति ] स्तब्ध राहणें, शब्द न करणें. [ णिच् उद्गावय = उगाव ] उ. - उगा बाळा = याल ! उद्गव. मुलांना उगावून बाई देवळांत शिरली.

उगड [ अव + ग्रह् ९ उपादाने, मोचने; { अव = उ; ग्रह् = गड् = गड } ] सोडणें, जाऊ देणें, लक्षांत न घेणें.

उगण १ [ उत् + गण् १ संख्यायाम्; { उत् + गण् = उग्गण् + उगण }] आंगाशी न लावणें. उ. - तें उगणिलें मज कर्म । तेव्हांचि पूसलें जन्म ॥ जन्मासवें श्रम । वरिचिल ही गेले ॥ ज्ञा. ९-४०० (२) [ उत् + क्षण् ८ हिंसायाम् ] लुटणें, हल्ला करणें. (उगाण ३ पहा) (३) [ उत् + क्षन् ८ हिंसायाम्] लुटणें, हल्ला करणें. (उगाण ४ पहा) (४) [ उत् + गॄ ९ अव्यक्ते शब्दे ] सांगणें, प्रतिपादणें, प्रसार करणें. *(उगाण १ पहा)*

उगर [ उत् + ग्रह् ९ उपादाने; { उत् + ग्रह् = उग् + ग्रह = उगर }] मारण्याकरितां वर घेणें. (उगार पहा)

उगल १ [ उत् + गॄ ६ निगरणें; {उत् + गॄ = उद् + गर् = उग् + गर् = उगल} ] देणें. उ. - उगलिती निर्मलें । गुणमय मुक्ताफलें ॥ दैवी सुप्तिकलें। गीतार्णविची ॥ ज्ञा. १६-२०९ (उगिल पहा) (२) [ उत् + गॄ ६ निगरणे ] ओकणें. उ. - उधवींचे तोंड । उगलीत धूमाचे उभड ॥ हें जाणिजे तन्हीं उघड। सांघों ते बोल ॥ ज्ञा. १६-२९२ इतर रूप - उगळ ३.

उगव १ [ उत् + गम् १ गतौ; { त् = द् = ग् (लोप) म् = व् } वर येणें. उद्गत + ल = उगेलें = भरणें, वरून वाहणें. उ - जैसें उंचीं उदक पडिलें । तरी तलवटूवरि ये उगेलें ॥ तैसें नमिजे भूत देखिलें । ऐसा स्वभाओ तेयांचा ॥ ज्ञा. ९-२२३. (२) [ उत् + इ (गा.) ] वर येणें. (२) [ अव + गम् १ गतौ, ज्ञाने; { अव = उ; गम् = गव} ] जाणणें; समजणें; सोडवणें. (अवगम्यते - उगवतो; नावगम्यते = नुगवतो). उ - माझा उखाणा उगव. इतर रूप - नुगव. (४) [ उद् + गुंफ् ६ ग्रंथे ] { द् = ग्; फँ = हँ = अँ = वँ } (५) [ उत् + क्री ९ द्रव्यविनिमये; { उत् + क्री; उद् + क्री; उद् + गी; उग् + ग्री; ग् लोप. र = य = इ = व} ] पैसे उगवणें. *(उगिव पहा)*

उगळ १ [ अव + गल् १ अदने; ( अव = उ, ल् = ळ् ) ] खालीं पडणें, ओकणें. *(उगाळ १ पहा)* (२) [ उत् + गल् १ अदने; { उत् + गल्; उद् + गल्; उग् + गल् = उगळ } ] बाहेर पडणें, थोडे ओकणें. (३) [ उत् + गॄ ६ निगरणे; { त् = द् = ग्; र् = ल् = ळ् } ] तोंडाबाहेर पडणें, ओकणें. (उगिल पहा) (४) [ उत् + गॄ ९ शब्दे उद्गिरति ] सर्व सांगणें, वर्णन करणें. (उगाळ ३ पहा) (५) [ उत् + कृ ९ हिंसायाम् ] घासणें, पीठ होई तों घासणें. *(उगाळ ४ पहा)* (६) [ उत् + गॄ ६ निगरणे ] अपमान करणें. (उगिल पहा) (७) [ उत् + घृष् १ संघर्षे { उत् + घृष् = उघ्घृष् = उघळ = उगळ } उगाळणें. इतर रूप - उगाळ ६. (८) [ अव + घूर्ण् १ भ्रमणे, गतौ ] पुढें मागें जाणें, घासणें. *(उघुळ पहा)*

(९) [ अव + घृष् १ संघर्षे ] *(उघळ २ पहा)*

उगाण १ [ उत् + गॄ ९ अव्यक्ते शब्दे गृणाति; { उत् + गॄ; द् = ग् सविकरण} ] सांगणें, प्रतिपादणें, प्रसार करणें. उ. - तरि अध्यायिं पन्हरावां । श्रीकृष्णें तेयां पांडवा । शास्त्रसिद्धांतु आघवा । उगाणिला ॥ ज्ञा. १६-४१. इतर रूप - उगण ४ (२) [ उत् + गण् १० संख्याने; { त् = द् = ग् } ] हिशोब देणें, झाडा देणें, झाडून सांगणें. (३) [ उत् + क्षण् ८ हिंसायाम्; { उत् + क्षण्; उत् + खण्, उत् + गण, उद् + गण = उगण } ] लुटणें, हल्ला करणें. इतर रूप - उगण २. (४) [ उत् + क्षन् ८ हिंसायाम् ] { न् = ण् } हल्ला करणें, इतर रूप - उगण ३. (५) [ उद्ग्रहणं (नाम); (ह् लोप) ] हल्ला करणें, लुटणें. (६) [ उद्ग्रहणं (नाम) ] उ - उगाणिलीं जन्ममरणें.

उगार १ [ उद्गारणं (नाम) ] मारण्यास वर करणें, झुगारणें. (झुगार पहा) (२) [ अव + गुर् ६ उद्यमने; { अव = उ} ] मारण्यास शस्त्र वर करणें. - उचलणें. (३) [ उत् + ग्रह् ९ उपादाने; { त् = द् = ग् - लोप ह् लोप } वर करणें, उचलणें. इतर रूप - उगर. (४) [ उत् + गॄ ६ निगरणे { त् = द् = ग् लोप } ] वर करणें, उचलणें.

उगाळ १ [ अव + गल् १ अदने णिच्; अवगालनं अव = उ; ल् = ळ} ] खालीं पाडणें, ओकणें. इतर रूप - उगळ १. (२) [ अव + गॄ ९ शब्दे ] उ. - तेंच तेंच उगाळूं नको - बोलूं नको. (३) [उत् + गॄ ९ शब्दे; { उत् उद् + गारय = उग्गारय = उगाळ} ] सर्व सांगणें, वर्णन करणें. इतर रूप - उगळ ४ (४) [ उत् + कृ = उक् + कृ = उक्कार = उग्गार = उगाळ } ] घासणें, पीठ होई तों घांसणें. इतर रूप - उगळ ५. (५) [ अव + घृष् १ संघर्षे; ] घासणें. (उघळ २ पहा) (६) [ उत् + घृष् १ संघर्षे; { त् + घृ = ग् + घृ = गार = गाळ } ] घासणें. (७) [ अव + घूर्ण् १ भ्रमणे, गतौ ] पुढें मागें जाणें, घासणें. (उघुळ पहा)

उगिल [ उत् + गॄ ६ निगरणे ] अपमान करणें. अमृ. ३ इतर रूपें - उगल १, उगळ ३, उगिळ.

उगिव [ उत् + क्री ९ द्रव्यविनिमये { उत् + क्री; उक् + क्री = उग्री = उगर् = उगव = उगिव } ] पैसे उगिवणें, कर्ज उगिवणें. इतर रूप - उगव ५.

उगिळ [ उत् + गॄ ६ निगरणे; { उत्गीर् = उगीळ् = उगिळ } ] अपमान करणें. (उगिल पहा)

उगु [ अव + घूर्ण् १ भ्रमणे, गतौ ] पुढें मागें जाणें, घासणें. *(उघुळ पहा)*

उघड १ [ उत् + ग्रह् ९ उपादाने; { उत् + ग्रह् = उद् + ग्रह् = उग् + गृह् = उंग्रह् = उघ्र = उघड } ] मोकळें करणें. (२) [ उत् + घट् १ चेष्टायाम्; { त् = द् = लोप; ट् = ड् } ] (३) [ उत् + ग्रथ् १ कौटिल्ये; { उग्द्रथ् = उग्गठ् = उघ्घट = उघड} ] सुरू करणें, बाहेर करणें. उ. - जखम उघडणें, पोथी उघडणें.

उघळ १ [ उत् + घृष् १ संघर्षे ] घासणें. (२) [ अव + घृष् १ संघर्षे ] घासणें. इतर रूप - उगळ ९, उगाळ ५.

उघाप [ उत् + ग्रह् (णिच्) ९ उपादाने; (ग्रहापयति; कर्मणि ग्रहाप्यते ) { उद्ग्रहाप = उग्ग्रहाप = उघाप } ] बाहेर टाकणें, बाहेर टाकला जाणें. *(उघाव पहा)*

उघाव [ उत् + ग्रह् (णिच् ९ उपादाने; उत् + ग्रहापयति प् = व् ] बाहेर टाकणें. इतर रूप - उघाप.

उघुळ [ अव + घूर्ण् १ भ्रमणे, गतौ ] पुढें मागें जाणें, घासणें. इतर रूपें - उगुळ, उगळ ८, उगाळ ७.

उघ्रस [ अव + घृष् १ घर्षणें; { अवघृष् = उघ्रस } ] घासणें.

उचक १ [ उत् + स्कु ५ आप्रवणे; स्कुनोति (त् + स् = स् + स् = च्) ] वर उचलणें, उचकटणें. (२) [ उत् + क्री - चेक्री ९ द्रव्यविनिमये; (उच्चेक्री = उचक) ] न देण्याच्या इच्छेनें कर्ज काढणें. (३) [ उत् + कृत् ७ वेष्टने { उत् + कृत् = उच् + कत्. त् = च्; त् = ट् } ] उचकटणें, उचकाटणें, बाहेर काढणें. इतर रूपें - उचकट २, उचकाट. (४) [ उत् + जिहिक्क्, हिक्क् १ अव्यक्ते शब्दे ] उचकी येणें.

उचकट १ [ उपस्करणं (वैकृतं); (उपस्करणं = उचकरणें = उचकटणें)] वांकडी तिकडी करणें. (२) [ उत् + कृत् ७ वेष्टने ] बाहेर काढणें. (उचक ३ पहा) (३) [ उच्छकलनं ] अस्ताव्यस्त करणें, उसकटणें. (उसकट पहा) (४) [ उत्कटनं (नाम) ] बाहेर काढणें. (५) [ उत् + कर्त् १० मंद करणें ] उच्कट [ उत् + कट् १ गतौ ] *(उकट १ पहा)*

उचकड [ उच्छकलनं ] अस्ताव्यस्त करणें, उसकटणें. *(उसकट पहा)*

उचकाट [ उत् + कृत् ७ वेष्टने; { त् = च्; त् = ट्; ऋ = आ } ] बाहेर काढणें. *(उचक ३ पहा)*

उचकाव [ उत्सुकायते (नाम) ] उत्सुक असणें.

उचकुद [ उत् + कूर्द् १ क्रीडायाम्; { उत् = उच् + कूर्द. त् = च् } ] उडी मारणें.

उचंग [ उत् + सञ्ज् १ संगे; { उत्सञ्ज् = उचंग; त् = स्; ज् = ग् } ] जोरांत पुढें अथवा वर जाणें. इतर रूप - उचांग.

उचट [ उत् + चट् १० भेदने ] वर करणें. (तव्यावरून भाकरी) इतर रूप – उचाट.

उचड [ उत् + चड् १० रोषे; { त् + च् = च्च् = च; ड् = ड् } ] वर करणें. *(उचाड पहा)*

उचंडळ [ उत् + स्यन्द् १ स्रुतौ, (उत्स्यन्द् = उचंड्) ] सांडणें, लवंडणें.

उचंब १ [ उत् + स्मि १ हसने ] { त् = च्; म् = ब } आनंदित होणें. (उत्स्मयः = उचंब ) इतर रूप - उचंबळ ४. (२) [ उत् + चंब् (गतौ) ] *(उचंबळ ७ पहा)*

उचंबळ १ [ उत् + स्वल् १ गतौ ] हलणें, वर खालीं होणें. (उचमळ ४ पहा) (२) [ उत् + संब् १० संबंधने; { त्सं = चं, ल् स्वार्थे } ] जोडणें. (३) [ उद् + सम् + प्लु १ गतौ, कूर्दने; { उद् + सम् = उचंम् + प्लु = उचंप्लु = उचंबळ} ] खालीं वर होणें, हलणें. (४) [ उत् + स्मि १ हसने ] आनंदित होणें. (उचंब १ पहा) (५) [ उत्स्मेर (ना.) ] उचंवणे, आनंदि होणें. इतर रूप - उचमळ २. (६) [ उत् + चंब् १

अदने ] इतर रूपें - उचम १, उचमळ १, उचंव. (७) [ उत् + चंव् गती ] इतर रूपें - उचमळ ५, उचम २, उचंब २.

उचम १ [ उत् + चंव् १ अदने; { त् + च् = च्च = च; चंव् = चम् } ] उचंवणें, पोटांत कालवणें. (उचंवळ ६ पहा) (२) [ उत् + चंव् (गती)] *(उचंवळ ७ पहा)*

उचमळ १ [ उत् + चंव् १ अदने; ] { ल् स्वार्थे } उचंवळणें, पोटांत कालवणें. (उचंवळ ६ पहा) (२) उत्स्मेर (ना.) { उत्स्मेर = उच्मेर = उचमळ}] उचंवळणें, उचंवणें, आनंदित होणें. (उचंवळ ५ पहा) (३) [ उत् + मूल् १ प्रतिष्ठायाम्; { त् = च् } ] उपटणें (मुळासकट) (उचमुळ पहा) (४) [ उत् + स्वल् १ गती; { त् = च्; स्व = व; ल् = ळ् } ] उपटणें, हलवणें. इतर रूपें – उचवळ, उसवळ, उचंवळ १. (५) [ उत् + चंव् गती ] *(उचंवळ ७ पहा)*

उचमुळ [ उत् + मूल् १ प्रतिष्ठायाम् ] उपटणें, हलणें. इतर रूपें - उचमळ ३, उमचळ, उमुळ २, उन्मुळ, उदमुळ १.

उचल १ [ उत् + चर् १ गती; { उच्चर = उचल; र् = ल् } ] (आचर पहा) (२) [ ग्लुचु १ स्तेयकरणे; { ग्लुचु = गुलुचु स्वरभक्ति = उलच = उचल वर्णव्यत्यास } ] चोरणें. ( ग्लुचकः = उचल्या )

उचंव [ उत् + चंव् १ अदने; { त् + च् = च्च. व् = व उच्चंव् = उचंव् = उचव } ] (उचंवळ ६ पहा)

उचवळ [ उत् + स्वल् १ गती; { उत्स्वल् = उच्छ्वल = उचवळ स्वरभक्ति. त् = च् } ] उचमळणें. (उचमळ ४ पहा)

उचंवळ [ उत् + चंव् १० संवर्धने; { त् + च् = च्च, व् = व्. ल स्वार्थे } ] हलणें, वर खालीं होणें.

उचांग [ उत् + सञ्ज् १ संगे ] जोरांत पुढें अथवा वर जाणें. *(उचंग पहा)*

उचाट [ उत् + घट् १० भेदने ] वर करणें. (तव्यावरून भाकरी) *(उचट पहा)*

उचाड [ उत् + चड् १० रोषे ] उचडणें. इतर रूप - उचड.

उंचाव १ [ उत् + चय् १ गती; { उच्चायय = उंचाव } ] मान घावयास लावणें. (२) [ उच्च (ना.) उंच होणें. उ - जेथ उंचावते न पवाडें । सुखाचा पैसारु जोडे। आपुलेनि सुरवाडें । उडों ये ऐसा।। ज्ञा. ७-१५१.

उंचावि [ उत् + चय् (गती) = उंचाव णिच्]

उच्चार [ उत् + चर् १ गती ] *(आचर पहा)*

उच्छाद [ अव + सादय् १० हिंसायाम्; { अव = उ; सादय = चादय = च्छादय} ] नाहींसे करणें, त्रास देणें.

उच्छिष्ट [ उच्छिष्ट (ना.); { उच्छिष्ट = उशिट } ] उशिटणें, उशटायणें. इतर रूप - उशिट १.

उछाद १ [ उत् + छद् (छादय्) १० पीडायाम् ] सोडणें, मोकळें करणें. (२) [ उत् + सद् (सादय्) ]

उजड १ [ उषस् ११ प्रभातीभावे; { ष = ज; स् = त् = ड् } ] प्रभातकाल होणें, उजाडणें. इतर रूप – उजाड.

उजर १ [ उत् + इ (उद्यत्) ] उजेडणें. *(उजेड पहा)*

उजर १ [ उत् + जृ ९ जरायां ] ताजेंतवानें

करणें, नाश होऊं न देणें, जीर्णावस्थेतून सुधारणें, वर येणें. (२) [ ऊर्ज् १० बलप्राणनयोः ; { ऊर्ज् । वर्णव्यत्यास। उजर् । स्वरभक्ति । उजर} ] ताजेतवानें करणें. (३) [ उत् + ज्वर् १ रोगे; { उज्ज्वर् = उजर } ] रोगापासून मुक्त होणें. (४) [ ऊर्जय् १० बलप्राणनयोः; ऊर्जय् = उर्जय् । उजर । वर्णव्यत्यास ] सामर्थ्य येणें, बळकटी येणें किंवा आणणें.

उजव १ [ उत् + जि १ जये; { उज्जय् = उजव् = उजव } ] जय मिळणें - मिळविणें. (२) [ उत् + यम् १ उपरमे; { उत् + यम् = उद्यम = उज्जवँ = उजव } ] हात उजवून घेणें. (३) [ उद्योतनं (नाम); { उद्योतनं = उजोवणें = उजवणें } ] उ - उद्योतितं दैवं = दैव उजवलें ( उत्तरामचरित्र), उद्योतय उत्संग - ओंचा उजव. (४) [ उप् + यम् १ उपरमे; { उपयम् = उअयवँ = उजव} ] (५) [ उप + यम् १० परिवेषणे, विवाहे; { उप + यम् = उअ + जम् = उ + जव् = उजव }] लग्न करून देणें. उ - आमच्या दोन मुली उजवल्या.

उजवि [ ऋजु (ना.) ऋजु = उजु = उजय्} ] योग्य मार्गानें सरळ जाणें.

उजळ १ [ उत् + ज्वल् १ दीप्तौ; { उज्ज्वल् = उजळ } ] प्रकाशित करणें. (२) [ अव + क्षल् १० शौचकर्मणि; { अव = उ; क्षल् = छल् = झळ् = जळ } ] घांसून स्वच्छ करणें, रसायन घालून स्वच्छ करणें.

उजाड १ [ उषस् (नाम) प्रभातीभावे; { ष् = ज्; स् = त् = ड् } ] प्रभातकाल होणें. (उजड १ पहा) (२) [ उद्यत् (नाम) ] (उजेड पहा)

उजाव १ [ उत् + जि (णिच्) १ जये; { णिच् - जापय् कर्मणि जाप्य. उ - जाप्य = उजाव } ] यशानें बाहेर पडणें. उ - मी तुझी सोंगटी उजावून देतों म्हणजे दुसऱ्याच्या सोंगट्या तिच्याकडून जिंकवतों. (२) [ उज्जापनम् ] (३) [ उप + यम् १ उपरमें; { उप = उव = उअ. यम् = जवँ = जवँ = उजाव } ] (४) [ ओजाय् (वैदिक) ]

उजियड [ उद्यत् (नाम); (उद्यत् = उजेड)] सकाळच्या सूर्याप्रमाणें उगवणें. उ - आतां येणेंचि उजियडें निरुतें । निहाळिं पां एथा योगातें । जें माझां ठाईं भूतें । परि मी भूतीं नसें ।। ज्ञा. ९-१३२ *(उजेड पहा)*

उजिव १ [ उत् + जीव् १ प्राणधारणे ] जिवंत करणें, ताजेतवानें करणें. उ. - एक सोंगटी उजिवली = एक सोंगटी पुन्हा जिवंत केली. (२) [ उत् + जिन्व् १ प्राणधारणे; { उज्जिन्व् = उजींव=}] जिवंत करणें.

उजीव [ उत् + जीव् १ प्राणधारणे; उजीवणें - जिवंत करणें.

उजेड [ उद्यत् (नाम); { उत् + इ (उद्यत्) = उजड, उजेड. उत् + द्योत् (द्युत्) = उजेड } ] इतर रूपें - उजोड, उजाड २, उजड २, उजियड.

उजेर [ उत् + चेकृ ] { उच्चेकृ = उज्जेर् = उजेर } ] घाण नाहींशी करणें.

उजोड [ उद्योत् - उजोड. { उत् + द्युत्} ] *(उजेड पहा)*

उज्वळ [ उत् + ज्वल् १ प्रदीप्तौ; (तत्सम) { ल् = ळ. उज्ज्वल् = उज्वळ = उजळ } प्रकाशित करणें, स्वच्छ करणें.

उट १ [ उत् + वृत् १ लेपने ] सुगंधी पदार्थ अंगाला माखणें. इतर रूप - उटण. (२) [ उत् + वृत् १ लेपने ] तेलानें घासणें. (पूर्वी आरसे पितळेचे करीत व प्रतिबिंब नीट दिसण्याकरितां ते तेलानें घाशीत) उ - हां हो उटूनियां आरिसा । आंधलेया पुढें दाखऊं वैसा ।। ना वहिरीसि हृषीकेशा । गाणें केउतें ।। ज्ञा. ११-१५७. ("पितळेचे आरसे न्हाव्यांजवळ पुण्यांत चाळीस वर्षांपूर्वी मीं पाहिले आहेत." असे कै. राजवाड्यांनी लिहून ठेविलें आहे.)

उटक १ [ उत् + टक् १० बंधने; (उत् + टक् + उट्टक् = उटक ) ] बंधमुक्त होणें, वेगळें होणें. (२) [ उत् + स्तक् १ प्रतिघाते ] अडथळा येणें. उ. - सर्वारंभा उटकलें । प्रवृत्तिचें तेथ मावलें । जलति कां कर्मफले । तें तें चि योजी ।। ज्ञा. १४-३६३. (३) [ उत् + तग् १ गतौ कर्मणि (उत् + तग् उत्तग् = उटक) ] उच्चाटण होणें.

उटण १ [ उत् + वृत् १ लेपने ] उटणें अंगास माखणें. (२) [ उटण (ना.)] *(उट १ पहा)*

उटाळ १ [ उत् + तल् १० प्रतिष्ठायाम्; (उत्तल = उताल = उटाळ) ] ताफा लावून उलटणें. (२) [ उत् + स्थल स्थैर्ये (ना.); { उत्स्थल = उट्ठल = उटाळ } ] ताफा लावून उलटून देणें. (३) [ उत् + टल् १ वैक्लव्ये; { उत् + टल = उट्टल = उटाळ } ] स्पष्ट करणें. (४) [ उत् + टुल् १ वैक्लव्ये ; (उत + टुल् = उट्टुल् = उटाळ) ] स्पष्ट करणें.

उठ १ [ अव + स्था १ आत्मने, (अव = उ; स्था = ठ) ] उ.- अनीत्वां पंकतां धूलिं उदकं नावतिष्ठते = धुळीचा चिखल केल्याशिवाय उदक उठत नाहीं. शत्रूला मारल्याशिवाय कृष्ण उठत नाहीं. (२) [ अवशिष्ट (ना.) बाकी राहाणें, अवशेष राहणें, बाकी उठणें. णिच् = ओठणें. बाकी ओठणें. इतर रूप - ओठ २४. (३) [ उठ् १ उपघाते ] उ - डोकें उठलें. तो त्याच्यावर उठला. (४) [ वठ् १ ग्रंथे ] रचणें. उ - इमला उठविला = रचिला. इतर रूपें - उठव ४, उठवि. (५) [ उठ् १ उपघाते ] नाश होणें. उ. - गांव उठलें. (६) [ उपस्थित = उवट्ठिअ = उठ + ल = उठल ( ला = ली = लें) उत्पन्न होणें. उ० - रोगः उपस्थितः = रोग उठला. भयं उपस्थितं - भय उठलें. श्वापदं उपस्थितं = सावज उठलें. (७) [ युट्ट १० अल्पीभावे, (युट्ट = उट्ट = उठ) ] उ - गांव उठणें म्हणजे कमी होणें. (८) [ उत् + तम् १ पीडायाम्; { उत्तम् = उठँव } ] उ. - गुरूं अगदी उठवलें. - उठवणीस आलें. (उठव ६ पहा) (९) [ उठ् १ प्रतिघाते ] खालीं पाडणें. (उठय ३ पहा)

उठंव [ उत्तंभनम् (नाम) ] जोर येणें, उमेद येणें.

उठव १ [ युन्थ् १ पीडायाम्; { णिच् युन्थय्. (युन्थय् = उंठय् = उठव) }] उ. - डोकें उठवणें. (२) [ वट् स्तेये (सौत्रधातु) (व = उ) ] चोरणें. उ. - त्या उचल्यानें माझें गांटोडें उठवलें. (३) [ उठ् १ प्रतिघाते; ऊठति (णिच् ओटयति - उठवतो) ] खालीं पाडणें. इतर रूप - ऊठ ९. (४) [ वठ् १

ग्रंथे ] उ. - इमला उठविला = रचिला. (उठ ४ पहा) (५) [ उत् + स्तै १ स्तेये स्तायति ] उठविणें. उ. - भामट्यानें क्षणांत जोडा उठवला. *(उठिव २ पहा)* (६) [ उत् + तम् १ पीडायाम् ] उ - गुरूं अगदी उठवलें = उठवणीस आलें. (उठ ८ पहा)

उटवि [ यठ् १ ग्रंथे ] (उठ ४ पहा)

उटाव [ उत् + स्तै १ स्तेये ] उठवणें. उ.- भामट्यानें क्षणांत जोडा उठावला. *(उठिव २ पहा)*

उठिव १ [ उत् + स्तेय् स्तेये; { उत्स्तेय् = उत्थेय् = उठिव } ] चोरणें. उ. - त्या उचल्यानें माझें गांठोडें उठिवलें. (२) [ उत् + स्तै १ स्तेये ] चोरणें. उ. - भामट्यानें क्षणांत जोडा उठिवला. इतर रूपें - उठाव, उठव, उडव १७.

उड १ [ अप + द्रा २ कुत्सायांगतीच. कुत्सितां गतिं गम्; { अप + द्रा = अव + द्रा = उड्डा = उड } ] उ - दोष उडाला = दोषः उपद्रातः (२) [ अव + दै १ शोधने; { अव + दै = उड. णिच् = उडवणें } ] स्वच्छ होणें, (दोष) नाहींसा होणें. उ. - दोष उडला - उडाला. डाग उडाला. (३) [ उत् + डी १ विहायसागतौ ] उडिणें. णिच् - उत् + डपय = उडव. उत् + डापय = उडाव उडिणें - णिच् - उडविणें. इतर रूपें - उडव, उडाव १, उडिव. (४) [ उत् + डी १ विहासया गतौ (णिच्); (उत् + डापय्. कर्मणि. उडणें) { णिच् - उडाव, उडिव कर्मणि उडणें.} ] भिवविणें. उ - गाय उडली = दूध देण्यांत विथरली. (५) [ उत् + दा १ दाने; (णिच् दापयति - कर्मणि - दाप्यते.) ] खर्च केलें जाणें, नाहींसे होणें. उ. - पैसे उडले. संपत्ति फार उडली. (उडाव १० पहा) (६) [ उत् + दा २ लवने ] कापणें, चिरणें. (७) [ उत् + धा ३ धारणे, त्यागे ] सोडणें, संपणें. उ. - गाय उडाली, उढली - दूध देण्याची बंद झाली. इतर रूप - उढ. (८) [ उत् + धे १ पाने; { उत् + धे = उद् + धे = उध् + धे = उढ = उड } ] दूध देण्याचें थांबणें. उ. - म्हैस उडाली. (९) [ उत् + दुह् २ प्रपूरणे; { उद्दुह् = उड्डुह = उड्डुअ = उड } ] (१०) [ उत् + हा ३ ऊर्ध्वगतौ ] वर जाणें, उडणें. उद्धान + ल = उडाला ( हा पासून), उड्डीन (उत् + डी) + ल = उडला (डी पासून) (११) [ उर्द् १ क्रीडायाम्; { द् = ड्} ] बाहेर पडणें. उ - झऱ्यांतून पाणी उडणें. (१२) [ उर्द् १ क्रीडायाम्; { द् = ड्} ] खेळणें. उ. - उडूं बागडूं लागला. (१३) [ उत् + अस् ४ क्षेपे; { उदस्य = उडस्य = उडह् = उड } ] दूर करणें. उ० - शंका उडली. त्यानें शंका उडविली. इतर रूपें - उडव २१, उडाव ८. (१४) [ उर्द् १ क्रीडायाम् ] खेळणें. उ० - पोरें उडतात, बागडतात. (बीभत्स प्रयोग) तो तिच्यावर उडला - त्यानें तिच्याबरोबर क्रीडा केली. (१५) [ उद् + वप् १ छेदने; { उद् + वप् = उद्वप् = उडव = उड } ] बाकी शून्य करणें. उ० - कर्ज उडणें, बाकी उडणें. *(उडव १९ पहा)* (१६) [ उर्द् १ क्रीडायाम् ] बागडणें. (१७) [ उत् + दा णिच् हिसकावून घेणें. कर्मणि ] *(उडाव १० पहा)*

उडच १ [ उद् + अस् १ गतिदीप्त्यादाने;

{ द = ड; स = च् } ] (२) [ उद् + अच् १ गतियाचनेषु; (उदच् = उडच) ] (३) [ उध्रस् १० उंछे; { ध्र = ड्; स् = च } ]

उंडर [ उर्द् १ क्रीडायाम् ] उनाडपणा करणें. उ. - बा! असा उंडरूं नकोस. इतर रूप - उंडार १.

उडव १ [ अव + रुह् (णिच्) बीजजन्मनि; { अव = उ; उरुह् = उडअ = उडव} णिच् - { उरोप = उडोव = उडव }] (२) [ अव + रुह् णिच् ४ रोहणे ] बाकी उडणें, उडवणें. *(उरव पहा)* (३) [ उत् + डपयति १० संघाते, { उत् + डप् = उड्डप् = उडव } ] सुटे करणें, निरनिराळें करणें. (उड ३ पहा) (४) [ वुट् १० हिंसायाम्; { वुटय = उडव = सविकरण } ] नाहींसे करणें. (वोडव ४ पहा) (५) [ उत् + दा (णिच्) २ लवने; { उद्दापय = उड्डावय = उडाव = उडव } ] कापणें, चिरणें. उ - डोकें उडवलें. त्यानें माझी तपेली बघतां बघतां उडवली. (उडाय १० पहा) (६) [ उत् + दा २ लवने (णिच्), { उद्दा = उड्डा = उडव } ] उ - पैसे उडवले, उडावले. इतर रूप - उडाव ९. (७) [ उद् + दो ४ अवखंडने; { उद्दो = उद्दव = उडव }] उधळणें. (उडाव ३ पहा) (८) [ उद्धवनम् (नाम); { उद्धव = उढव = उडव }] वर फेकणें. उ. - दोष उडाला. (९) [ उत् = धू ५ कंपने ] (चौरी सारखें) हलवणें. उ. - चौरी उडवतो = उध्दुनोति चामरं. (१०) [ उत् + धू विधूनने; उद्धवति { उत् = धु; उध् + धू = उढ्ढव = उडव } ] वर फेकणें, नाहींसें होणें. उ - दोष उडाला. (११) [ उद् + ली ४ श्लेषणे, { उद् + ली = उल्ली = उल्लय् = उळय् = उडव } ] मोकळें करणें. (१२) [ उद् + लू ९ छेदने; { उद्लू = उल्लू = उल्लव् = उळव् = उडव} ] (१३) [ उद् + वह् १ प्रापणे, वृद्धौ; { उद्वह् = उड्डह् = उडव } ] (१४) [ उर्व् १ हिंसायाम्; { उर्व् = उर्व् = उड्व् = उडव } ] डोचकें उडवणें. (१५) [ उर्य् १ हिंसायाम्] मारणें, हाणणें, डोचकें उडवणें. (१६) [ अप + वद् १ निन्दायाम्; { अपवद् = अववद् = उअद = उदव = उडव } अथवा (अप = उ, वद् = डव्) ] निन्दा करणें, चेष्टा उडवणें. उ. - थट्टा उडविली. (१७) [ उत् + दा (णिच्) ३ दाने; { उद्दापय् = उडाव} ] हिसकावणें. उ. - त्यानें माझी टोपी उडवली, जोडा उडवला. (उडाय १० पहा) (१८) [ उत् + स्तै १ स्तेये] उ. - भामट्यानें क्षणांत जोडा उडवला. *(उठिव २ पहा)* (१९) [ उद् + वप् १ छेदने ] कर्ज उडवणें, बाकी उडवणें. इतर रूप - उड १५. (२०) [ अव + ध्यै १ चिंतायाम् ] तिरस्कार करणें, वाईट चिंतिणें, वाईट इच्छिणें. उ. - तो त्याला उडवतो. (उडाय ५ पहा) (२१) [ उत् + अस् ४ क्षेपे ] दूर करणें. उ. - त्यानें शंका उडवली. (उड १३ पहा) (२२) [ अव + दै १ शोधने (णिच्) ] स्वच्छ होणें, दोष नाहींसा होणें. (उड २ पहा)

उंडार १ [ उर्द् १ क्रीडायाम् ] उनाडणें, उनाडपणा करणें. उ. - बा ! असा

उंडाळू नकोस. (उंडर पहा) (२) [ उत् + दृ ९ विदारणे ] उनाडणें, वर फेकणें.

उडाव १ [ उत् + डापयति १० संघाते; { उत् + डापय = उड्डापय = उडावअ = उडाय } ] उधळणें. उ. - पैसे उडावले. *(उड ३ पहा)* (२) [ उद्द्रावणं (नाम) ] वरती फेंकणें. (३) [ उद् + दो ४ अवखंडने ] उडवणें. उ - डोकें उडाव. इतर रूप - उडव ७. (४) [ उद् + ली ४ श्लेषणे] (५) [ अव + ध्यै १ चिंतायाम्; { अव = उ; ध्यै = ध्याय् = ढाव् = डाव् } ] तिरस्कार करणें, वाईट इच्छिणें. वाईट चिन्तिणें. उ. - तो त्याला उडयतो. इतर रूप - उडव २० (६) [ उत् + डापय् (डी णिच्); { उड्डापय् = उड्डाय } ] उडावयास लावणें. (७) [ उत् + डयय् १ णिच् विहायसागती; { उत् + डयय् = उडव } ] उडावयास लावणें. (८) [ उत् + अस् ४ क्षेपे ] दूर करणें. (उड १३ पहा) (९) [ उत् + दा (णिच्) २ लवने ] उ - पैसे उडवले, उडावले. (१०) [ उद् + दा (णिच् ३ दाने; (उत् + दा कर्मणि । उडणें । अकर्मक)] उ - त्यानें माझी टोपी बघतां बघतां उडावली. इतर रूपें - उड १७, उडव ५. (११) [ उत् + दा १ दाने ] इतर रूप - उड ५.

उडिव [ उत् + डी (णिच्) १ विहायसा गती ] भिवविणें. *(उड ३ पहा)*

उढ [ उत् + धा ३ धारणे, त्यागे ] सोडणें, संपणें. उ - गाय उढली. = दूध देण्याची बंद झाली. *(उड ७ पहा)*

उढव [ उत् + धा णिच् धापय ३ धारणपोषणयोः; { उत् + धा - उद्धापय। उढाव । उढव } ] उभें करणें, बांधणें. माडगांवरकर पोथी - ज्ञा. १५-५०९.

उढस [ उर्ध्व + श्वस् २ श्वसने; { उर्ध्व + श्वस् । उर्ध्व + हस् । उढ् + ढस्। उढस् । उढस } ] श्वास वर लागणें. *(उढास पहा)*

उढास [ ऊर्ध्व + श्वस् २ श्वसने; (उर्ध्व + श्वस् । उर्ध्व + हस् । उढ + ढस् । उढस् अथवा उढास) ] श्वास वर लागणें. इतर रूप - उढस.

उणवि [ ऊनयति १० परिहाणे; { ऊनय् = ऊणइ = उणवि } ] उणावणें, कमी करणें. *(उणाव पहा)*

उणाव [ ऊनयति १० परिहाणे; { ऊनय् = ऊणय = उणाव् } ] उणें करणें, कमी करणें. इतर रूप - उणवि.

उत १ [ उत् + इ २ गतौ ] बाहेर येणें. (२) [ उत् + तप् १ संतापे; { उत्तप = उत्तअ = उत } ] तापून फुगणें, वितळविणें. (३) [ उत् + तप् १ संतापे ] कढवणें, कढून बाहेर येणें. उ - दूध उतूं आलें. इतर रूप - उतव १. (४) [ उत् + तु २ गतिवृद्धिहिंसासु तवीति (वैदिक) } उत्तु = उत } ] बाहेर येणें, वर येणें.

उतट १ [ उत् + तट् १ उच्छ्राये; { उत्तट। उतट } ] उत्ळणें, मर्यादेच्या बाहेर येणें, गर्भाशयाच्या बाहेर येणें. (२) [ उत् + तट् १ उच्छ्राये ] बाहेर येणें, फुटणें, तटांच्या बाहेर येणें.

उतड [उत् + तृद् ७ हिंसानादरयोः भेदे; { उत्तृद् । उत्तृड् । उतड । उतड् }] फुटणें, दोन भकलें होणें.

उतण १ [ उत् + तन् ८ व्याप्तौ; { उत्तन। उतण } ] गर्वानें फुगणें. (२) [ उत् + तृण (ना.); { उत्तृण ।

उत्तण। उतण } ] गवत काढणें, उपडणें.

उतत [ उतप्त (ना.) { उतप्त । उतत्त । उतत } ] वर येणें, उतूं जाणें. उ - जेथ असीपत्र तरुवर । खदिरांगाराचे डोंगर ॥ तातला तेलीं सागर । उततातिं॥ ज्ञा. - १६-३७१.

उतफाळ [ उद् + स्फाल् १० कंपने ]

उतर १ [ उत् + कर्त्; कर्त्र्; कत्र् १० शैथिल्ये; { क् = अ = लोप } ] काढणें, कापणें, काढून टाकणें. उ - काम झालें नाहीं तर मी आपली मिशी उतरीन - उत्रीन. (उत्र पहा) (२) [ अव + तरणं (ना.); { अव + तरण । उ + तरणें । उतरणें } ] १ खालीं जाणें, २ खालीं ठेवणें. उ. - गळ्यांतून माळ उतरून - कंठात् मालां अवतार्य. (३) [ उत्तॄ १ गतौ; { उत्तॄ । उत्तर । उत्तर } ] पलीकडे जाणें. उ. - नदी उतरतो - नदीं उत्तरति. (४) [ उत् + तृंह् ७ हिंसायाम् ] (डोकें) उतरणें- दुखण्याचें थांबणें.

उतव १ [ उत्तप् १ संतापे; { उत्तप् । उत्तव । उतव } ] वर जाऊं देणें. उ - दूध उतवणें. *(उत ३ पहा)* (२) [ उत्तपनं ] कढून बाहेर येणें.

उतळ [ उत् + तूल् १० निष्कर्षे; { उत्तूल् । उतुळ । उतळ } ] १ पूर्ण असणें, भरून उरणें. २ तयार असणें.

उताट [ उत् + तट् १० हिंसायाम् { उत्ताटय । उताट } ] मारणें.

उताण १ [ उत् + तन् (वैदिक) ८ शब्दे] वर्णन करणें. (२) [ उत् + तन् ८ प्रसरणे ] उताणें ताणून पडणें.

उतान्ह [ उत् + तृष्णाय् (नाम); {उत् + तृष्णाय् । उतृण्हाय । उत्तण्हा । उताण्ह}] खूब तहान लागणें, तहानेनें व्याकुळ होणें.

उतार [ उत् + तारय् (णिच्); { उत्तारय। उत्तार । उतार } ] (उतारू) खालीं सोडणें, पोहोंचविणें.

उतुड [ उत् + तुद् ६ व्यथने; { उत्तुद् । उत्तुड् । उतुड } ] फुटणें, फाडणें, फोडणें.

उतुत १ [ उत् + तुद् ६ व्यथने; ( उत्तुद् । उत्तुत । उतुत } ] (अंगावर) फुटणें. (२) [ उत् + तुर् ३ त्वरायाम्; (उत्तुर् । उत्तुड् । उत्तुद् । उत्तुत ) ] त्वरेंत असणें, घाईत असणें. (३) [ उत् + तुर्त { उत् + तुर्त; { उत्तुर्त । उत्तुत । उतुत } ] घाईंत असणें. (४) [ उत् + त्वर् १ संभ्रमे; { उत्त्वर् । उत्तुर् । उत्तुड्। उत्तुद्। उतुत } ] घाईत असणें, घाई होणें.

उत्र [ उत् + कर्त्, कर्त्र्, कत्र् १० शैथिल्ये] काढणें, कापणें. इतर रूप - उतर १.

उत्पन्न [ उत् + पद् ४ गतौ; { निष्ठा उत्पन्न । नामधातु } ] उत्पन्न होणें.

उत्पाट [ उत् + पट् १० भेदे; (तत्सम) { उत्पाटय् । उत्पाट } ] फाटणें.

उत्फळ [ उत् + फल् १ विशरणे; { उत्फल् । उत्फळ } ] फुटणें.

उत्फाळ [ उत् + स्फाल् १० कंपने; { उत् + स्फाल् । स् = त् । ल् = ळ् । = उत्फाळ । उदफाळ } ] इतर रूप - उदफाळ १.

उथण [ अव + स्तन (ना.) ; { अव = उ । स्तन = थन = थण } ] (मूल) पिण्याचें सोडणें - थांबणें.

उदफाळ १ [ उत् + स्फाल् १० कंपने; { स् = त्; ल् = ळ् } ] (उत्फाळ पहा) (२) [ उद् + स्फाल् १० कंपने; { स् लोप } ]

उदमळ १ [ उत् + म्लै १ हर्षक्षये; { उत् + म्लै = उद् + म्लै । वर्णवियोग । उद्मूल् + ऐ = उदमळ } ] पोटांत घलन होणें. (उमळ ४ पहा) (२) [ उद् + ध्मलनं - ध्मल् १ घलने ] हृदयांत घलन होणें; (३) [ उद् + यम् + म्लै (व् लोप) द्विधातुसंयोग ] ओकावेंसें वाटणें इतर रूप - उद्मळ २. (४) [ उद् + यम् + (स्वार्थक ल) १ उद्गीरणे; { य लोप } ] ओकावेंसें वाटणें. (५) [ उद् + वृत् १ वर्तने; { उद् + वृत् = उद् व ऋत् उदमर्‌त् = उदमळअ = उदमळ; व = म } ] वास - सुगंध जिकडे तिकडे दरवळणें. (६) [ उद्मूलनं ] उमुळणें, उदमुळणें. उ० - झाड उदमळून पडलें.

उदमुळ १ [ उत् + मूल् १० रोहणे; { त् = द् } ] मुळासकट उपटून पडणें. *(उद्मुळ पहा)* (२) [ उद्मूलनं ] *(उमुळ १ पहा)*

उदमेख [ उत् + मिष् १ शब्दे; { त् = द् । ष् = ख् । गुण } ] स्पष्ट सांगणें, आज्ञा करणें, निक्षून सांगणें.

उदव १ [ उदय (ना.); { य = व } ] वर येणें, जमिनीवर दिसणें. (२) [ उत् + जि १ जये ; { उत् + जि = उद् + इ = उदय् = उदव } ] पराक्रम करणें - गाजविणें.

उदवि [ ऊद (ना.) ] धुपावणें.

उदळ १ [ उत् + दल् १ विशरणे; { त् + द् + द् = द } ] वर उडणें. (२) [ उत् + दल् १ विदारणे ] उदळणें. (अमृतानुभव) इतर रूप - उधळ ५ (३) [ उत् + दल् १ विशरणे; { त् + द् = द् + द् = द्द = द् } ] उसळणें.

उदाहर [ उदा + हृ १ हरणे ] उधारणें. उ - त्यानें सारीं टिपणें उदाहरलीं. *(उधार पहा)*

उदिम [ उत् + यम् १ उपरमे ] उदिवणें. *(उदिव पहा)*

उदिव [ उत् + यम् १ उपरमे ] उदिमणें. उद्यत = उदित, उद्यत + ल = उदैला. उ. - हे संग्रामीं अति उदित । जाले असति कीरु समस्त ॥ परि आपणयां उचित । केवि होये ॥ ज्ञा. १-१९४ इतर रूप - उदिम.

उदीप [ उत् + दीप् ४ दीप्तौ; { त् + द् । = द्द = द् } ] प्रकाशित असणें - होणें. इतर रूप – उद्दीप.

उदे १ [ उत् + इ २ गतौ ] वर येणें, उगवणें. (२) [ उत् + इ २ गतौ { त् = द् + इ = दि = दे } ] उत्पन्न होणें, प्रकाशणें. कर्मणि - उदीयते = उदेजे. निष्ठा उदित + ल = उदेलें. (३) [ उद् + इ २ गतौ ] नजरेपुढें आणणें, उजेडांत आणणें उ - जुनी पोथी अमृतानुभव ४५० (४) [ उद् + इ २ गतौ ] वर येणें. (५) [ वद् - उदित (ना.) ] उ. - अशी वाचा उदेली = बोलली गेली.

उदेग [ उत् + विज् ६ भयचलनयोः; { उत् + विज् = उद् + इज् = उदेज् = उदेग । त् = द् । ज् = ग् } ] दुःख होणें, उद्वेग होणें.

उदेज [ उत् + एज् १ दीप्तौ; {त् = द्} ] वर येणें, उगवणें. उ. - सूर्यो उदेजे - सूर्य उगवतो.

उदैज [ उत् + आ + एज् १ कंपने ] हलणें, हालचाल करणें. उ. - मग शाखांचेनि आंगभरें । लवौनि गुंपति परस्परें ॥ गुणक्षोभाचें वारें ।

उदैजति ॥ ज्ञा. १५-१५२

उद्गद १ [ उत् + गद् १ भाषायाम्; { त् = द् } ] मोठ्यानें बोलणें. (२) [ उत् + गद् १० देवशब्दे, गर्जने { त् = द् } ] खवळणें.

उद्गर [ उत् + गॄ ९ शब्दे; { त् = द् }] बोलणें. (उद्गार २ पहा)

उद्गार १ [ उत् + गॄ ९ शब्दे { त् = द्। वृद्धि } ] बोलणें. (२) [ उत् + गॄ ९ शब्दे; { त् = द् } ] बोलणें. इतर रूप - उद्गर.

उद्दीप [ उत् + दीप् ४ दीप्तौ; { त् + द्}] प्रगटणें. उ - कां तारांगणी लोपावें। सूर्यकांतें उद्दीपावें ॥ कमलीं विकाशावें । जावें तमें ॥ ज्ञा. १४-२९४ (उदीप पहा)

उद्धर १ [ उत् + धृ १ धारणे; { त् = द् । उत् + धृ । उद् + धृ । उद्धर । गुण } ] वर काढणें, मोक्षास नेणें, वाईट स्थितींतून बाहेर काढणें. (२) [ उद + धृ १ धारणे; ] इतर रूप – उद्धार १. (३) [ उद् + ह्वृ १ कौटिल्ये; { उद् + ह्वृ । उद् + ध्वृ । उद् + धृ । उद्धर । गुण } ] पाडणें, पडावयास लावणें, शिव्या देऊन अपमान करणें. उ. - त्यानें माझीं बेचाळीस पितरें उद्धरलीं. इतर रूप- उद्धार २. (४) [ उद् + ध्वृ १ हूर्छने; { उद् + ध्वृ । उद् + धृ (व् लोप ] । गुण । उद्धार } ] खालीं पाडणें, अपशब्द बोलणें. इतर रूप - उद्धार ३.

उद्धार १ [ उद् + धृ १ धारणे ] (उद्धर २ पहा) (२) [ उद् + ह्वृ १ कौटिल्ये] (उद्धर ३ पहा) (३) [ उद + ध्वृ १ हूर्छने { उद् + ध्वृ । उद् + धृ (व् लोप) । वृद्धि । उद्धार } ] खालीं पाडणें. *(उद्धर ४ पहा)*

उद्भव [ उद् + भू १ सत्तायाम् ] *(संभव २ पहा)*

उद्मळ १ [ उत् + ह्मल् १ कंपने; { उत् + ह्मल् + उद् + ह्मल । उदमळ । ह् लोप} ] उर उडणें. (२) [ उत् + वम् + म्लै १ हर्षक्षये ] ओकावेंसे वाटणें. *(उदमळ ३ पहा)*

उन्मुळ [ उत् + मूल् १ प्रतिष्ठायाम् ] उचमुळणें, उदमुळणें.

उद्वस [ उत् + वस् (णिच्) १० निवासे; { उत् + वस् । उद् + वस् । णिच् । उद् + वास् } ] बाहेर काढणें, हद्दपार करणें. इतर रूप - उद्वास.

उद्वास [ उत् + वस् (णिच्) १० निवासे; { उत् + वस् । उद् + वस् । णिच्। उद् + वास् } ] हद्दपार करणें. (उद्वस पहा)

उध [ उत् + धा ३ धारणपोषणयोः { उत् + धा । उध् + धा (लोप ध्) उध । णिच् । उधव } ] वर उचलणें. उ. - येयाचिया प्रतीती । विचारविरिं समस्तीं ॥ नेंदिजे चि संशृति । माथा उधों ॥ ज्ञा. १४-४९

उधड १ [ उत् = दॄ ९ विदारणे; { उत् = उद् + दॄ । उद् + दार । उदाड् । उधड} ] (शिंगानें वस्त्रादिक) फाडणें. (२) [ उत् + हठ् १ बलात्कारे; { उत् + हठ् । उद् + हठ् । उध् + धठ् । उधड । ठ् = ड् } ] धुडकावणें. (३) [ उत् + धुर्व् १ हिंसायाम्; { उत् + धुर्व् । उद् + धुर्व् । उध् + धुर्व् । उधड । र् = ड्; व् लोप } ] बाहेर घालवणें. (४) [ उत् + धटी (ना.); { उद् + धटी । उधड । ट् = ड् } कापडाचीं सुतें काढणें, वीण उकलणें.

उधण [ उत् + हा ३ गती; { उत् + हा। उध् + धा । उध । निष्ठा । उधण } ] वर उडणें, उसळणें. उ. - तिखट उधणलें - उधळलें.

उधम [ उद् + ध्मा १ शब्दाग्निसंयोगयोः; { उद् + ध्मा । उध् + ध्मा । ध् लोप । उधम } ] वर उसळणें - उदसणें. उ. - तिखट उधमलें.

उधर [ उध्रस् (उध्रस्नाति) ९ उंछे; { उध्रस् । उध्र्‌स । स् लोप । उधर} ] वर फेकणें, उचमळणें, ओकणें. उ. - मला उधरतें.

उधव १ [ ऊर्ध्व (ना.) { उर्ध्व । उध्र्व् । र् लोप । उधव } ] वर उभें करणें, वर करणें, उचलणें. उधवणें. - वर उभें करणें. नुधवणें - उभें न करणें. उ - मग लवों नेणति कैसे आटिंव लोहखांब जैसे ॥ कां उधवली आकाशें। शिलाराशी ॥ ज्ञा. - १६-३७७ इतर रूप - नुधव. (२) [ उत् + धू १ चलने; { उत् + धू । उद् + धू । उध् + धू । ध लोप । उधव् । गुण } ] वर करणें, उचलणें. (३) [ उत् + धा ३ धारणे; (त् = द् = ध्) (उध् + धा । ध् लोप । उधव } ] उठवणें, वर करणें. (४) [ उत् + हन् २ हिंसायाम्; { उत् + हन् । उध् + हन् । उधन् । उधंअ । उधंव } ] वर करणें, उचलणें. (५) [ उत् + हा ३ गतौ ] उठवणें, वर करणें.

उधवि [ उत् + धा ३ धारणे; ( उत् + धा । उध् + धा। उधव ) ] वापरून ठेवणें, वापरणें.

उधस १ [ उद्ध्वस्त = (नाम); ( उद्ध्वस्त = उद्वस्त ( व् लोप ) = उद्धस्स = उधस ) ] वर येणे. (२) [ ऊर्ध्व्; ( ऊर्ध्व् = उर्ध् व लोप)] वर येणें, उदसणें.

उधळ १ [ उत् + ह्वल् १ चलने; ( उत् + ह्वल् । उध् + ध्वल् । व् लोप, ध् लोप। उधळ ) ] खर्च करणें, संपविणें. (२) [ उद् + ह्वल् १ गतौ ] उ.- घोडे उधळणें. (३) [ उध्रस् ९ क्षेपे, उंछे उध्रस्नाति; ( उध्रस् । उध्र्‌ह् । उध्ळअ। उधळ ) ] संपविणें, खर्च करणें, वर फेकणें. उ.- भंडारा उधळला; खोबरे उधळलें. (४) [ उद् + धन (ना.) धनाय् ( उद् + धन । उद्धन । उधळ ) ] संपत्ति नासणें. (५) [ उत् + दल् १ विदारणे; ( उत् + दल् । उद्दल । उधळ ) ] फोडणें, संपविणें, उदळणें (अमृतानुभव) *(उदळ २ पहा)* (६) [ ऊर्द् १ क्रीडायाम्; ( ऊर्द् । = उदर । वर्णव्यत्यास । र् = ल् । उधळ ) ] उ.- तट्टू उधळलें = खेळत उड्या मारूं लागले. (७) [ उत् + धूलि (ना.) ] उधळिलें.

उधाण [ उद्धान (ना.); ( उद्धान । उधाण) ] वर उचलणें, पसरणें. इतर रूप - उधाळ.

उधान १ [ उत् + हा ३ गतौ; ( उत् + हा । उद् + हा । उध् + धा । उधा (ना.) उधान = भरती (समुद्राच्या पाण्याची)] वर जाणें. (२) [उद्धननम् (नाम) तारुण्यानें मुसमुसणें. (३) [ उधान (ना.) ] भरती येणें, पाणीवर चढणें. (भांग आणि उधान) हा शब्द कोंकणांत वापरतात.

उधार [ उदा + हृ १ हरणे; (उदा + हृ = उदाहर । गुण । उधार । सघोष

उच्चार) ] उ.-त्यानें सारीं टिपणें उधारलीं. इतर रूपें-उध्धार, उदाहर.

उध्धार [ उदा + हृ १ हरणे] उ.- त्याने सारीं टिपणें उध्धारलीं. *(उधार पहा)*

उधाळ [ उद्धान (ना.) ] उधाणणें. *(उधाण पहा)*

उधोळ [ उत् + धूलय् (ना.); ( उद्धूलय - उधोळ ) ] चूर्ण करणें, पीठ करणें.

उनड [ उत् + नट् १ नृतौ, क्रीडायाम्; ( उत् + नट् । उद् + नट् । उन्नट् । उनड ) ] उद्योगाशिवाय फिरणें. इतर रूप - उनाड १

उनाड १ [ उत् + नट् १ नृतौ; ( उत् + नट् = उन् + नड् । उन्नाड् । वृद्धि )] *(उनड पहा)* (२) [ उत् + नाथ् १ उपतापे, पीडायाम् ( उत् + नाथ् । उन्नाठ् । उन्नाड् । उनाड ) ] फिरणें, भटकणें.

उनिद [ उत् + निद्रा (ना.); ( उन्निद्रा = उनिद ) ] झोपेंतून उठणें (ज्ञानेश्वर)

उन्नाड [ उन्नाटयति (नट् १ नृतौ ) ] उनाडणें, चेष्टा करीत भटकणें.

उन्मल [ उत् + मूल् १० रोहणे ] मुळासह उपटणें. (कर्मणि) उपटले जाणें. उ.- फलती केलि उन्मले । तैसी आत्मलाभे प्रवले ॥ तेयांची क्रिया ढाले ढाले । गलती आहे ॥ ज्ञा. १५-२५७

उन्मळ [ उत् + म्लै १ हर्षक्षये; (उत् + म्लै = उन्मळ) ] उदमळणें. *(उमळ ६ पहा)*

उन्माद १ [ उत् + मद् १ मदे माद्यति; ( उत् + मद् । उन् + माद्य । सविकरण)] माजणें, उन्माद होणें. (अमृतानुभव) (२) [ उत् + मद् (णिच् ) क.; ( उन्माद् । णिच् । उन्मादय् । कर्मणि । उन्माद्य । उन्माद)] खवळणें.

उन्मिळ [ उत् + मील् १ निमेषणें; (उन्मिळ्) ] पहाणे, डोळे उघडणें.

उन्मीळ १ [ उत् + मील् १ निमेषणे ( उत् + मील् । उन्मीळ ) ] डोळे उघडणें, पहाणे. (२) [ उत् + मील् १ नीमेषणे ] पहाणें. (अमृतानुभव)

उन्मुळ [ उत् + मूल् १० रोहणे; ( उत् + मूल् । उन्मूळ् ) ] उपडून काढणें, उपटणें. *(उचमुळ पहा)*

उन्मूल [ उत् + मूल् १० प्रतिष्ठायाम् रोहणे ] *(उन्मूळ पहा)*

उन्मूळ [ उत् + मूल् १० प्रतिष्ठायाम् रोहणे ] मुळासकट उपटणें. इतर रूप - उन्मूल.

उन्मेख [ उत् + मिष् १ शब्दे; ( उत् + मिष् । उन्मिष् । गुण । उन्मेख् । उन्मेख) ] उन्मेखणें.

उन्ह [ उष्ण (ना.); (उष्ण । उण्ह । उन्ह)] तापणें, उन्ह लागणें.

उन्हाट [ उष्णिष्ट (ना.); ( उष्णिष्ट । उह्लिट्ठ । उन्हाट ) ] सूर्याच्या किरणांनी भाजून जाणें.

उन्हाळ [ उष्णल (ना.); ( उष्णल = उण्हल = उन्हाळ) ] उन्हाने त्रासणें, उन्हाचा त्रास होणें.

उप १ [ उत्पू १ पवने; उत्पू - उप्पू - उप)] स्वच्छ करणें, ओपणें. इतर रूपे - ओप ३, ओपव. (२) [ वप् १ बीजसंताने; (वप् । संप्रसारण । उप् ) ] पेरणें. इतर रूप - उंप.

उंप [ वप् १ बीजसंताने ] पेरणें. *(उप २ पहा)*

उपकर [ उप + कृ ८ करणे; (उपकर् । गुण ) ] उपकार करणें, उपयोग पडणें, न + उपकृ - नुपकरणें -

उपयोग न पडणें. इतर रूप - नुपकर.
उपख [ उप + क्षि १ क्षये, नाशे; ( उप + क्षि = उपख । क्ष् = ख् ) ] १ नाश पावणें, २ कमी होणें.

उपज १ [ उत् + पद् ४ गतौ; (उत्पद्य् । उप्पज्ज् । उपज् ) ] उत्पन्न होणें. उत्पन्न + ल । निष्ठा । उप्पन्नल । उपनले. उप्पज्ज + ल । उपजले. *(उपनले पहा)* (२) [ उप + जन् ४ प्रादुर्भावे जायते ] उत्पन्न होणे.

उपट १ [ उप + स्था १ गतिनिवृत्तौ उपतिष्ठते; ( उपस्था = उपत्था, = उपट ) ] उद्भवणें, सुरू होणें, येणें. उ.- सकाळी पोटांत कळ उपटतें; रोग उपटला - जवळ आला, सुरू झाला. (२) उद् + पथ् १० प्रक्षेपे गतौ; (उद् + पथ् = उत् + पथ् = उप्पथ् = उपट (३) [ उद् + पट् १ गतौ ] (४) [ उपस्थानम्; ( उपस्थानम् = उपटणे ) ] सिद्ध होणें. उ.- लग्न उपस्थित - लगीन उपटलें.

उपड १ [ उत् + पत् १ गतौ ; ( उत्पत्। उप्पत् । उपड् ) ] वर येणें किंवा बाहेर पडणें. (२) [ अव + पत् १ गतौ; (अव + पत् । उ + पत् । उपड ) ] खाली पाडणें, उलटे होणें, उपडे होणें. (३) [ अव + पट् १ गतौ; ( अव + पट् । उ + पट् । उ + पड् । उपड )] खाली वर फाडणें. (४) [ उत्पादः (ना.); ( उत्पादः । उप्पादः। उप्पाड । उपड, उपाड ) ] उपडे पडणें. इतर रूप-उपाड.

उपण १ [ उत् + पण् १ व्यवहारे; ( उत् + पण = उप्पण-उपण ) ] विकावयास काढणें, विक्रीसाठी बाहेर ठेवणें. उ. - अर्जुना वेदु जन्हीं जाला । तऱ्हीं मी नेणतां वायां गेला ॥ कणु सांडौनि उपाणिला । कोंडा जैसा ॥ ज्ञा. ९-३२९ (२) [ उत् + पल (नाम); (उत्पल । उपण ) ल=न्=ण ) ] कोंडा पाखडणें. (३) [ उत्पवन (ना.) उत्पवनायते (उत्पवन=उप्पवन= उपण ) ] वाऱ्यावर धरणें.

उपतर [ उम् = उंभ् ६ पूरणे; ] एकत्र होणें, फोडासारखे वाढणें. *(उबतर पहा)*

उपतिष्ठ [ उप + स्था१ गतिनिवृत्तौ (उपतिष्ठ) ] थांबणें, जवळ येणें.

उपद्रव [ उप + द्रु ९ हिंसायाम् ] त्रास देणें, ओसाड करणें.

उपनले [ उत्पन्न + ल; (संस्कृत निष्ठेपासून मराठी निष्ठा) ] *(उपज १ पहा)*

उपम [ उप + मा २ माने ] तुलना करणें. (ज्ञानेश्वर) *(उपमि पहा)*

उपमा [ उप + मा २ माने ] तुलना करणें.

उपमि [ उप + मा २ माने ] तुलना करणें. इतर रूप-उपम

उपरंड [ उपरि + अंठ् १ गतौ; ( उपरि + अंठ् । उपर्यंठ् । उपरंड ) ] उलथें करणें, उफराटे करणें. इतर रूपे - उपरांड, उफरांड.

उपरत [ उत् + परत ] उपराटें फिरविणें *(परत पहा)* इतर रूप - उपरतवि

उपरते [ उत् + प्रति + इ किंवा उत् + परि + इ खाली डोके वर पाय होणें = उत्प्रत्ययत् किंवा उत्पर्ययत् ] उपरते = उपराठे

उपरतवि [ उत् + परत ] उपराट फिरविणे. (उपरत पहा)

उपराट १ [ उत् + परि + अट् १ गतौ; ( उत्पर्यट् । उप्परट् । उपराट ) ] उपराटें करणें. *(उफराट १ पहा)*

(२) [ उत् + प्रति + अट् १ गतौ ] उपराटें करणें. *(उफराट २ पहा)*

उपराठ [ उपरि + अठ् १ गतौ ] उपराटें फिरविणें-करणें. इतर रूप - उफराठ.

उपरांड [ उपरि + अंठ् १ गतौ ] *(उपरंड पहा)*

उपराळ १ [ उपरि + ऋ १ गतौ; ( उपरि + ऋ । उपरि + अर् । गुण । उपर्यर्। उपराळ ) ] ओलांडणें, वरून जाणें. (२) उपरि + अल् १ पर्याप्ती, पूरणे; (उपर्यल् । उपराळ ) ] मदत करणें. (३) [ उप् + ग्राहय् ( ग्रह् णिच्); ( उप + ग्रह् । णिच् । उपग्राहय् ) ] उपराळणें, उपराळा.

उपल [ उत् + पल्यूल् १० पवने ] *(उपळ ३ पहा)*

उपलभ [ उप + लभ् १ प्राप्तौ; (उपलव)] दृढ धरणें. लपलवला-ज्ञानेश्वरी. इतर रूप-उपलंभ.

उपलंभ [ उप + रभ् १ राभस्ये ] ( उपरंभ्। उपलंभ् ) ] जवळ असणें; दिसणें. *(उपलभ पहा)*

उपलव १ [ उप + लभ् १ प्राप्तौ; (कर्मणि उपलभ्) ] दिसणें, जवळ असणें. (२) [ उप + रभ् १ राभस्ये; ( उपरंभ्। उपलंभ् ) ] दिसणें, जवळ असणें. (३) [ उप + लू ९ छेदने ] तोडणें, छेद करणें. उ.- सेवते पना बाहीरी । न नीगतांची परी ।। पांती साहा सवारी । उपलवली । जुनी पोथी अमृतानुभव ७०९ (४) [ उप + ली ४ (लापयति) श्लेषणे; {उपलापय् । उपलव } विस्तार करणें. (५) [ उप + लप् १ व्यक्तायां वाचि ] (६) [ उप + लभ् १ प्राप्ती, ज्ञाने; (उपलभ् । णिच् । उपलव ) ] उ.- आतां आसुरी सृष्टी । तेथिची उपलउं गोठी ।। अवधानाची दीठी । दे पां नीकी ।। ज्ञा. १६-२७३

उपलवि [ उप + लप् १ व्यक्तायां वाचि; ( प् = व्) ] विस्तारानें सांगणें.

उपवढ १ [ उत् + प्रबुध् १ बोधने, ज्ञाने; (उत्प्रबुध् । उप्पवुड । उपवढ ) ] जागे असणें. उ.- स्वप्नींचें राज्य कां मरण । नव्हे हर्षशोकासि कारण । उपवढलयां जाण । जिया परी ।। माडगांवकर, ज्ञा. १५-२९४ (२) [ उत् + प्र + स्वप् २ स्वापे ] झोपेतून उठणें, जागणें. *(उपहुड १ पहा)*

उपवुढ [ उत् + प्र + स्वप् २ स्वापे ] झोपेतून उठणें, जागणें. *(उपहुड १ पहा)*

उपसंहर [ उप् + सम् + हृ १ हरणे; (उपसंहर । गुण ) ] भाषण संपविणें, शेवट करणें, आखडतें घेणें.

उपसाह [ उप + सह् १ मर्षणे ]

उपहुड १ [ उत् + प्र + स्वप् २ स्वापे ] झोपेंतून उठणें, जागणें. इतर रूपे- उपवुढ, उपवढ २ (२) [ उप + घुट् १ परिवर्तने; घोटते (उपघुट् । उपहुड)] परत येणें. उत्प्रस्वापः = उपहुढ, उपवढ (जागरण) उ - निवटलें नुपहुडे। जलिनले न विरुढे ।। साम्यबुद्धि न मोडे। तियांपरी ।। ज्ञा. १४-३५६

उपळ १ [ उत् + प्लु १ गतौ; ( उत्प्लु । उप्पल् । उपळ ) ] पातळ पदार्थांतून घाण काढणें. उ.- तूप उपळणें (उपळा काढणें) (२) [ उत्प्लवनं ] (३) [उत् + पल्यूल् १० पवने; (उत्पल्यूलयति) ] धुणें, क्षारांत घालून उकळणें. उ.- धोतरें उपळणें. इतर रूप - उपल (४) [ उत् + प्लु १ गतौ;

(उत्प्लु = उप्पल् = उप८ ) ] उ. - फोड उपळला म्ह. वर उचलून आला. *(उपुळ पहा)*

उपाइ [ उत् + पद् ( णिच् ) १० गतौ (उत्पादय् । उपाअइ । उपाइ )] उत्पादणें. इतर रूपें-उपाय, उपाव १

उपाट [ उत् + पाटय् १० वेष्टने; (उत्पाटय् । उप्पाटय् । उपाट ) ] बाहेर काढणें, उपटणें.

उपाड [ उत्पादः (ना.); ( उत्पाद । उप्पाड। उपाड ) ] उपडणें, मुळामह बाहेर काढणें. (उपड ४ पहा)

उपाय [ उत् + पद् ( णिच्) ४ गतौ; ( उत्पादय । उप्पाअइ । उपाय ) ] उपाइणें, उपाय योजणें. (उपाइ पहा)

उपाव १ [ उत् + पद् ( णिच्) ४ गतौ; ( उत्पद् । णिच् । उत्पादय । उप्पाअइ। उपाय ) ] उपाइणे, उपाय योजणें. *(उपाइ पहा)* (२) [ उप + प्राप् ५ लाभे; (उपप्राप् । उपाअ । उपाव ) ] जवळ येणें. (३) [ उत्पादः (ना.) ( उत्पाद = उप्पाअ = उपाव ) ] चवड्यांवर उभे राहणें. (४) उत् + प्यै १ वृद्धौ; ( उत्प्याय । उप्पाव । उपाव ) ] वाढविणें.

उपास १ [ उप + अश् ९ भोजने; उपाश् = उपास् ) ] जेवणाच्या ऐवजीं खाणें, थोडे खाणें. उ.- उपासाला वऱ्या घालतात; भक्कम जेवण पाहिजे असें नाहीं. (२) [ उप + आस् २ उपवेशने; ( उप + आस् = उपास् )] पूजा करणें, पूजणें ( धार्मिक व्रत करणे).

उपाळ १ [ उत् + प्लु १ गतौ ] ; वर येणें, शरिराच्या कातड्यावर फोड येणें. (२) [ उत् + प्लु १ उत्पतने; ( उत्प्लु = उप्पाल = उपाळ ) ] उडी मारणें, उड्या घेणें (रामदास)

उपिक [ उत् + पच् १ पाके; ( उत्पच् = उप्पच्=उपक्=उपिक ) ] जास्त पिकणें, जास्त होणें.

उपिठ १ [ उत् + पिष् - पिष्ट; ( उत्पिष्ट (निष्ठा) = उप्पिठ ) ] कणकेच्या गोळ्याप्रमाणें मऊ होणें. (२) [ उत् + पिट् १ शब्दसंघातयोः; ( उत्पिट् = उप्पिट् = उपिठ ) ] तडकणें.

उपुस [ उद् + पुच्छ् १ प्रमादे; ( उद्पुच्छ् = उप्पुच्छ्=उप्पुस = उपुम ) ]

उपुळ [ उत् + प्लु १ गतौ; ( उत्प्लु = उप्पल् = उपुळ ) ] उ.- फोड उपुळला म्ह. वर उचलून आला. इतर रूप- उपळ ४ (२) [ उत्पुलकायते ] उ.- फोड उपुळला.

उपेळ [ उत् + प्रेर् ( प्र + ईर्) १० क्षेपे; ( उत्प्रेर् = उप्पेर् = उपेळ ) ] चिडणें, विथरणें. माडगांवकर पोथी ज्ञा. १५- ३४३

उपेक्ष [ उप + ईक्ष् १ दर्शने ] उपेक्षा करणें. (काव्य) इतर रूप-उपेक्षि.

उपेक्षि [ उप + ईक्ष् १ दर्शने ] उपेक्षा करणें. *(उपेक्ष पहा)*

उफक [ उप + ईक्ष् १ दर्शने; ( उपेक्ष् = उपेक्ष् = उफक ) ] उपेक्षिणें, उपेक्षा करणें.

उफग [ उत् + फुगणें; (उत्फुग पहा) ] रिक्त होणें (फुगण्याच्या उलट) ( फु तील उ उत् मुळें गेला. )

उफट [ उत् + फट् (पट्) १० श्वेते, प्रकाशे; ((उत्पट्) उत्फट् = उप्फट् = उफट ) ] फिक्कट दिसणें.

उफड १ [ उत् + स्फट् ( स्पट्) १ चलने, भेदे; ( उत् + स्फट् = उस् + स्फट् =

उफड् = उफड ) ] वाढणें, उकलणें. *(उफाड ४ पहा)* (२) [ उत् + फल् १ विशरणे; ( उत्फल् = उफड । ल् = र् = ड् ) ] उकलणें. इतर रूप - उफाड ५ (३) [ उत् + भृज् १ भर्जने; ( उत् + भृज् = उद् + भृज् = उ + भृज् = उपड ) ] भाजणें, तळणें. उ.- ना तरी अर्ध उफडिले । कां निपट करपोनि गेलें। तैसे हि खाय चुकलें । रसा जें येवों ।. माडगांवकर ज्ञा. १७-१५६ (४) [ उत् + भ्रस्ज् ६ पाके; ( उत् + भ्रस्ज् = उअ + भ्रस्ज् = उफड ) ] भाजणें, तळणें. उ.-वरील ज्ञा. १७-१५६

उफण [ उत् + फण् १ गतौ; ( उत् + फण् = उप्फण् = उफण ) ] एकदम वाढणें, झपाट्याने वाढणें. (उफाणणे) इतर रूप-उफाण.

उफराट १ [ उत् + परि + अट् १ गतौ; ( उत् + प्ररि + अट् = उप्पर्यट् = उफराट } ] मागें फिरणें, परतणें. इतर रूप - उपराट १ (२) [ उत् + प्रति + अट् १ गतौ; { उत् + प्रति + अट् उत्प्रत्यट् = उप्प्रअट् = उफराट )] इतर रूप - उपराट २ (३) [ उत् + प्रति + कृ ८ करणे; ( उत्प्रति कृ = उफराट ) ] एकाद्याच्या उलट करणें, विरुद्ध करणें. (४) [ उत् + प्रति कृष् १ विलेखने - विलेखनम् आकर्षणम् ( उत्प्रति कृष् = उप्पइ अरष् = उफराट ) ] वाईट दिशेकडे नेणे, चुकीच्या बाजूनें नेणें.

उफराठ [ उपरि + अठ् १ गतौ; (उपर्यठ् = उफराठ ) ] उफराटें फिरविणें - करणे. *(उपराठ पहा)*

उफरांड [ उपरि + अंठ् १ गतौ ] (उपर्यंठ् = उपरंड = उफराट ) ] *(उपरंड पहा)*

उफल १ [ उत् + फल् १ गतौ; ] परत फिरणें, परत उसळी मारणें. उ.- उदकाचिये भूमिके । आफलिलेन कुंदुकें ॥ उफलीनि माघौतें । नैयेजे हातां ॥ ज्ञा. १७-२७९. इतर रूप - उफळ २ (२) [ उत् + स्फल् ६ संचलने ] वर उसळी मारणें. इतर रूप - उफळ १

उफळ १ [ उत् + स्फल् ६ संचलने; ( उत्स्फल् = उफळ) ] वर उसळी मारणें. (उफल २ पहा) (२) [ उत् + फल् १ गतौ ] परत फिरणें, परत उसळी मारणें. *(उफल १ पहा)* (३) [ उत् + स्फाल (नाम); ( उत्स्फाल् = उफळ ) ] परत फिरणें, नांगराच्या फाळासह वर येणें. इतर रूप - उफाळ

उफाड १ [ उत् + स्फुट् १ विकसने; ( उत्स्फुट् = उप्फुट् = उफड अथवा उफाड ) ] जोरानें विकासणें. (२) [उत् + प्र + वृध् १ वृद्धौ; ( उत्प्रवृध् = उप्पवुढ = उफाड ) ] वाढणें, शरिरानें धष्टपुष्ट होणें. (३) [ उद् + फल् १ गतौ; (उत्फल् = उफड = उफाड ) ] विकासणें. (४) [ उत् + स्फट् १ चलने ] जोरानें विकासणें. इतर रूप-उफड १ (५) [ उत् + फालय् ] ( उफड २ पहा)

उफाण [ उत् + फण् १ गतौ ] *(उफण पहा)*

उफाळ [ उत् + स्फाल् ] (उफळ पहा)

उफिट [ उत् + स्फिट् १० स्नेहने ] उफिटणें.

उफिण १ [ उत् + फेन (ना.); (उत्फेन = उप्फेन = उफेण ) ] फेस येणें. (उफेण १ पहा) (२) [ उत् + फेणू (ना.) उफिणणें *(उफेण २ पहा)*

उफुज [ अव + स्फुर्ज् १ वज्रनिर्घोषे ] कुरकुर करणें, धुसफुसरणें. इतर रूप- उफुस २

उफुस १ [ उत् + प्रुष् ९ पूरणे; ( उत्प्रुष् = उप्प्रुस = उफुस ) ] फुगा येणें, बुडबुडें येणें. (२) [ अव + स्फुर्ज् १ वज्रनिर्घोषे; (अवस्फुर्ज् = उस्फुर्ज् = उफुज; उफुस ) ] कुरकुर करणें, धुसफुसणें. *(उफुज पहा)*

उफुळ [ उत् + फुल्ल् १ संघाते; ( उत्फुल्ल् = उप्फुल्ल् = उफुळ ) ]

उफे [ उत् + स्फाय् १ वृद्धौ; ( उत्स्फाय् = उफे ) ] वर येणें, भूपृष्ठावर येणें.

उफेक [ उप + प्र + ईक्ष् १ दर्शने, उपेक्षायाम्; ( उप + प्रेक्ष् = उफेक )] कानाडोळा करणें, दुर्लक्ष करणें. (ज्ञानेश्वरी)

उफेण १ [ उत् + फेन (ना.) (उत्फेन = उप्फेन = उफेण ) ] फेस येणें. इतर रूप-उफिण १ (२) [ उत् + फेण (ना.) ] इतर रूप-उफिण २.

उब १ [ उंभ् ६ पूरणे; ( उंभ् = उब ) ] उष्णता उत्पन्न करणें. उ. - अंडी उबणें. इतर रूप - उबवि. (२) [ उष्म (ना.) ( उष्म = उह्म = उब ) ] उष्णता उत्पन्न करणें.

उबग १ [ उत् + भंज् ७ आमर्दने; ( उद्भंज् = उबग) ] मोडून जाणें, कंटाळणें. इतर रूप - उभग. (२) [ उत् + वंघ् १ कैतवे, निंदायाम्; ( उद्वंघ् = उव्वंघ = उबग ) ] दुर्लक्ष करणें. (३) [ उत् + विज् ६ भये, भीकंपे; ( उद्विज् = उविग् = उबग् )] कंटाळणें, त्रासणें. इतर रूप - उबज २ (४) [ उप + स्पश् १ बाधने; (उपस्पश् = उबग) ] उपेक्षिणें. (५) [ उष्म (ना.); (उष्म = उह्म = उब + ग ) ] ऊब वाटणें, उन्ह वाटणें.

उबज १ [ उब्ज् ( उज्ज् ) ६ ऋजुभावे; ( उब्ज् = उबज । वर्णविच्छेद ) ] (कृति करून भाताचें रोपटें) ताठ करणें. (२) [ उत् + विज् ६ भीकंपे; (उद्विज् = उविज = उबज ) ] *(उबग ३ पहा)*

उबजर [ उत् + ज्वर् १ रोगे; ( उत्ज्वर् = उज्ज्वर् = उजबर = उबजर । वर्णव्यत्यास ) ] प्रकृति सुधारणें, पूर्ववत् होणें.

उबजळ [ उप + जृ ९ वयोहानौ; ( उपजृ = उपजर । गुण । उबजळ ) ] कंटाळा येणें, त्रासणें.

उबट [ उष्मिष्ट (ना.) (उष्मिष्ट = उह्मिट्ट = उबट ) ] ऊन होणे, उष्णता लागणें.

उबड [ उत् + पत् १ पतने; ( उत्पत् = उप्पत् = उबट् = उबड ) ] उपडें होणें.

उबतर [ उभ् (उंभ्) ६ पूरणे; ( उभ् = उब + तर ) ] एकत्र होणें, फोडासारखें वाढणें. इतर रूपे - उबदर, उपतर.

उबदर [ उभ् ( उंभ् ) ६ पूरणे ] *(उबतर पहा)*

उबर १ [ उत् + व्रण १० गात्रविचूर्णने; (उत् + व्रणू = उद्व्रण = उवर = उबर ) ] जखमेतून पाणी निघणें. (२) [ उत् + वृह् १ वृद्धौ; ( उत् +

बृह् = उद्बृह् = उबरअ = उबर ) ] पेंढीसारखा आकार येणें.

उबव [ उष्म (ना.); ( उष्म = उह्म = उब। णिच् । उबव ) ] उन्ह करणें, उष्णता देणें, आंच देणें. इतर रूप - उबाव.

उबवि १ [उंभ ६ पूरणे ] अंडी उबविणें. (उब १ पहा) (२) [ उंभ् ६ पूरणे; (उंभय = उबव ) ] भरून येणें, सांचणे *(उब १ पहा)*

उबळ १ [ उत् + बल् १ प्राणने, भेदे; ( उव्दल् = उव्वल् = उबळ ) ] एकदम बाहेर येणें, उ. - खोकला उबळतों, खोकल्याची उबळ. इतर रूपे- उभळ २, उव्वळ, उव्बाळ. (२) [ उत् + बल् १ प्राणने ] उत्सुक असणें-होणें. इतर रूप - उभळ (३) [ उव्दल् ] (४) [ उत् + भ्रूण (ना.); ( उत् + भ्रूण् = उद्भ्रूण = उबूळ = उबळ ) ] गर्भाशयामध्येच गर्भ नाहीसा करणें. (५) [ उद् + भ्रस्ज् १ पाके; ( उद्भ्रस्ज् = उब्भ्रज्ज् = उभरअ = उबळ ) ] भाजणें.

उबार १ [ उद् + बर्ह् १० भाषार्थः प्रकाशने; ( उद्बर्ह् = उब्बर् = उबार)] (२) [ उष्म (ना.); ( उष्म = उम्ह = उब + र ) ] उष्णतेनें पिकविणें.

उबाव [ उष्म (ना.) ] *(उबव पहा)*

उबाळ १ [ उद् + भ्लाश् १ दीप्तौ; (उद्भ्लाश = उब्भ्लाह = उबाळ ) ] भाजणें. (२) [ उष्म (ना.) ]

उबुज [ अव + बुध् ४ अवगमने; अवबुध्यते ( अवबुध्य। सविकरण । = अवबुज्झ् = उबुज ) ] जाणणें, ओळखणें.

उव्वळ [ उत् + बल् १ प्राणने ] *(उबळ १ पहा)*

उव्बाळ [ उत् + बल् १ प्राणने ] *(उबळ १ पहा)*

उभ १ [ उत् + भृ १ भरणे; [ उत्भृ = उद्भृ = उब्भृ = उभ ) ] (२) [ उर्ध्व (ना.) = उभ ] वर करणें, उचलणें. उ.- जन्मलेया दिहें दिवसे । हो लागे कालाचेया ऐसें ॥ किं वाढती करिति उल्हासें । उभिति गुढिया ॥ ज्ञा. ९-५०७ (३) [ उत् + भू १ सत्तायाम्; ( उद्भव । उब्भव । सविकरणें । = उभ ) ] उद्भवणें. (४) [ उभ् ६ पूरणे; ( उभ् = उभ )] १ जोडणे. २ (पाऊस) बंद होणें. उ.- उभूनि करतलें (हात जोडून ) । पडिघाये कपोले ॥ पायांचे सिराले । मांडू लागे ॥ ज्ञा. १४-१८४

उभग १ [ उत् + विज् ६ भयचलनयोः ] *(उबग ३ पहा)* (२) (१) [ उत् + भज् ७ आमर्दने ] *(उबग १ पहा)* (३) [ उत् + भज् १० विश्राणने; ( उद्भज् = उब्भग् = उभग ) ] अपमान करणें, कमी लेखणें. उ.-निकडवया निष्ठुरा । उबगिजे जेवी सोयिरां । तैसे नागवती विकारां । वेंटाळूं जे ॥ माडगांवकर, ज्ञा. १५-२८६

उभड १ [ उत् + भट् १ भृतौ; ( उद्भट् = उब्भट् = उभड ) ] (शेत - पीक) चांगल्या तऱ्हेनें वाढणें-पोसणें. (२) [ उद्भट : (ना.) ( उद्भट = उब्भट = उभड = उभळ ) ] उभळणें, शेत चांगलें पिकणें. ( उद्भट - टोपली, सूप) इतर रूप - उभळ १ (३) [ उत् + बध् १० बाधने;. (उत् + बध् = उद्बध् = उव्बध् = उभद् = उभड )]

रोगानें शरिरावरचा भाग सुजणें.

उभर [ उत् + वृह् १ वृद्धौ; { उत् + वृह् = उद्वृह् = उप्वृह् = उभर । गुण ) ज्ञ] वर करणें. *(उभार ३ पहा)*

उभव [ उत् + भू १ सत्तायाम्; ( उत् + भू + उद्भू । सविकरण । उद्भव = उभव ) ] वर येणें, उगवणें.

उभवि [ ऊर्ध्व (ना.); ( ऊर्ध्व = उभवी)] वर करणें, उंच करणें. उ.- मंडप उभविणें.

उभस [ उत् + भास् १ दीप्तौ; (उत्भास् = उभ्भास् = उभस) ] बाहेर दाखविणें, प्रदर्शन करणें.

उभळ - १ [ उद्भटः (ना.) ] *( उभड २ पहा)* (२) [ उत् + बल् १ प्राणने ] (उबळ १ पहा) (३) [ उद्बल् १ प्राणने ] उभळणें, उबळणें. (४) [ उत् + वम् १ उद्गीरणे; (उद्वम्। निष्ठा) [ उद्वान = उब्वाण = उभाळ; उभळ. ण = ळ)] ओकणें, उलटी होणें. (५) [ उत् + ह्वल् १ वैक्लव्ये; ( उत् + ह्वल् = उद्ह्वल् = उभळ ) ] धान्य पाखडणें, वाऱ्याची धरणें. (६) [ उत् + ह्मल् १ चलने; (उत् + ह्मल् = उद्हल् = उम्हल् = उभळ ) ] धान्य पाखडणें.

उभार १ [ उत् + भृ १ भरणे ] हृ = भृ (वैदिक ) उद्धरण = उभारणे, उत् + धारणं = उभारणें, ऊर्ध्वः = उभा. ध = भ. (ह्या वैदिक उच्चारावरून दिसते की, मराठीची मातृपरंपरा वैदिक प्रांतिक भाषेपासून आहें) जहार = जभार. भृ चा अभ्यास 'ज्' ने होतो; याचे कारण मूळांत भृ हा धातु हृ होता. (२) [ उत् + बृह् १ वृद्धौ;(उत् + वृह् = उद् + बृह् = उभार )] वर उचलणे. (३) [ उत् + बृह् १ वृद्धौ; (उत् + वृह् = उद्वृह् = उप्बार् ह् = उभार ) ] वर करणें. इतर रूप - उभर. (४) [ उत् + हरण] *(उभार १ पहा)* (५) [ उत् + हृ ] *(उभार १ पहा)* (६) [ ऊर्ध्वाकार (ना.); (उर्ध्वाकार = उध्वाआर = उभार ) ] वर करणें, उचलणें.

उमग १ [ अव + गमनं; ( अव + गमनं = उगम = उमग । वर्णव्यत्यास ) ] जाणणें, समजणें. (२) [ उत् + मार्ग् १० अन्वेषणे; { उत् + मार्ग = उमग} शोधून काढणें.

उमच १ [ उत् +मच् १ पूजने = शाठ्ये [ उत् + मच् = उअ + मच् = उमच)] फसविणें. उ.- हारि उमचावें या ।जुंवारु ये डाया ।। कां वैरा बापिकेया । पुतृ जचे ।। ज्ञा. १३-५४० (२) [ उत् + मंच् १ पूजायाम्; (उत् + मंच् = उमंच् = उमच ) ] प्रत्युपकार करणें. (नुमचणें = प्रत्युपकार न करणें) इतर रू प – नुमच

उमचळ [ उत् + मूल् १० रोहणे; (उत् + मूल् = उच् + मूल् = उचमुल् = उमूचळ । वर्णव्यत्यास ) ] मुळासकट उपटणें. *(उचमुळ पहा)*

उमज [ उत् + बुध् ४ अवगमने; (उत् + बुध् । सविकरण । उबुझ = उमज ) ] (सम् + बुध् = संबुझ = समुज = समज ) समजणें - ध्यानांत येणें. *(समज ५ पहा)*

उमट १ [ उत् + मथ् १ विलोडने; ( उत् + मथ् = उमथ । त् लोप । = उमठ = उमट ) ] बाहेर येणें, वर येणें. (२) [ उत् + मील् १ निमेषणे; (उत्

+ मील् = उमीट । त् लोप । = उमट)] प्रामुख्यानें वर (पुढे) दिसणें. (३) [ अव + मथ् १ विलोडने; (अवमथ् = उमठ् = उमट )] फोड बाहेर येणें, वर दिसणें. (४) [ उत् + मठ् १ शोके, पेशणे; ( उत् + मठ् = उद्मठ् = उमट ) ] (५) [ उत् + मृज् (मुष्ट); (उत् + मृज् । निष्ठा। उद्भृष्ट = उमट ) ] स्पष्ट होणें, स्वच्छ दिसणें. (६) [ उत् + मथ् १ विलोडने

उमठ [ उत् + मथ् १ विलोडने, चलने; (उत् + मथ् = उमठ । त् लोप । थ् = ठ्।)] वर दिसणें. उ.- जिये अनादि भूमिके नीटें। चराचर हे चित्र उमटे ॥ तेणें आपणपें वैकुंठें । दाविलें तेया ॥ ज्ञा. ११-१८०

उमड [ उत् + मथ् १ विलोडने ] *(उमट पहा)*

उमदळ [ उत् + म्लै १ हर्षक्षये ] उमळणें. *(उमळ ६ पहा)*

उमरड [ उत् + मृड् ९ क्षोदे; ( उत् + मृड् = उत् + मुरड् = उमरड ) ] (उत् मुळें मुरडणें तील उ लोप ) इतर रूप - मुरड १.

उमस १ [ उत् + मस् ४ परिमाणे; [ उत् + मस् = उमस ) ] गडवडून जाणें, घावरून अथवा गोंधळून जाणें (अमृतानुभव) (२) [ अव + मृश्, उत् + मृश् ६ आमर्शने; (अवमृश् = उमस ) ] जाणणें. (नुमसणे - न जाणणें ) इतर रूप - नुमस १ (३) [उत् + मुस् ४ खंडने; ( उत् + मुस् = उमुस = उमस ) ] तोडून अवशेष ठेवणे. (४) [ उत् + मृश् ६ विचारे; ( उत् + मृश् = उमस ) ] विचार करणें, मनात पहाणें. (५) [ उत् + मृश् ६ आमर्शने; (उमस - अमृतानुभव) ] विचार करणें, अस्तिनास्ति पाहणें. इतर रूप - नुमस २ (६) [ उत् + मश् १ रोषकृते, क्रोधे; ( उत् + मश् = उमस) ] उमसणें - तिटकारा येणें. उमासा. (७) [ उत् + मस् ४ विकारे, परिणामें] उ.- वादळ उमसणें. इतर रूप - उमसा. (८) [ उत् + मश् १ शब्दे; ( उत् + मश् = उमस)] सांगणें. (९) [ अव + मृष् ४ तितिक्षायाम्; (अव + मृष् = उमस )] उ.- तो उमसून बोलला ( विचार न करितां)

उमसा [ उत् + मस् ४ परिणामे ] *(उमस ७ पहा)*

उमळ १ [ उत् + मल (ना.) (उत् + मल् = उद् + मळ् = उमळ ) ] उष्णता देऊन मळ बाहेर काढणे. (२) [ उत् + मृद् ९ क्षोदे; (उत् + मृद् = उद् + मृड = उमळ ) ] मृदु होणे. (३) [ उत् + मील् १ निमेषणे; ( उत् + मील् = उद् + मीळ् = उमीळ = उमळ ) ] डोळे उघडणे. (४) [ उत् + म्लै १ हर्षक्षये; ( उत् + म्लै = उद् + मळ । वर्णवियोग । = उमळ ) ] मळमळणे. इतर रूप - उदमळ १ (५) [ उत् + मूल् १० रोहणे; [ उत् + मूल् = उद् + मूळ् + उमुळ् = उमळ )] पोटांतला गर्भ उष्णादिकांनी बाहेर पडणे. (६) [ उत् + म्लै १ हर्षक्षये; [ उत् + म्लै = उत् + म्लै । कर्मणि । उत् + म्लाय। उमळाव । )] इतर रूपे - उन्मळ, उमदळ, उमळाव. (७) [ उत् + वम + ल ( स्वार्थे); ( उद्वमल (स्वार्थे ल ) = उमळ ) ]

यांति होणे. (८) [ उत् + ह्मल् १ चलने; ( उत् + ह्मल् । कर्मणि । = उमळ )] पोटांतला गर्भ अकाली बाहेर पडणे. (९) [ उद्मूलनं ] उमुळणे. उ. - झाड उमळून पडले. *(उमुळ १ पहा)*

उमळाव [ उत् + म्लै १ हर्षक्षये । कर्मणि। म्लाय्; ( उत् + म्लै । कर्मणि । = उत् + म्लाय् = उमळाव ) ] मळमळणे. *(उमळ ६ पहा)*

उमा [ उत् + मा ३ माने; ( उत् + मा =। त् लोप। उमा )] मापणे, झडती घेणे.

उमाण १ [ उत् + मान (ना.) ( उत् + मान = उमाण, त् लोप ) ] मोजणे. (२) [ अव + मन् ४ ज्ञाने; ( अव + मन् = उमाण ) ] कमी लेखणे. उ.- आणि जेयां जे दे किरीटी । तेयाते उमाणी तेया साठी ॥ मग कुबोले कां लोटी । अवज्ञेचां ॥ ज्ञा. १७-३०४ (३) [ अव + मन् ४ ज्ञाने (णिच् ) (अवमन् = उमन् । णिच् = उमानय = उमाण ) ] अपमान करणे, कमी लेखणे. उ.- नुमटतां बालपणाची फूली। जेणे मियां अदानवी सृष्टि केली ॥ करि गिरियरु धरुनि उमाणिली । महेंद्रमहिमा ॥ ज्ञा. १०-२६६ (४) [ उत् + मा ३ माने; ( उत् + मा = उमाण ) ] मोजणे. (अमृतानुभव)

उमाप [ उत् + माप्; ( उत् + माप् = उमाप ) ]

उमाळ १ [ उत् + माल्; ( उत् + माल् = उमाळ । त् लोप ) ] (२) [ उर्मि (ना.); ( उर्मि = उर्‌मि = उमाळ । वर्णव्यत्यास ) ] उमाळा येणे, दुःखाचा आवेग येणे.

उमुच [ उत् + मुच् ६ मोचने; ( उत् +मुच् = उन्मुच् = उमुच । कर्मणि उन्मुच्य)] सैल सोडणे, परत देणे. (नुमुचणे = परत न देणे ) उ.- तैसे दीधले दान तेयांचे । जे कोणी आंगे नुमुचे ॥ अर्पिलेयां श्लाघ्य तेयाचे । कीजे पै गा॥ ज्ञा. १७-२८१ इतर रूप-नुमुच.

उमुळ १ [ उद्मूलनम् (नाम); ( उद्मूलन् = उमुळ अथवा उदमुळ ) ] मुळासकट उपटून पडणे. उ.- झाड उमुळून, उमळून, उदमळून पडले. इतर रूपे- उदमुळ २, उदमळ ६, उमळ ९. (२) [ उत् +मूल् (ना.); (उत् + मूल = उच + मूळ अथवा उमुळ ) ] उपटणे, हलणे. (उचमुळ पहा)

उमेठ [ उत् + मेथ् १ संघाते; ( उत् + मेथ् = उन् + मेठ् = उमेठ ) ] एकत्र जुळणे, भेटणे, जमणे. उत्मेथः = उमेठा = जमाव.

उमेद [ उत् + मिद् ४ स्नेहने; ( उत् + मिद् = उमेद (गुण) ) ] मळणीनंतर धान्याची व्यवस्था लावणे.

उन्मुळ [ उत् + मूल् १ प्रतिष्ठायाम् ] उपटणें (मूळासकट)

उह्मत [उत्+मथ् १विलोडने; ( उत् + मथ् = उम्हत् । मथ् = म्हत् । ) ] उतूं जाणे, बाहेर वहाणे.

उर १ [वृ ५ आवरण, व्‌रणे; (वृ । कर्मणि। उर्य् = उर ) ] उ.- एरी चिखलू चि उरे । = इतरैः चिखिल्लः व्रियते, अवव्रियते. ज्ञा. ९-५७ (२) [ उर्वरित (ना.) ( उर्वरित = उर्वरिअ = उर्वरिअ = उव्वरिअ = उर ) ] बाकी रहाणे, शिल्लक रहाणे.

उरक १ [ उत् + रख् १ गतौ; ( उत् + रख् =उद् + रख् = उरक । त् लोप्)] संपणे, शेवटास जाणे अथवा नेणे.

(२) [ उरुष्यति ( वैदिक ); (उरुष्य = उरख = उरक ) ] काम उरकणे = कामासाठी जास्त जागा शोधणे, संपविणे. (म्यॅक्डोनल्ड व्या. पा. ४०१) (३) [ उरी + कृ ८ करणे; ( उरीकृ = उरक ) ] पतकरून संपविणे.

उरप् १ [ उरस् + रफ् १ हिंसायाम्; ( उरस् + रफ् = उरह् + रप् = उर + रप् = उरप ) ] छातीत दुःख होणे, कळ येणे. इतर रूपे- उरब १, उरंब. (२) [ उरस् + रंफ् १ हिंसायाम् ] इतर रूपे-उरब २, उरंब २.

उरब १ [ उरस् + रफ् १ हिंसायाम्; ( उरस् + रफ् = उरअप् = उररप् = उरब ) ] (उरप १ पहा) (२) [ उरस् + रंफ् १ हिंसायाम्]

उरंब १ [ उरस् + रफ् १ हिंसायाम् ] *(उरप १ पहा)* (२) [ उरस् + रंफ् १ हिंसायाम् ] *(उरप २ पहा)*

उरमट [ ऊर्मिमत् (ना.) ( उर्मिमत् = उरमट ) ] गर्व करणे, ताठा असणे.

उरव [ अव + रुह् (णिच्) ४ रोहणे; (अवरोपय्=उरव, उडव । अवरुह् = उर, उड ) ] बाकी उरणे. उडणे. उ.- बाकी शून्य उरली. इतर रूप- उडव २.

उरि [ उत् + ऋण (ना.); ( उत् + ऋण = उअ + रिण = उअरिअ = उरी )] कर्जातून निघणे, ऋणमुक्त होणे. (ज्ञानेश्वर).

उरिग [ उत् + रिख्, रिग् १ गतौ ] रांगणे, हलणे. माडगांवकर पोथी ज्ञा. १५-३०४

उरोध १ [ उप + रुध् ७ आवरणे; ( उअ + रुध् । गुण । उरोध ) ] प्रतिबंध करणे. (२) [ अव + रुध् (णिच् ) (अवरोधय = उरोध ) ] प्रतिबंध करणे. (ज्ञानेश्वर)

उर्मट [ ऊर्मि (ना.) ] उर्मटणे.

उल १ [ उल्व (ना.); ( उल्व = उल्ल = उल ) ] गर्भाशयाच्या बाहेर पडणे. (२) [ उल्व (ना.); ( उल्व = उल्ल = उल)] (३) [ उल्व (ना.) ] फुटणे, भकले होणे. (४) [ उत् + लू ९ भेदे; ( उत् + लू = उल्लू = उल्ल = उल)] फुटणे, भकले होणे.

उलकट १ [ उत् + कृत् ६ भेदे; ( उत् + कृत् = उलकट । त् = ल्; त् = ट् )] फाडणे. (२) [ उत् + लग् १ गतौ; ( उत् + लग् = उलग +ट ) ] अस्वस्थ होणे. (३) [ उत् + लगट (ना.), ( उत् + लगट = उलकट । त् लोप ) ]

उलख [ उत् + लाक्षा (ना.); ( उत् + लाक्षा = उलख ) ] सोन्याचा मुलामा जाऊन आतील लाख दिसणें.

उलग १ [ उत् + लाख् १ अलमर्थे; ( उत् + लाख् = उलग । ख् = क् = ग् । त् लोप ) ] शेवटपर्यंत संपविणें. (२) [ उत् + लग् १ गतौड] संपविणें, बंद होणें.

उलघड १ [ उत् + घट् १ चेष्टायाम्; (उत् + घट् = उल् + घड् = उल्घड)] सोडणें, मोकळे करणें. (२) [ उत् + ग्रथ् १० बंधने; ( उत् + ग्रथ् = उत् + ग्रथ् = उरगठ = उलघड ) (र=ल) ] सोडणें, मोकळे करणें.

उलगड १ [ उत् + गड् १ सेचने; ( उत् + गड् = उद् + गड = उड + गड = उलगड ) ] आवरण काढणें. (२) [ उत् + ग्रथ् १० बंधने; ( उत्

+ ग्रथ् = उद् + ग्रथ् = उड् + ग्रठ् = उलगड) सोडणें, मुक्त करणें. (३) [ उत् + ग्रथ् १० बंधने; ( उत् + ग्रथ् = उअ + गृर्थ = उलगड ) (र् = ल्)]

उलंघ [ उत् + लंघ् १ गतौ; ( उत् + लंघ = उल्लंघ = उलंघ ) ] उलंघणें. *(लंघ २ पहा)*

उलट [ उपरि + अस् ४ क्षेपे; (उपर्यस् = उलट ) ] उलथे होणें. (सुलट पहा)

उलंड १ [ उलड् (इ) ६ उत्क्षेपणे; (उलड् ओलड व लड् ह्यांपैकीं मूळधातु कोणतातरी एक असावा असा वाद आहे; परंतु मराठीवरून पहातां तिन्हीही स्वतंत्र होते असें दिसतें. ) ] इतर रूपें-यलंड ३. ओलंड २. (२) [ उत् + लड् (इ)]

उलत [ उत् + वृत् १ वर्तने; ( उत् + वृत् + उअ + वृत् = उलत ) ] उलथून पडणें. *(उलथ १ पहा)*

उलथ १ [ उत् + वृत् १ वर्तने ] उलथून पडणें. इतर रूप-उलत (२) [ उदस्त (ना.) (अस् ४ क्षेपे); ( उदस्त - उडथ्य = उलथ ) ] (पर्यस्त- पालथ)

उलस [ उत् + लस् १ क्रीडायाम; ( उत् + लस् = उल्लस अथवा उल्हस ) ] आनंदित असणें. *(विलस पहा)*

उलाड १ [ उत् + नट् १० नर्तने; ( उत् + नट = उल्लाट् = उल्लाड ) ] उनाडणें, नाचणें. (२) [ उत् + नट् १० अवस्यन्दने; ( उन्नाटय = उलाड)]

उलिव १ [ लिप् ६ उपदेहे; ( उत् + लिप् = उल्लिप् = उलिव ) ] (२) [ उप + लिप् ६ लेपने ] माखणे, लेपणे. उ.- कणीक तुपाने उलिव. *(ओळिव पहा)*

उल्लंघ [ उत् + लंघ् ६ गतौ; ( उत् + लंघ् = उल्लंघ) ] (लंघ २ पहा)

उल्लस [ उत् + लस् १ क्रीडायाम् ] आनंदित असणें. इतर रूपे- उल्हस, उल्हास १, उल्लास.

उल्लास १ [ उत् + लष् १ कांतौ; ( उत् + लष् = उल्लास । त् = ल् । ष् = स्) ] उल्ल्हसणें. इतर रूप-उल्हास २ (२) [ उल्लासणें ] *( उल्लस पहा)*

उल्लाळ [ उत् + लल् १ विलासे; ( उत् + लल = उल्लल = उल्लाळ ) ] उडी मारणें, नाचणें. इतर रूप- उल्हाळ

उल्हस [ उत् + लस् १ क्रीडायाम् ] *(उल्लस पहा)*

उल्हास १ [ उत् + लस् १ क्रीडायाम् ] *(उल्लस पहा)* (२) [ उत् + लष् १ कांतौ ] *(उल्लास १ पहा)*

उल्हाळ [ उत् + लल् १ विलासे ] *(उल्लाळ पहा)*

उव [ यूका (ना.); (यूका = उआ = उव)] उवा होणें.

उवळ १ [ उत् + वल् १ संवरणे; ( उत् + वल् = उवळ ) ] (२) [ उत् + बल् १ प्राणने; ( उत् + बल् = उत् + बल = उवळ ) ] ( ब् = व् ) ] सोडणें. इतर रूप-उंवळ. उंवळ [ उत् + बल् १ प्राणने ] *(उवळ २ पहा)*

उवाइ १ [ उप + अव् १ प्रीतौ; (उपाव = उवाइ)] मित्रत्वानें वागणें, पावणें, वर प्रसन्न होणें. *(उवाव २ पहा)* (२) [ उप + इ २ गतौ; उपायति (उपाय् = उवाइ ) ] जवळ जाणें. (ज्ञानेश्वरी)

उवाय [ उप + अव् १ प्रीतौ; ( उप + अव् = उवाय ) ] उवावणें. *(उवाव २ पहा)*

उवाव १ [ उपव्याप् ८ प्राप्तौ; (उपव्याप् = उवाव) ] प्रसरणें, पसरणें. (२) [ उप + अव् १ तृप्तौ उपावति; ( उप + अव् = उमाव् = उवाव् ) ] वर प्रसन्न होणें, पावणें. इतर रूपे - उवाय, उवाइ.

उवीळ [ उत् + वेला (ना.); (उत् + वेला = उद्वेला = उव्वेळ = उवीळ ) ] वेलातिक्रम करणें.

उवेढ [ उत् + वेष्ट् १ वेष्टने; ( उद्वेष्ट् = उवेढ ) ] वेढा उठवणें.

उशिट १ [ उच्छिष्ट (ना.); ( उच्छिष्ट = उशिट ) ] उष्टे होणें. इतर रूप- उच्छिष्ट. (२) [उत्सिक्त (ना.); (उत्सिक्त = उशिट) ] (३) [ उत्सिक्थ (ना.); ( उत्सिक्थ = उस्सिक्ठ = उशिट ) ] उष्टें होणें.

उशिप [ उत् + क्षिप् ४ क्षेपे; ( उत्क्षिप् = उशिप ) ] वर काळणें, उसपणें. *(उसिप पहा)*

उशिर [ उच्चिरायते; (उच्चिरायते = उशिरणे ) ] उशीर होणें. उ.- आज फार उशिरलास.

उशिव [ उत् + श्रि १ सेवायाम्; ( उत् + श्रपय् = उशिव ) ] वर फेकणें.

उष्ट १ [ उत् + स्तै १ संघाते; ( उत् + स्तै = उअ + स्त्यै = उष्ट्यै = उष्ट)] तोडणें, वेगळे करणें. (२) [ उत् + शिष्ट (ना.) ] उष्टणें. इतर रूपे- उष्टव, उष्टाव.

उष्टव [ उत् + शिष्ट (ना.); ( उत् + शिष्टय = उष्टव ) ] उष्टे करणें, प्रथम मुलाला अन्न खाऊं घालणें. *(उष्ट २ पहा)*

उष्टाव [ उच्छिष्ट (ना.) ] *(उष्ट २ पहा)*

उसक १ [ उत् + स्वस्क् १ गतौ, ( उत् + स्वस्क् = उस्स्वक् = हुसक = उसक ) ] हाकून देणें, घालविणें. (हुसक ६ पहा) (२) [ उत् + वक् १ गतौ ( उत् + ष्वस्क् = उस् + क्क् = हुसक् = उसक )] हांकून देणें, घालविणें. *(हुसक ६ पहा)* (३) [ उत् + ष्वस्क् १ गतौ (उत् + ष्वस्क् = उस् + ष्वक्क् = हुसक् = उसक ) ] *(हुसक ६ पहा)* (४) [ उत् + ष्वष्क् १ गतौ (उत् + ष्वक् = उस् + ष्वक्क् = हुसक् = उसक )] *(हुसक ६ पहा)* (५) [ उत् + षुक्क् १ गतौ (उत् + षुक्क् = उच्छुक्क=उसुक=उसक ) ] *(हुसक ६ पहा)* (६) [ उस् + अकच् ( उस् + अकच् = उसक ) ] *(हुसक १० पहा)* (७) [ उस् (त्यागनें, सोडणें ) + अकच् ] *(हुसक २ पहा)*

उसकट [ उच्छकलनम्; (उच्छकल = उसकट ) ] अस्ताव्यस्त करणें. इतर रूपे - उसकड, उचकट ३, उचकड.

उसकड [ उच्छकलनम् (ट=ड)] *(उसकट पहा)*

उसट १ [ उत् + सृज् ४ विसर्गे, ( उत्सृज् = उस्सज् = उसद्ज = उसड = उसट) ] (२) [ उत् + सृज् ४ विसर्गे; (उत् + सृज् । निष्ठा । = उत्सृष्ट = उसट ) ] सोडणें.

उसणे १ [ उत्स्वन्पायते (ना.) ( उत्स्वप्राय = उच्छप्राय = उसण ) ] वसणणें, जागे होणें. (वसण २ पहा) (२) [ ऊष् १ दाहे; ( ऊष् = उस् = उस + ण ) ] *(उसण १ पहा)* (३) [ ऊषणा ]

उसंत १ [ उत् + सद् १० हिंसायाम्; ( उत्सद् = उसंत ) ] उत्सादन करणें.

नुसंत - उत्सादन न करणें. इतर रूप-नुसंत (२) [ उत् +संतप् १ संतापे; (उत् + संतप् = उस्संतप् = उसंतअ = उसंत ) ] व्रत, तप करणें. उ.- श्वासोश्वासा होउनि वहुवसे। कृच्छादि व्रतें खरपुसें। उसंतितां रातिदिवसें। नाराणुक जें॥ ज्ञा. १६-९१ (३) [ उत् + सांत्व् १० सांत्वने; ( उत्सांत्व् = उसंत ) ] सांत्वन करणें, शांत करणें. अन् + उसांत्वय = नुसंतणे, सांत्वन न करणे. उ.- परि नुसंतितां विंवसी। भेटी नाहीं निधिसीं॥ कां धूं न सांतां जैसी। वाति न लगे॥ ज्ञा. १७-३०९

उसप १ [ उप + स्पृश् ६ संस्पर्शने; (उप + स्पृश् = उपस = उसप। वर्णव्यत्यास ) ] स्नान करणें, अंगावर पाणी घेणें. उ.- पाणी अंगावर उपसून घे. (२) [ उत् + सृप् १ गतौ; ( उत्सृप् = उस्सप = उसप। णिच्। उत्सर्पय ) ] वर येणे, वर यावयास लावणें.

उसंव [ उत् + स्फुंद् (उस्फुंद् = उस्फुंद = उसंव ) ] स्फुंदणें, रडणें.

उसवळ [ उत् + स्वल् १ गतौ ] उपटणें, हलवणें. *(उचमळ ४ पहा)*

उसंबळ [ उत् + संब् १० सर्पणे; ( उत्संब् = उस्संब् = उसम; उसंबळ ) ] वर येणे, वहाणे. इतर रूप-उसमळ.

उसमळ [ उत् + संब् १० सर्पणे ] *उसंबळ पहा*

उसव १ [ उत् + श्वै १ वृद्धौ; ( उत् + श्वै = उच्छ्वै = उच्छ्वय = उसव् = उसव ) ] सूज उतरणें, ओसरणें. (२) [ उत् + सिव् ४ वंधने; (उत्सिव् = उसव ) ] टांके मोकळे करणें. (३) [ उत् + सु २ प्रसवैश्वर्ययोः; ( उत्सु = उसव ) ] चळवळ करणें. उ.- उसवल्यास उपाय करतां येतो; निसवल्यास कोण काय करणार ?

उसवळ [ उत् + स्वल् १ चलने; ( उत्स्वल् = उसवळ ) ] *(उचमळ ४ पहा)*

उसस [ उत् + श्वस् २ प्राणने; ( उत्श्वस् = उच्छ्वस् = उसस ) ] दम लागणें, श्वास जोरानें बाहेर पडणें.

उसळ १ [ उत् + शल् १ चलने; ( उत् + शल् = उच्छल् = उसळ ) ] हलणें. (२) [ उत् + शल् [to leap (whitney)] उडी मारणें. (३) [ उत् + सल् १ चलने ] उसळी मारणे, वर येणे. (४) [ वल्स् हलणें; (वल्स् = उल्स्। संप्रसारण। = उल्स् = उसळ। वर्णव्यत्यास ) ] हलणें. उ.- पाणी उसळतें; तो एकदम उसळला.

उसाच [ उत् + श्वस् २ प्राणने; ( उत्श्वस् = उसस = उसाच ) ] दम लागणें, श्वास बाहेर सोडणें. *( उसास २ पहा)*

उसापा [ उत् + श्वै १ वृद्धौ; ( उत्श्वै = उसाण ) ] सुजणें.

उसाण १ [ उत् श्वस् २ प्राणने; ( उत् + श्वस् = उच्छ्वस = उसस = उसास )] दम लागणें. (हुसहुस पहा) (२) [ उत् + श्वस् २ प्राणने; ( उत् + श्वास् = उच्छ्वस् = उ स्सस् = उसास )] हवा बाहेर सोडणें. (दुःखानें), उसासा (नाम). इतर रूप-उसाच. (३) [ उष् १ दाहे ] त्रास होणे ( यङ् लुगन्त).

उसिप [ उत् + क्षिप् ४ क्षेपणे; ( उत्क्षिप् = उस्सिप् = उसिप ) ] बाहेर फेकणें, वर फेकणें, बाहेर काढणें. इतर रूप-उशिप.

उसीत [ उत्सिक्थ (ना.) ( उत्सिक्थ = उस्सित्थ = उसीत ) ] शीत अडकून ठसका लागणें.

उसुक १ [ उत् + षुक्क् १ गतौ; (उत् + षुक्क् = उच्छुक्क् = उसुक ) ] हुसकणें, बाहेर काढणें. (हुसक ६ पहा) (२) [ उत् + स्वस्क् १ गतौ; ( उत्स्वस्क् = उच्छक्क् = उसुक ) ] ( हुसक ६ पहा) (३) [ उत् + ष्वष्क् १ गतौ; ( उत् + ष्वष्क् = उच्छुक्क् = उसुक ) ] (हुसक ६ पहा) (४) [ उत् + ष्वस्क् १ गतौ; ( उत् ष्वस्क् = उच्छुक्क् = उसुक ) ] (हुसक ६ पहा) (५) [ उत् + ष्वक्क् १ गतौ; [ उत् + ष्वक्क् = उच्छुक्क् = उसुक ) ] *(हुसक ६ पहा)*

उस्कट [ उप + स्कृ ९ छेदने; (उप + स्कृ = उस्किर् = उस्कर् = उस्कड् उस्कट ) ] अस्ताव्यस्त करणें, वर खाली करणें. इतर रूप-उस्कर.

उस्कर १ [ उप + स्कृ ९ छेदने; ( उप + स्कृ = उवस्किर = उस्कर ) ] उसकटणें. (उस्कट पहा) (२) [ उप + कृ (उपस्किरति ) ६ विक्षेपे; ( उपस्किर् = उवस्किर् = उस्कर)]

उस्काव [ उत् + स्कु ९ आप्रवणे; ( उत् + स्कु = उत्स्कु = उस्काव् । वृद्धि )] हुस्कावणे. (हुस्काव पहा)

उस्तर १ [ अव + स्तृ ९ आच्छादने; ( अवस्तृ = उस्तृ = गुण । उस्तर ) ] उस्तारणें. इतर रूप-उस्तार १ (निस्तरणं = निस्तर, प्रस्तार = पथार; प्रस्तर = पयर) (२) [अवस्तरणम् (नाम); ( अवस्तरणम् = उस्तरणे) ] (३) [ उत्स्तरणम्; (उत्स्तरणम् = उस्तरणें = वर्णव्यत्यास)] (४) [ उप + स्तृ ९ आच्छादने; (उपस्तृ = अवस्तर् । गुण। = उस्तर ( व् लोप) ) ] इतर रूप-उस्तार २. उ.- हस्तौ उपस्तीर्य = हात उस्तरून (५) [ उत् + स्तृ ९ आच्छादने]

उस्तार १ [ अव + स्तृ ९ आच्छादने; (अवस्तृ = उस्तृ । वृद्धि । = उस्तार)] उस्तरणे. (उस्तर १ पहा) (२) उप + स्तृ ९ आच्छादने; ( उपस्तृ = उवस्तृ । वृद्धि । = उस्तार् ) ] उस्तरणें. (उस्तर ४ पहा)

उस्मर [ उत् + स्मृ १ आध्याने; ( उत्स्मृ = उत्स्मृ । त् लोप । उस्मर । गुण} ] आठवण करणें, स्मृति देणें, इतर रूप - उस्मार

उस्मार [ उत् + स्मृ १ आध्याने; { उत्स्मृ = । उत्स्मृ । त् लोप । उत्स्मृ । वृद्धि । = उस्मार ) ] आठवण करून देणें. *(उस्मर पहा)*

उह्मत [ उत् + मथ् १ विलोडने; ( उत् + मथ् = उद् + मत् = उह्मत) ]

उहर [ अव + हृ १ हरणे; ( अव + हृ = उहर् । गुण । ) ] नेणें, लांबवणें, दूर हलविणें.

उळख [ उप + लक्ष् १० दर्शने; ( उप + लक्ष् = उलक्ष् । प लोप । = उळख )] वाखाणणें. इतर रूप-ओळख २

उळंघ [ उद् + लंघ् १ गतौ; ( उद् + लंघ् = उल्लंघ् = उळंघ )]

उळफ १ [ उल्लंफनं (नाम); ( उल्लंफन = उळंफन = उळफणें ) ] उडणें, उकलणें, बाहेर पडणें. उ.- कडी कुलूप उळफलें. इतर रूप- उळफट. (२) [ उत् + लंफ (ना.) ] उडणे,

उडी मारणें.

उळफट [ उल्लंफनं ] उळफणे. ( उळफ १ पहा)

उळंवळ १ [ उत् + अंवल (नाम); ( उदंवल = उलंवल् = उळंवळ ) ] भरून सांडणें, भरून वहाणें. (२) [ उत् + अंबृ १ गतौ; ( उदंब + ल् (स्वार्थे) = उलंवल = उळंवळ)]

उळिव [ उप + लिपृ ६ लेपने ] माखणें, लेपणें. उ. - कणीक तुपाने उळिव. *(ओळिव पहा)*

## ऊ

ऊपाळ [ उत् + प्लु १ गतौ ] उडी मारणे (रामदास).

ऊव [ ऊय् १ तंतुसंताने ( ऊय् = ऊव )] ओयणें, शिवणें, विणणें.

## ए

ए १ [ ई २ असने ( ई= । गुण । ए ) ] येणें. उ.- बाण शंभर योजने एतो-येतो. इतर रूप-ये ९ (२) [ ई २ कांतौ (ई । गुण । = ए ) ] येणें. उ.- माझ्या मनांत एतें-येतें = माझ्या मनांत विचार येतो. इतर रूप-ये ६ (३) [ ई २ खादने ( ई = गुण । ए-ये ) ] येणें उ.- खजूर उपासाला एतो-येतो =खजूर उपासाला खाल्ला जातो. इतर रूप-ये ८ (४) [ई २ गतौ ( इ = गुण। ए = ये ) ] येणे उ.- तो एतो, येता (आ+इ) आगमने। इतर रूप -ये ७ (५) [ इ २ गतौ ( इ = गुण ए = ये ) ] येणें. इतर रूप-ये १० (६) [ ई २ प्रजने (ई = गुण । ए = ये ) ] ये. उ.- कृष्ण देवकीच्या पोटीं एतो-येतो. इतर रूप-ये ४ (७) [ ई २ व्याप्तौ ( ई = गुण । ए =ये ) ] येणें. उ.- ही जमीन एक विघा एते - येते = जमीन एक विघा क्षेत्र व्यापतें. इतर रूप- ये ५

एकवंक १ [ एक + वग् (इ) ६ गतौ ( एक + वंग् । शब्दसंयोग । = एकवंग् = एकवंक् ) ] एकत्र होणें - करणें. णिच् - एकवंकविणे, गोळा बेरीज करणें. उ.- पैं उगेपणां तुझेया। अभिप्राॐ हाचि धनंजया ।। जें एकोल एकवंकीनियां । सांघावे ज्ञान ।। ज्ञा. १८-१३२८ (२) [ एक + वखृ १ गतौ ( एकवंखृ = एकवंक ) ] (३) [ एक + वक् (इ) ६ गतौ ( एकवंक् = एकवंक ) ]

एकवंकवि [ एक + वग् (इ) (णिच्) ] *(एकवंक पहा)*

एक्वट १ [ एक + वट् १ वेष्टने ( शब्दसंयोग) ] एक करणें. (२) [एक + वृत् १ वर्तने ( शब्द संयोग) ( एक + वृत = एकवट ) )] एकत्र गोळा होणें. इतर रूप-एकोट ३ (३) [ एकवट (ना.) (एकवट = एकवट)] एकवट करणें. इतर रूप-एकोट ४ (४) [ एक + वंट् १० विभाजने ( एक + वंट । शब्दसंयोग । एकवंट = एकवट । अनुस्वार लोप )] एकोटणें, एकत्र गोळा होणें. इतर रूपे-एकवड, एकोड, एकोट.

एकवड [ एक + वट् १ विभाजने ( एक + वट । शब्दसंयोग । = एकवड ) ]

एकवटणें, एकोटणें. *(एकवट पहा)*
एकांग [ एक + अंग् १० पदे, लक्षणे ( एक + अंग = एकांग ) ] एकाच दिशेनें विचार करणें.
एकार १ [ एकाकार (ना.) ( एकाकार = एकार । कालेप ) ] एका बाजूस झुकणें - झोक जाणें ( नावे प्रमाणे ). (२) [ एक + ऋ १ गतौ ( एक + ऋ = वृद्धि । एकार ) ] एकत्र जाणें - करणें.
एकोट १ [ एक + वंट् १ गतौ ( एक + वंट् = एक + वट = एकोट । व = उ) ] एकवटणें. *(एकवट पहा)* (२) [ एक + वट् १ गतौ ( एकवट = एकउट = एकोट ) ] (एकवट पहा) (३) [ एक + वृत् १ वर्तने ] *(एकवट २ पहा)* (४) [ एकवट (ना.) ] *(एकवट ३ पहा)*
एकोड १ [ एक + वट् १ विभाजने ( एक + वट् = एकउट = एकोट )] एकवटणें. (एकवट पहा) (२) [ एकवट (ना.) ] एकवटणें *(एकवट पहा)*
एच १ [ दा १ दाने ( दा = यच्छ = एच्)] देणे, खर्चणें. उ.- पैसे एचावेलागतात. इतर रूप येच. ( येच २ पहा) (२) [ आ + यम् १ उपरमे (आ + यम् = आ + यच्छ = एच ) ] नेमणें. *(नेम पहा)*
एडु [ एध् १ वृद्धौ ( एध् = एढ् = एड् = एडु) ]

## ऐ

ऐक १ [ अयि (अयि = अयकि (अकच्) = ऐक ) ] उ.- जाऊं नको, ऐका येथें ऐक हे अव्यय आहे. इतर रूपें-आईक, आइकें, हैक १, हाइक १, हाइकें २. (२) [ अयकि ( अकच् ) ] इतर रूपे- हाइक ३, हाइके १, हैक ३ (३) [ ईक्ष् १ दर्शने ( ईक्ष् = वृद्धि । ऐक्ष् । ऐक ) ] पहाणे. (४) [ आ + ईक्ष् १ दर्शने ] आइकणें. (आइक ५ पहा)
ऐट १ [ अति + स्था, ( अतिष्ठा = अइष्टा = अइट्टा = ऐट ) ] सर्वश्रेष्ठपणा दाखविणें. ऐटा = सर्वश्रेष्ठपणा. (२) [ अट्टा (ना.) ] इतर रूप-ऐटाव.
ऐटाव १ [ अति + स्था, णिच् । अतिष्ठापय् = अइष्टाय = ऐटाव ) ] ऐट करणे. (ऐट पहा) (२) [ अट्ट (ना.) ]
ऐताव [ आ + यत् १ प्रयत्ने ( आयत्त । निष्ठा । ना. आयत्ताय = आयताय = एताव ) ] प्रयत्नाशिवाय मिळणें. इतर रूप-आयताय.
ऐस [ आ + विश् ६ प्रवेशने ( आ + विश् = आइस् = ऐस ) ] बसणें. उ.- एथें ऐस. ( उप + विश् - बसणें.)

## ओ

ओ (येणे) [ अव् १ तृप्ती ( अव् = (नाम) अव् = अउ । संप्रसारण । = ओ) ] उ.-ओ येईतों सुख भोगिले.
ओंइच [ अव + विच् ७ पृथग्भावे ( अव + विच् = अउ + विच् । संप्रसारण । ओइच् ) ] सुपाने पाखडणे. इतर रूपें = वैंच ओंच.
ओइर [ अव + इर् १ ईर्ष्यायां ( अव +

इर् = (सप्रसारण) अउ + इर् = ओंइर ) ] थैरणें. इतर रूपें-थैर २, ओयर.

ओक १ [ आ + यच् १ भाषायाम् ( आ + यच् = आउच् = ओक ) ] वोकणे, बोलणें. उ.- तो एकदांचे सारें ओकला = त्यानें सारें बोलून टाकलें. (२) [ उत् + क्षिप् ४ क्षेपे (उत्क्षिप् = उक्खिम् = ओक ) ] तोंडाबाहेर टाकणें. उ.-तो पैसा ओकला. इतर रूपें - ओकिव, ओकव.

ओंक १ [ आ + वम् १ उद्गीरणे ( ( आ + यम् = आवम् = आउम् = ओम = ओक ) ] तोंडांतून बाहेर पडणें. इतर रूप-वोक (२) [ ( उत् + गॄ = उद्गीर = उग्गीर = उक्कीर् = ओकार = ओक)] (३) [ स्नुह् १ वमने ( स्नुह्। गुण । स्नोह् । = होघ = ओंक। स् = ह् = घ् = क् । न=० )] (४) [ उख् १ गती ] टाकणें, फिरविणें. उ.- दृस्यांचीया श्रृष्टी । ॐ कीती दाटींवरी दीठी ॥ उठवीलीया तळवटीं। चीन्मात्रीची ॥ अमृतानुभव ५१२. जुनी पोथी.

ओकव [ उत् + क्षेपय् ( उत्क्षिप् । णिच्। उत्क्षेपय् = ओकव, ओकिव ) ] ओकिवणें. उ.- त्याच्याकडून पैसे ओकवलें. (ओक २ पहा)

ओकार [ ओकारा (ना.) ( ओकारा = ओकार ) ] ओकारणें.

ओकिव [ उत् + क्षेपय् ( उत्क्षेपय् । णिच्। उक्खेपय् ओकिव ) ] (तोंडातुन) बाहेर काढावयास लावणें. *( ओक २ पहा)*

ओखड [ अव + स्कंद् १ गतिशोषणयोः ] उखडणें. *(उखड २ पहा)*

ओखर [ अव + क्षर् १ संचलने ( अव + क्षर = ओ + खर = ओखर ) ] नांगरटीनंतर जमीन साफ करणें,

ओंग [ अंज् ७ म्रक्षणे ( अंज् = अंग् = ओंग । नाम ओंगण, वंगण ) ] माखणें.

ओगर १ [ अव + गॄ ९ शब्दे ( अव + गॄ । गुण । अवगर् = ओगर ) ] १ बोलणें, बोलावणें. २ पळीनें वाढणें. उ.- तैसें भक्तिहीनाचें जीणे । कां संपत्ति ही न सुकृत जाणणें ॥ तें सवंसारदुःखासि अवंतणें । ॐगरिले गा ॥ ज्ञा. ९-४३६ (२) [ उत् + गॄ ९ शब्दे (उत् + गॄ । गुण । = उद् + गर् = उग्गर = ओगर ) ] बोलावणें. उ.-वरील, ज्ञा. ९-४३६

ओंगळ [ वि + अमंगल (नाम) ( वि + अमंगल = व्यअंगल = ओंगळ ) ] अमंगल करणें. (भोंगळ ४ पहा)

ओघल [ उत् + घृ ] वाहून जाणें. *(वोहल २ पहा)*

ओघळ १ [ अव + गल् १० स्रवणे ( अव + गल् = ओगल् = ओघळ ) ] दोन्यांतून खालीं (बाहेर) पडणें. (२) [ अव + घृ १० प्रस्रवणे ( अव + घृ = अवघर (गुण) = अवघळ = ओघळ (ओहोळ) ) ] दोन्यांतून बाहेर पडणें. *(ओहोळ २ पहा)* (३) [ उत् + घृ ] वाहून जाणें. *(वोहल २ पहा)*

ओघाळ [ उत् + घृ ] वाहून जाणें. *(वोहल २ पहा)*

ओघुळ १ [ अव + घृ ९ प्रस्रवणे ] पाझरणें, वाहणें. *( ओहोळ २ पहा)* (२) [ अव + घूर्ण् ६ भ्रमणे ( अवघृ। निष्ठा । अवघूर्ण = ओघूळ ) किंवा (अव + घूर्ण् = ओघुळ ) ] (दाणे पाखडण्याचा एक प्रकार आहे.